सोलापूर तरुण भारत

आसमंत



# संघ आणि सेवाभाव

निमित्त

सुहासराव हिरेमठ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक संपूर्ण देशातील सर्व राज्यांमध्ये, सुमारे ८८० जिल्ह्यांत शेकडो प्रकारची सेवाकार्य चालवत आहेत. शहरी भागातील सुमारे दहा हजार सेवा वस्त्यांमध्ये (ज्यांना झोपडपट्ट्या म्हटले जाते), हजारो खेड्यांमध्ये, एक हजारपेक्षा अधिक सेवासंस्थाद्वारे, एक लाखापेक्षा अधिक सेवाकार्य चालविली जात आहेत. यामध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, संस्कार, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध प्रकारांमध्ये संस्कार केंद्र, शिकवणी केंद्र, अभ्यासिका, वाचनालय, दवाखाना, बचत गट इत्यादी छोट्या सेवाकार्यांपासून हॉस्पिटल, रक्तपेढी, आरोग्य मित्र योजना, वसतीगृहे, दिव्यांग मुलांसाठी शाळा, रोजगार प्रशिक्षण व रोजगार विनिमय केंद्र, फिरती विज्ञान प्रयोग शाळा, फिरता दवाखाना, अनाथ मुलामुलींसाठी तसेच नवजात अर्भकांसाठी आश्रम (मातृछाया) अशी विविध प्रकारची सेवाकार्ये आणि सेवा प्रकल्प चालविले जात आहेत.

संघाचे संस्थापक डॉक्टर हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते. अंतःकरणात जाज्वल्य राष्ट्रभावना, प्रखर सामाजिक जाणीव व संवेदना, त्याप्रती असणारी कर्तव्याची व समर्पणाची भावना इत्यादी गुण त्यांच्यामध्ये लहानपणापासून होते. ते कलकत्त्याला जेव्हा नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत होते, तेव्हा ऑगस्ट १९१३ मध्ये कलकत्त्याजवळ असलेल्या दामोदर नदीला पूर आला होता. त्यावेळी रामकृष्ण मिशनच्या योजनेतून आपल्या सहाध्यायांना घेऊन त्या पूरग्रस्त भागात डॉक्टर हेडगेवार यांनी सर्व प्रकारची मदत केली. ११, १२, १३ ऑगस्ट हे तीन दिवस डॉक्टर हेडगेवार यांनी अविश्रांत सेवा केली, असे त्यांचे त्यावेळचे सहाध्यायी डॉक्टर वेंकटरमण यांनी लिहून ठेवले आहे. पुरानंतर पसरलेल्या आजारात घरोघर जाऊन त्यांनी उपचारही केले. त्यांच्यातील सामाजिक जाणीव आणि कर्तव्याची भावना तेव्हा अशी प्रकट झाली होती.

नागपूर जवळ रामटेक येथे दरवर्षी रामनवमीला मोठी यात्रा भरत असते. तेथे यात्रेकरूंची प्रचंड गर्दी होत असे. व्यवस्था व अनुशासनाच्या अभावामुळे तेथे चेंगराचेंगरी होत असे. अपघात होत असत. अनेक जण जखमी होत असत. विशेषतः स्त्रिया व लहान मुले यांना अधिक त्रास होत असे. हे पाहून डॉक्टर हेडगेवार यांनी संघ स्थापनेनंतर स्वयंसेवकांना घेऊन त्या यात्रेमध्ये आवश्यक त्या व्यवस्था केल्या. अनुशासन नीट राहील, सर्वजण रांगेतून दर्शन घेतील, चेंगराचेंगरी होणार नाही याची काळजी सर्व स्वयंसेवकांनी घेतली. पुढे काही वर्षे हा उपक्रम असाच चालू होता. हे पाहून वा ऐकून नंतर अनेक जणांनी आपल्या क्षेत्रातील यात्रांच्या वेळी अशीच व्यवस्था केली.

> राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रारंभ होऊन या विजयादशमीला, १२ ऑक्टोबरला ९९ वर्षे पूर्ण झाली. सेवाकार्य हे संघाच्या कार्यपद्धतीचे एक वैशिष्ट्य आहे. संघाचे हजारो स्वयंसेवक देशभरात एक लाखांहून अधिक सेवाकार्य चालवत आहेत. त्याविषयी ....

### डॉ. हेडगेवार यांनी दिलेला विचार

हिंदू समाजाचे सुख ते माझे सुख, समाजाचे दुःख ते माझे दुःख. हिंदू समाजाचा सन्मान तो माझा सन्मान, समाजाचा अपमान तो माझा अपमान. हिंदू समाजावरील संकट हे माझ्यावरील घोर संकट, ही भावना प्रत्येक हिंदूच्या रोमा रोमामध्ये जागृत करणे हाच संघटनेचा मूलमंत्र आहे या डॉक्टर हेडगेवार यांच्या अमृत वचनाप्रमाणे संघाच्या दैनंदिन शाखेतून व अन्यान्य कार्यक्रमातून स्वयंसेवकांच्या मनात सामाजिक जाणीव, समाजाविषयी संवेदना, सेवाभाव, कर्तव्यभाव जागृत होतो. त्यामुळे असे स्वयंसेवक सेवेसाठी सदैव तत्पर असतात. म्हणूनच आपल्याला पाहायला मिळते की, समाजात जेव्हा जेव्हा आपत्ती येते तेव्हा तेव्हा त्या ठिकाणी सर्वप्रथम पोचणारे व सर्व प्रकारचे मदतकार्य आणि पुनर्वसनाचे कार्य करून सर्वात शेवटी परत जाणारे हे स्वयंसेवकच असतात.

महाराष्ट्रात पुण्यात १९६१ च्या पानशेत धरण फुटीमुळे आलेला पूर असो, १९६७ मधील कोयना खोरे येथे आणि १९९३ मध्ये लातूर जिल्ह्यात किल्लारी येथे झालेला भूकंप असो, १९५२ आणि १९७२ मध्ये महाराष्ट्रात पडलेला भीषण दुष्काळ असो २००५-०६ आणि २०१९ व २०२१ यावर्षी सांगली, कोल्हापूरमध्ये आलेले पूर असोत, अशा सर्व ठिकाणी स्वयंसेवकांनी धावून जाऊन मदतकार्य केले आहे. निसर्ग चक्रीवादळामुळे रत्नागिरी, रायगड जिल्ह्यात आलेले पुराचे संकट असो, अशा प्रत्येक ठिकाणी स्वयंसेवकांनी त्वरित जाऊन मदतकार्य केले. याचप्रमाणे गेल्या ७०-८० वर्षांत देशातील विविध राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तींमध्ये, अपघातांमध्ये त्या- त्या सर्व ठिकाणी स्वयंसेवकांच्या निस्वार्थ सेवाभावनेचे, समाज भक्तीचे व परिश्रमशीलतेचे दर्शन संबंधित स्थानच्या नागरिकांना घडले आहे. नोव्हेंबर १९७७ मध्ये आंध्रमधील समुद्रात झालेल्या वादळामुळे आलेल्या भीषण संकटात स्वतःचा जीव धोक्यात घालून मदत करणाऱ्या स्वयंसेवकांना पाहून तेथील सर्वोदय नेते के प्रभाकरराव यांनी रा. स्व. संघाच्या आरएसएस या तीन इंग्रजी अक्षरांचा विस्तार करताना, आरएसएस म्हणजे रेडी फॉर सेल्फलेस सर्व्हिस, असे म्हटले होते. आपल्या देशात तीस टक्क्यांपेक्षा अधिक समाज दारिद्र्य रेषेखाली म्हणजे वंचित, पीडित अभावग्रस्त आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, रोजगार, संस्कार यांच्या अभावामुळे हा वर्ग नेहमीच आपदग्रस्त असतो. ज्याप्रमाणे शरीराचा एक अवयव जरी दुर्बळ असला तरी त्या संपूर्ण शरीराला कोणी सक्षम म्हणत नाहीत. दिव्यांगात त्या व्यक्तीची गणना होते. त्याचप्रमाणे ज्या समाजातील एक वर्ग दुर्बळ अभावग्रस्त आहे त्या समाजाला कोणी सक्षम म्हणणार नाही. या वर्गात शहरी भागातील सेवावस्त्यांमधील नागरिक, दुर्गम ग्रामीण क्षेत्रातील व वनवासी क्षेत्रातील नागरिकांचा समावेश होतो. यांच्यासाठी प्रामुख्याने चार प्रकारांमध्ये किंवा विषयात सेवाकार्ये चालतात. शिक्षण, आरोग्य, संस्कार, आणि रोजगार, स्वावलंबन हे ते कार्यप्रकार आहेत. स्वयंसेवक विविध संस्थां द्वारे यांच्यासाठी सुमारे एक लाखापेक्षा अधिक सेवा कार्य चालवितात. या सेवाकार्यांचा उपयोग करून विद्यार्थी, युवा वर्ग, महिला, प्रौढवर्ग यांनी आपल्या सर्व प्रकारच्या अभावावर मात केली आहे व करत आहेत.

(पान ४ वर)

# उद्योगविश्वाचा मुकुटमणी हरपला!


श्रध्दांजली

प्रतिनिधी

‘टाटा’ या नामांकीत घराण्यात रतन टाटा यांचा जन्म झाला असला तरी त्यांचे बालपण अतिशय वादळी होते. आई- वडिलांच्या घटस्फोटा नंतर रतन टाटा यांच्या आयुष्याची दिशाच बदलली. आजी आणि वडिलांनी त्यांना वाढवले. त्यांच्यात आणि वडिलांमध्ये मात्र, काही बाबतीत मतभेद होते. रतनजींना व्हायोलिन शिकायचे होते, पण वडिलांनी त्यांना पियानो शिकण्यास भाग पाडले. त्यांना अमेरिकेला जाऊन आर्किटेक्ट व्हायचे होते, पण वडीलांनी त्यांना इंग्लंडमध्ये मेकॅनिकल इंजिनीअरिंग करण्यासाठी भाग पाडले. अशा एक ना अनेक मुद्यांवर त्यांना सतत संघर्ष करावा लागला.

१९७१ मध्ये रतन टाटा यांची नॅशनल रेडिओ आणि इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेडचे प्रभारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यावेळी कंपनीची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. नेल्कोचा बाजारातील हिस्सा २ टक्के होता आणि तोटा विक्रीच्या ४० टक्के होता. अशा स्थितीत, कंपनीत मोठ्या पदावरील सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी टाटा सन्सचे चेअरमन जेआरडी टाटा यांना सुचवले की, कंपनीने ग्राहक इलेक्ट्रॉनिक्सऐवजी उच्च-तंत्रज्ञान उत्पादनांच्या विकासात गुंतवणूक करावी. जेआरडी यांना रतन यांचा सल्ला पटला आणि १९७२ ते १९७५ पर्यंत नेल्कोने बाजारातील हिस्सा २० टक्केंपर्यंत वाढवला आणि नुकसानही वसूल केले. १९९१ मध्ये रतन हे टाटा उद्योगाच्या प्रमुखपदी नियुक्त झाले. जे. आर. डी. टाटा यांचे कौशल्य म्हणजे त्यांना असणारी माणसांची पारख. जेआरडी यांनी रतन टाटा यांच्यामधील टाटा उद्योग समूहाचे प्रमुखपद स्वीकारण्यास योग्य ठरणार्या गुणांची पारख केली. रतनजी समूहाच्या प्रमुखपदासाठी आवश्यक असणार्या मापदंडांमध्ये चपखल बसत असल्याचे हेरले आणि या पदासाठी त्यांची निवड केली.

व्यापारी हा नेहमी पैशांच्या मागे धावतो, त्याला नफा कमवायचा असतो. तर उद्योजकाला नफ्यापेक्षा लोकांच्या भल्याचा विचार असतो. हे सांगण्याचे कारण म्हणजे, काही वर्षांपूर्वी एका कार्यक्रमात रतन टाटा यांनी व्यापारी आणि उद्योजकामधील अंतर समजावून सांगितले होते. ‘आम्ही उद्योगपती, व्यापारी नाही, त्यामुळे नफा हा आमच्यासाठी फार महत्त्वाचा नाही. आमच्यासाठी देश आणि समाजाचं कल्याण महत्त्वाचं आहे’, असे विचार त्यांनी या कार्यक्रमात व्यक्त केले. त्यावेळी झालेला टाळ्यांचा कडकडाट थांबला नाही. आज रतन टाटा आपल्यात नाहीत, पण त्यांच्या विचारांचा मोठा वारसा ते आपल्याकडे ठेवून गेले आहेत. रतन टाटा यांना अत्यंत जवळून पाहणार्यांना त्यांचं साध राहणीमान भावलं. रतन टाटा हे नेहमी दूरचा विचार करत होते. छोट्या छोट्या नफ्याकडे लक्ष न देता काही तरी धोरण आखून त्यावर काम करत असत.



‘टाटा’ हे फक्त नाव नाही. तर तो विश्वास, विश्वासार्हतेला असलेला समानार्थी शब्द आहे. टाटांच्या घराण्यातील प्रत्येकानं तो सार्थ करून दाखवला आहे. याच टाटा समूहातील आणखी एक चकाकता हिरा म्हणजे रतन टाटा. भारतीय उद्योगविश्वाचा मुकुटमणी असलेले रतन टाटा फक्त उद्योग विश्वासाठीच नव्हे तर सर्व भारतीय समाजासाठीच आदर्श होते. ज्यांच्यापुढे सर्वांनीच आदरानं नतमस्तक व्हावं अशा काही मोजक्या व्यक्तिमत्त्वांपैकी ते एक होते. रतन टाटांनी देशाच्या औद्योगिक जडण घडणीत मोलाचा वाटा उचलला. रतन टाटा यांच्या निधनाने भारताने उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतरचा एक आश्वासक चेहरा गमावला आहेच; खेरीज केवळ औद्योगिकच नव्हे तर भारताच्या शालीन सभ्यतेच्या, सर्जनशीलतेच्या परंपरेतील एक मोठा उद्योजकही गमावला आहे.

१९९८ मध्ये रतन टाटांनी कंपनीची पहिली कार टाटा इंडिका लॉन्च केली. जी डिझेल इंजिन असलेली पहिली भारतीय हॅचबॅक कार होती. पण काळ बदलला आणि रतन टाटांना कार बनवण्यापासून तोटा होऊ लागला, परिणामी १९९९ मध्ये टाटा मोटर्स लिमिटेड फोर्डला विकण्यासाठी टाटा अमेरिकेला गेले. ‘तुम्हाला कारमधील काहीच माहिती नाही, तर मग कारच्या सेक्शनमध्ये का पाऊल टाकले?’ टाटाची कार कंपनी विकत घेऊन आम्ही टाटांवर उपकार करत आहोत, असे फोर्डने म्हटले. तेव्हा रतन टाटा दुखावले. त्यानंतर मात्र, टाटांनी कार कंपनीत अधिक गुंतवणूक केली, अधिक वेळ दिला आणि नऊ वर्षानंतर टाटा समूहाने अमेरिकन कंपनी फोर्डचे प्रमुख ब्रँड असणारे जग्वार आणि लँड रोव्हर विकत घेत अपमानाचा शांतपणे जणू बदलाच घेतला होता.

टाटा इंडस्ट्रीजच्या अध्यक्षपदी असताना एक खास धोरण राबवले. त्यांनी मोठ्या उद्योगात अनेक बदल केले. त्याचा पुढे देशाला फायदा झाला. उद्योगात जोखीम घ्यायला ते कधी कचरले नाहीत. त्यांनी नव उद्योजकांना जोखीम घेण्यास सांगितले. रतन टाटा यांनी अनेक जागतिक कंपन्यांचे अधिग्रहण करताना हीच दूरदृष्टी उपयोगात आणली. त्यांनी टाटा ग्रुपला त्या उंचीपर्यंत पोहोचवलं, जे कुठल्याही कंपनीच स्वप्न असतं. त्यांनी टाटा समूहाच्या ज्या कुठल्या कंपनीला हात लावला, ती सोनं बनली. टाटाची गणना आज देशातील नाही, तर जगातील टॉप कंपन्यांमध्ये होते. टाटांच साम्राज्य इस्रायल, इराण, ब्रिटनपासून अमेरिकेपर्यंत पसरलेले आहे. टाटांच साम्राज्य शंभरपेक्षा जास्त देशांमध्ये आहे. इस्रायलमध्ये टाटा टेक सेक्टरमध्ये आहे. इथे टाटा कंसल्टेंसी सर्विसेस् काही महत्त्वाच्या प्रोजेक्ट्समध्ये सहभागी आहे. तीन वर्षांपूर्वी इस्रायलच्या पहिल्या पूर्ण डिजिटल बँकेने बँकिंग सर्व्हिस ब्युरोसाठी पहिल्या क्लायंटच्या रुपात टीसीएससोबत करार केला. त्याशिवाय ज्वेलरी सेक्टरमध्ये टाटांचे साम्राज्य पसरलेले आहे.

प्रत्येक भारतीयाकडे स्वतःची कार असावी, असे स्वप्न रतन टाटा यांनी उराशी बाळगले होते. त्यांनी त्यातूनच २००८ मध्ये नॅनो कारचे उत्पादन करत आपले स्वप्न पूर्ण केले. त्या प्रकल्पात नफा तोट्याचे गणित त्यांनी पाहिलेच नाही. त्यांचे एकच स्वप्न होते की, सर्वसामान्यांसाठी एक किफायतशीर कार असावी. ते स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात उतरवले. आज अनेक मध्यमवर्गीय लोकांकडे असणारी नॅनो कार ही टाटांच्या स्पप्नपूर्ती मुळेच आली आहे.

जेआरडी टाटांप्रमाणेच रतन टाटा देखील काटेकोर शिस्तीसाठी ओळखले जात. कार्यालयातील कामासाठी त्यांना कोणी घरी संपर्क केला तर ते अनेकदा चिडायचे. घरी ते एकांतात फाईल आणि इतर कागदपत्रांचा अभ्यास करायचे, वाचन करायचे. जर ते मुंबईत असले तर वीकेंड त्यांच्या अलीबाग येथील फार्म हाऊसवर घालवायचे. त्यावेळेस त्यांच्यासोबत त्यांच्या कुत्र्यांव्यतिरिक्त इतर कोणीही नसायचं. त्यांचा कुत्र्यांवर अतिशय जीव होता. बडेजाव दाखवणं किंवा दिखाऊपणाचा त्यांना अतिशय राग यायचा. रतन टाटा केवळ त्यांच्या व्यवसायासाठीच नव्हे, तर त्यांच्या सहनशील आणि गंभीर व्यक्तिमत्त्वासाठीही ओळखले जात होते. त्यांनी नेहमी इतरांना मदत करण्याची तत्परता दाखवली.

भारतीय उद्योग विश्वात स्पर्धेबरोबरच सामाजिक जाणीव, आर्थिक फायद्याबरोबरच वंचितांच्या आयुष्यात बदल आणण्यासाठी प्रयत्न, सहवेदना, परोपकारी वृत्ती, प्राणीमात्रांवर पराकोटीचं प्रेम आणि माणसातलं माणूसपण जपणारा माणूस या सगळ्या बाबींचं एक विलक्षण रसायन रतन टाटा यांच्यामध्ये तयार झालं होतं. रतन टाटा यांच्या निधनामुळे भारतीय उद्योग विश्वाबरोबरच देशाच्या सामाजिक जाणीवेतही एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा कर्मयोगी व्यक्तिमत्त्वाला भावपूर्ण श्रध्दांजली!

# युक्रेन युद्ध आणि भारताचा दारूगोळा


राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन

भ्र. ९०९६७०१२५३


**रशिया-युक्रेन युद्धामध्ये दारूगोळ्याची गरज**

पेरशिया-युक्रेन युद्ध सावट जगावर आहे. या युद्धामध्ये प्रचंड प्रमाणात हत्यारे आणि दारूगोळा वापरला जात असल्याने, जगभरातील शस्त्रास्त्र बाजारात तेजी आली आहे. या युद्धात भारताने मध्यस्थीची भूमिका घेतली आहे. भारत हा जगातील प्रमुख शस्त्रास्त्र निर्यातक देशांपैकी एक आहे. भारतातून विविध प्रकारचे शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा निर्यात केला जातो. या पृष्ठभूमीवर भारताचा दारूगोळा युक्रेनकडे जात असल्याच्या बातम्यांनी चर्चेला उधाण आले आहे. युद्धभूमीवर शस्त्रांचे आयुष्य हे अनेक वर्षे असते, परंतु दारूगोळा एकदा फायर झाला की पुन्हा वापरता येत नाही. त्यांच्या ऐवजी नवीनच दारूगोळा खरेदी करावा लागतो. यामुळेच युक्रेनला दारूगोळा आयात करण्याकरिता वेगवेगळ्या देशांकडून मदत घ्यावी लागते. सुरुवातीला युक्रेनला युरोपमधल्या देशांनी आपल्याकडे असलेली जुनी शस्त्रे आणि दारूगोळा दिला. परंतु युद्ध दीर्घकाळ सुरू असल्यामुळे आता सगळा जुना दारूगोळा संपला आहे.

### अमेरिका दारूगोळा पुरवू शकत नाही

जगातला सर्वात मोठा शस्त्र आणि दारूगोळा निर्यात करणारा देश अमेरिकासुद्धा पुरेसा दारूगोळा हा वेगवेगळ्या देशांना पुरवू शकत नाही. याचे दोन मुख्य कारणे आहेत. एक तर इस्रायल आणि हमासमध्ये चाललेले युद्ध; जे अमेरिकेकिता अत्यंत महत्त्वाचे आहे आणि दुसरे अमेरिकेमध्ये असलेली भीती. सध्या चाललेल्या वेगवेगळ्या युद्धाचा फायदा घेऊन चीन तैवानवर लष्करी हल्ला करून कब्जा करू शकतो. म्हणून अमेरिका वेगाने तैवान, जपान आणि इतर मित्र राष्ट्रांची लढण्याची क्षमता वाढवत आहे; ज्यामध्ये दारूगोळा पण सामील आहे. यामुळेच अमेरिकेकडे युक्रेनला दारूगोळा पुरवण्याची फारशी क्षमता शिल्लक नाही.

चीन अर्थातच युक्रेनला दारूगोळा पुरवणार नाही. मात्र, रशियाला चीन नक्कीच दारूगोळा पुरवत आहे. भारताच्या काही कंपन्यांनी युक्रेनला तोफगोळ्यांचे शेल केसिंग निर्यात केली आहेत. यामुळे भारत प्रत्यक्षपणे युद्धात सहभागी नसला, तरी अप्रत्यक्षपणे युक्रेनला मदत करत आहे.

**एक विश्लेषण**



### भारतातून तोफगोळ्यांचे शेल केसिंग निर्यात

भारतातून तोफगोळ्यांचे शेल केसिंग निर्यात केले जात आहे. हे शेल केसिंग हे तोफगोळ्यांचा एक महत्त्वपूर्ण घटक असते. युरोपमधल्या काही कंपन्या भारतातून तोफगोळ्यांचे शेल केसिंग आयात करून युरोपमध्ये त्यामध्ये स्फोटक भरून ते युक्रेनला विकत आहे. म्हणजेच भारताचा दारूगोळा युक्रेनकडे डायरेक्ट जात नाही, परंतु युरोपमधल्या कंपन्या भारताकडून दारूगोळ्याचे केसिंग आयात करून युक्रेनला निर्यात करीत आहेत. केसिंग निर्यात करण्यामध्ये पुणेस्थित 'भारत फोर्ज' ही एक मोठी कंपनी आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षांच्या नेत्यांनी मागणी केली आहे की, ज्या भारतीय कंपन्या दारूगोळ्याचे केसिंग युरोपला आणि पर्यायाने युक्रेनला पुरवत आहे त्यांच्यावर बंदी आणली जावी. हे पण लक्षात असावे की, अनेक वेळा रशिया त्यांच्या राष्ट्रीय हिताला सोयीस्कर अशी पावले उचलतो, जी भारताच्या विरोधात असतात. उदाहरणार्थ आता रशिया शांघाय ऑर्गनायझेशनमध्ये पाकिस्तानला आणत आहे.

### इटली, चेक प्रजासत्ताककडून युक्रेनला तोफगोळ्यांचा पुरवठा

रशियाविरुद्धच्या युद्धात अमेरिका-युरोपकडून युक्रेनला सर्व प्रकारची लष्करी मदत केली जाते. मात्र रशिया मित्रराष्ट्र असल्याने भारताने युक्रेनला शस्त्रास्त्रांची मदत किंवा रशियावर निर्बंध लादणाऱ्या पाश्चिमात्य गटात सहभागी होण्यास नकार दिला आहे. भारतीय दारूगोळा युक्रेनला कसा मिळाला? हा पुरवठा थांबविणे भारताच्या हाती आहे का?

### युक्रेनकडे भारतीय दारूगोळा

युक्रेनला भारताकडून थेट मदत होत नसली, तरी भारत युरोपातील अनेक देशांना शस्त्रास्त्रे, तोफगोळे निर्यात करतो. यात इटली आणि चेक प्रजासत्ताक हे मोठे आयातदार देश युक्रेनला तोफगोळ्यांचा पुरवठा करतात. भारताकडून आयात केलेले केसिंगमध्ये स्फोटके भरून एमईएसकडून युक्रेनला दिली जातात. अनेक युरोपियन कंपन्यांकडे तोफगोळे निर्मितीची क्षमता असली, तरी मोठ्या प्रमाणात त्याचे केसिंग उत्पादन करण्याची सुविधा नाही. अशा कंपन्या या भारताकडून तोफगोळ्यांचे केसिंग आयात करतात. त्यांच्यामार्फत भारतीय बनावटीचे हे तोफगोळे युक्रेनकडे आयात होतात. युक्रेनकडील भारतीय तोफगोळ्यांचे प्रमाण एक टक्क्यापेक्षाही कमी आहे.

### भारत पुरवठा थांबवू शकतो का?

कोणत्याही संरक्षणविषयक करारात आयात केलेली शस्त्रास्त्रे, दारूगोळा अन्य देशाला विकताना किंवा मदत म्हणून देताना निर्यातदार देशाची परवानगी घेण्याची अट समाविष्ट असते. आपलीच शस्त्रे आपल्या हाती पडून आपल्याविरुद्धच वापरली जाऊ नयेत. युक्रेनचा सर्वात मोठा शस्त्र पुरवठादार असलेल्या अमेरिकेनेही एफ-१६ फाल्कन विमाने झेलेन्स्की यांना देण्यास अन्य युरोपीय देशांना परवानगी दिली नव्हती. त्यामुळे भारतीय बनावटीची शस्त्रे युक्रेनला देण्यापासून इटली, झेक प्रजासत्ताकासह अन्य युरोपीय देशांना आपला माल युक्रेनला देण्यास भारत सरकार मज्जाव करू शकते. मात्र आतापर्यंत तरी भारताने हे टाळले आहे.

### रशियाची प्रतिक्रिया

आतापर्यंत किमान दोन वेळा रशियाने भारतीय अधिकाऱ्यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. कझाकस्तानमध्ये झालेल्या चर्चेवेळी रशियाचे संरक्षणमंत्री सर्गेई लाव्हरोव्ह यांनी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याकडे यासंदर्भात तक्रार नोंदविली. सरकारी मालकीच्या शस्त्रास्त्र कंपन्यांचा माल युक्रेनच्या हाती जात असल्यामुळे रशिया नाराज आहे. रशियाने भारताला आपल्याशी असलेले ऐतिहासिक संबंध आणि सामरिक भागीदारी लक्षात घेऊन या निर्णयावर पुनर्विचार करण्याचे आवाहन केले आहे. रशिया हा संरक्षण क्षेत्रातील भारताचा पूर्वापार सर्वात मोठा निर्यातदार आहे. आजही आपली ६० टक्के आयात रशियाकडूनच होते. युद्ध छेडले गेल्यानंतर भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयातही वाढविली आहे. रशियावर निर्बंध लादण्यासाठी युरोप-अमेरिकेबरोबर हातमिळवणी करण्यासही भारताने सातत्याने नकार दिला आहे. असे असताना भारत सरकार रशियाच्या तक्रारीकडे लक्ष का देत नाही?

### भारताचे तक्रारीकडे दुर्लक्ष का?

रशियाच्या विरोधाकडे भारताने कानाडोळा करण्याचे एक कारण आर्थिक आहे. २०१८ ते २०२३ या कालावधीत भारताची संरक्षणविषयक निर्यात ३ अब्ज डॉलरच्या वर गेली आहे. २०२९ पर्यंत ही निर्यात ६ अब्ज डॉलरवर नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जगात दोन ठिकाणी युद्ध सुरू असताना भारतीय संरक्षण उद्योगाला ही एक प्रकारे संधी आहे. लांबत चाललेल्या युरोपियन युद्धापासून देशाचा आर्थिक लाभ होण्याची संधी असल्यामुळे भारतीय बनावटीची तोफगोळ्यांची केसिंग दारूगोळा भरून युक्रेनला देण्यात भारताने आडकाठी आणली नाही. युक्रेनचा सर्वांत मोठा पाठीराखा असलेल्या अमेरिकेशी भारताने अलिकडेच संरक्षण सहकार्य अधिक मजबूत केले आहे. या करारामागे चीनला रोखणे हा उद्देश आहे. अशा वेळी युक्रेनला होत असलेली अप्रत्यक्ष मदत रोखून अमेरिकेची नाराजी ओढवून घेण्याची गरज नाही. शिवाय भारतीय दारूगोळा केसिंगचे प्रमाण हे अगदीच नगण्य असल्यामुळे त्याची युक्रेनला फार मोठी मदत होत नाही. परिणामी रशियाने निषेध नोंदविला असला, तरी त्याबाबत पुतिन प्रशासन लगेच काही मोठे पाऊल उचलेल, अशी शक्यता नाही.

### रशियाकडून कच्चे तेल

आयात युरोपियन देशांनी निर्बंध लावल्यानंतर आपण रशियाकडून मोठ्या प्रमाणामध्ये कच्चे तेल आयात करत आहे आणि ते शुद्ध करून युरोपला विकत आहे. यामुळे रशियाला आपण आर्थिक मदतच करत आहे. हे पण रशियाच्या लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे. भारताचा दारूगोळा युक्रेनकडे जात असल्याच्या प्रश्नाने भारताला एक कठीण परिस्थितीत आहे. एकीकडे भारताला आपल्या आर्थिक हितांचे रक्षण करावे लागेल. दुसरीकडे भारताला आंतरराष्ट्रीय संबंधांचेही संतुलन राखावे लागेल. युक्रेन युद्धाचा भारतावर मोठा परिणाम होत आहे. भारताने आपली तटस्थ भूमिका कायम ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच, भारताने रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांशी सकारात्मक संबंध राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज एशियामधले अनेक देश चीनबरोबर लढाई करता यावी म्हणून आपली सैन्य दले मजबूत करत आहे. अशा देशांना भारताने दारूगोळा निर्यात करून त्यांना मजबूत बनवले पाहिजे. यामुळे आपला आर्थिक फायदा तर होईलच; परंतु चीनच्या विरोधामध्ये मित्र राष्ट्रांची एक आघाडी निर्माण करता येईल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

# संत साहित्यातील कर्मयोग


संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे


संमानवी जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रमासारखा सोपान नाही. कोणत्याही कार्यात यश मिळविण्यासाठी कठोर परिश्रम आवश्यक असतात. व्यक्ती, समाज किंवा राष्ट्र यांच्या प्रगतीसाठी व विकासासाठी प्रयत्नपूर्वक आणि सातत्याने कठोर परिश्रम करणे आवश्यक असते. दुसऱ्या महायुद्धात बॉम्बस्फोटात बेचिराख झालेल्या जपान, जर्मनीने शिस्तबद्ध परिश्रमाच्या जोरावर फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून पुनर्जन्म घेतल्याप्रमाणे देदीप्यमान प्रगती केली आहे. तसेच, वाळवंटामध्ये नंदनवन फुलविणारा इस्रायल परिश्रमाचाच पुजारी आहे.

श्रम कधीच वाया जात नसतात. सातत्यपूर्वक परिश्रम हाच कोणत्याही यशाचा, विकासाचा राजमार्ग आहे. **असाध्य ते साध्य। करितां सायास कारण अभ्यास। तुका म्हणे।।** (तु. गा. २९८) साधकाच्या जीवनामध्ये श्रमाला फार महत्त्वाचे स्थान आहे. साध्यप्राप्तीकरिता श्रमाची तयारी नसेल तर सर्व व्यर्थ आहे. कारण सर्व जग हे कर्माच्या अधीन असून योग्य व उचित कर्म करणारी व्यक्ती ही सर्वदूर प्रसिद्ध असते, असे संत ज्ञानेश्वर सांगतात- **एऱ्हवीं जग हे कर्माधीन। ऐसी याची व्याप्ती गहन।। परी तें असो आइके चिन्हं। प्राप्ताचें।।** (ज्ञाने.४/९२) यशाचा अमृतकुंभ श्रमाच्या आहुतींनीच प्रकट होत असतो. भगवान श्रीकृष्णांनी हाच उपदेश अर्जुनाला गीतेमध्ये केला आहे. प्राचीन काळातील गुरुकुल पद्धतीमध्ये सर्वच विद्यार्थ्यांना श्रमाचे, अभ्यासाचे संस्कार शिकविले जात होते. त्या गुरुकुलांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना शारीरिक श्रमाची कामे करावी लागत. मग त्या गुरुकुलामध्ये शिक्षण घेणारा राजपुत्र असो की एखादा सामान्य विद्यार्थी असो. तेथील सर्वच विद्यार्थ्यांना कष्टाची कामे ठरवल्याप्रमाणे करावी लागत. सामूहिक श्रम केल्यामुळे त्यांचा श्रमपरिहार तर होतच होता; सोबतच त्यांना कष्टाचा आनंदही मिळत होता. या ठिकाणापासूनच त्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी श्रमसंस्काराची शिदोरी मिळत असे. त्यामुळे जेव्हा हा विद्यार्थी आपल्या संसारिक जीवनाला सुरुवात करीत असे, तेव्हा त्यास कोणत्याही श्रमाची लाज वाटत नसे. तो श्रमाचे महत्त्व ओळखून त्याप्रमाणे कार्य करीत असे.



उदाहरणार्थ- १) भगवान श्रीकृष्णांनी सांदीपनी ऋषींच्या आश्रमात खूप कष्टाची कामे केल्याचे महाभारतात आढळते. त्यामध्ये लाकडे फोडणे, मोळ्या आणणे यांचा समावेश होता. तद्वतच राजसूय यज्ञामध्ये भोजनानंतर लोकांच्या पत्रावळ्या उचलण्याचे काम केल्याचे आढळते. यामधून श्रमाची महतीच सिद्ध होते.

२) श्रीरामप्रभूंनी वसिष्ठ मुनींच्या आश्रमात पडेल ते काम केले. आश्रमाची स्वच्छता करणे, रानातून गुरूसाठी फुले व फळे तोडून आणणे, आश्रमाचे रक्षण करणे इत्यादी कामे राजपुत्र असतानाही त्यांनी केलेली आहेत. कष्टाला, अभ्यासाला कोणतेही काम दुष्कर नसते. सततच्या अभ्यासयोगाने अशक्यप्राय गोष्टीही सहज मिळविता येतात. संत ज्ञानेश्वरही अभ्यासयोगाची महती विशद करतात- **अगा अभ्यासयोगु म्हणिजे। तो हा एकु जाणिजे।। येणे काही न निपजे। ऐसे नाही।। पै अभ्यासाचेनि बळे। एका गति अंतराळे। व्याघ्र, सर्प प्रांजळे। केले एकीं।। विष की आहारी पडे।** वैज्ञानिक युगात मात्र परिस्थिती बदलत गेली. श्रमाला, अभ्यासाला दुय्यम मानले जाऊ लागले. श्रमिकांना हीनतेची वागणूक मिळू लागली. कष्टकरी शेतकऱ्यांचा दर्जा तर आणखीच खालावला. खरे म्हणजे बुद्धिजीवी व श्रमजीवी ही समाजरथाची दोन चाके आहेत. ती सारखी मानली, सारखी ठेवली तरच सामाजिक विकासाला गती येईल. अन्यथा त्याचा सामाजिक अपघात होऊन सामाजिक अधःपतन झाल्याशिवाय राहणार नाही.

आज नेमकी तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. बुद्धिजीवींना कष्ट करायची लाज वाटते. शारीरिक कष्ट करणाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात हीनतेची भावना असते. कष्टकऱ्यांना नेहमी खालचा दर्जा दिला जातो. त्यांच्या कामावरून, कपड्यांवरून उपेक्षितांची वागणूक दिली जाते. यामुळेच शहरी व ग्रामीण समाजजीवनातील लोकांमध्ये अंतर पडून एक सामाजिक दरी निर्माण झाली आहे. त्यामुळेच सामाजिक एकता आज धोक्यात आली आहे व देशाच्या प्रगतीला खीळ बसली आहे. यासाठी श्रम-माहात्म्याला सर्वांनी समजून घेणे काळाची गरज आहे. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या श्रमाला समजून न घेतल्यामुळेच अराजकतेची स्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण कष्टकरी जीवनमानच धोक्यात आले आहे. आज होणाऱ्या शेतकरी आत्महत्येचे ते एक महत्त्वपूर्ण कारण आहे. यासाठी बालपणापासूनच श्रमाचे संस्कार बालकांवर तथा विद्यार्थ्यांवर रुजवणे आवश्यक आहे. त्यांना बौद्धिक तसेच शारीरिक कामे सारखीच महत्त्वाची वाटली पाहिजेत. शारीरिक कामे करताना त्यांना कोणत्याही प्रकारची लाज वाटता कामा नये. शेतकरी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे आपले सर्वांचे परम कर्तव्य आहे. कारण प्रत्येक व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांना विकासासह प्रगतिपथावर नेण्यासाठी श्रमप्रतिष्ठा मूल्याचे आचरण करणे प्रत्येकासाठी आवश्यक आहे. श्रमप्रतिष्ठा मूल्याच्या संस्काराने वर्तनामध्ये बदल होत असतात. संत तुकारामांच्या 'अभंग वाङ्मया'तील कर्म-श्रमाची महती संत तुकारामांनी दैववादाला झुगारून प्रयत्नवादाला, श्रमाला, संघर्षाला आपल्या जीवनामध्ये महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. भिक्षापात्रे स्वीकारून भिकेची झोळी पसरणे त्यांना कधीही जमले नाही. त्यांनी त्याला लाजीरवाणी बाब संबोधले आहे. त्यांचे हे संबोधन मानवी प्रयत्नवादाचा पुरस्कार करून त्याचा गौरव करणारे आहे. सुखाने संसार करण्यासाठी कष्ट करावेत. त्यासाठी कोणत्याही प्रकारची लाज वाटता कामा नये. उत्तम व्यवहार करून धन जोडावे. प्रयत्नाने, सायासाने सर्व काही साध्य होऊ शकते. बचनाग नावाचे अत्यंत भयंकर असे विष लोक सरावाने तोळा-तोळा खातात व पचवितातही. काही लोक सरावाने साप हातात घेतात. इतरांना हे डोळ्यांनी पाहणेही कष्टप्रद होते.

असाध्य असणाऱ्या अनेक बाबी कष्टाने, प्रयत्नाने सहज साध्य होतात. अभ्यास हे यामागचे रहस्य आहे. कष्टामुळेच अशक्यप्राय गोष्टी शक्य होऊ शकतात. आपले ध्येय साध्य करण्यासाठी वरचेवर प्रयत्न करणे आवश्यक असते आणि हे प्रयत्न योग्य वेळीही करणे आवश्यक असतात. **ओले मूळ भेदी खडकाचे अंग। अभ्यासांसी सांग कार्यसिद्धि।। नव्हे ऐसे काही अवघड। नाही कईवाड तोच वरि।। दोरे चिरा कापे पाडिला कांचणी। अभ्यासे सेवनी विष पडे।। तुका म्हणे कैचा बैसण्यासी ठाव। जठरी बाळा वाव एकाएकी।।** (तु. गा. १३९५) जीवनसंघर्षामध्ये प्रयत्नवादाचा पुरस्कार करून ध्येय प्राप्त करण्यासाठी मरणालाही सामोरे जाण्याची तयारी असावी. आपल्या कर्माच्या ठायी जो तत्परता दर्शवितो, त्याच्यामध्ये नेहमीच ज्ञाननिष्ठेची पात्रता निर्माण होते. घरकाम करणारी दासीसुद्धा कामामध्ये राजाच्या परीक्षेला उतरली तर एक दिवस त्या राजमहालाची स्वामिनी होऊ शकते. ज्याच्या वाट्याला जे विहित कर्म आले असेल.

(पान ६ वर)

---

## मेरा पढने में ना लागे दिल...!

# शब्द-यात्रा चित्रपट साहित्याची...


सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे


भारतीय जनमानस स्मरण रंजनात रमते. भावनात्मक गुंतवणूक झाल्याखेरीज ती कलाकृती त्याच्या मनात व हृदयात घर करत नाही. मूलतः बृहत् कुटुंब व समाजाचा घटक असणे भारतीय व्यक्तीस अधिक प्रिय असते म्हणून व्यक्तिकेंद्री, व्यक्तिस्वातंत्र्यास अवाजवी महत्त्व देणारे चित्रपट त्यास फारसे रुचत नाही. चित्रपटातील कलावंत हे विशेष असतात व ते सर्वसामान्य व्यक्तींपेक्षा उच्च दर्जा बाळगून असतात, असे भारतीय समाज मनोमन मानतो. कलावंतांची मानसपूजा करणे भारतीय समाजास आवडते. तर्ककठोर व वास्तवदर्शी विश्लेषण विशेषतः कलाकृतींच्या बाबतीत त्याला फारसे रुचत नाहीच. चित्रपट व चित्रपटसृष्टी यांच्या अनुषंगाने लेखन व पुस्तकांचे परिशीलन करताना ही बाब आपणास प्रकर्षाने जाणवते.



इसाक मुजावर



अंबरिष मिश्र



गणेश मतकरी


भारतीय चित्रपटसृष्टीच्या प्रारंभीच्या काळात चित्रपटातील बहुसंख्य कलावंत मंडळी ही समाजाच्या वंचित स्तरातून आली होती. सभ्य व घरंदाज कुटुंबात चित्रपट व त्यासंबंधी काहीही चर्चा करण्यास सक्त मनाई असे. भारतीय चित्रपट व त्यावर निर्भीड आणि साहित्यिक मूल्य-युक्त पुस्तक म्हणजे वादग्रस्त व प्रतिभाशाली कलंदर साहित्यिक सआदत हसन मंटो लिखित 'मीनाबाझार' हे पुस्तक...!

चित्रपट कलावंतांच्या वैयक्तिक संबंध आणि त्यांचे आयुष्य केंद्रिभूत ठेवून भारतीय चित्रपट, राजकीय व सामाजिक स्थिती यांचा अप्रतिम धांडोळा या पुस्तकात घेतला आहे. १९५३ साली प्रकाशित झालेले हे पुस्तक अजूनही लोकप्रिय आहे. भारतातील बहुतांश प्रमुख भाषांमध्ये चित्रपट साहित्य अप्रतिहत सृजित होत असते. विस्तारभयास्तव मी मराठी भाषेतील चित्रपट साहित्याचा धावता आढावा घेण्याचा या लेखात प्रयत्न करणार आहे. मराठीत चित्रपट साहित्याची एका अर्थाने मुहूर्तमेढ रोवणारे लोकोत्तर व्यक्तिमत्त्व म्हणजे इसाक मुजावर..!

संपूर्ण आयुष्य क्षणोक्षणी चित्रपट जगलेला हा माणूस. रसरंग व चित्रानंद या सिनेसाप्ताहिकांचे ते आधारस्तंभ होते आणि त्या सोबत भारतीय चित्रपटांचे बारीकसारीक, अचूक तपशील शब्दबद्ध करणारे ते पुराण पुरुष होते. फ्लॅशबॅक, चित्रपट संगीताचा इतिहास, मराठी चित्रपटांचा इतिहास, लकीअनलकी ही व इतरही अनेक पुस्तके लिहिणारे इसाक मुजावर चित्रपटांचा चालता-बोलता ज्ञानकोश म्हणून विख्यात होते. ललित अंगाने चित्रपट आणि त्यातील कलावंत, गीते यांचा रसिला वेध घेणारे लेखक म्हणजे शिरीष कणेकर.



शिरिष कणेकर



अनिता पाध्ये



अरुण खोपकर

मुद्दलात इंग्रजी पत्रकारिता करणाऱ्या कणेकर यांनी चित्रपटांचा विविध अंगांनी चुरचुरीत, खुसखुशीत व प्रत्ययकारी परामर्श घेतला आहे. लालित्यपूर्ण आणि मौलिक शैली ही त्यांची खास वैशिष्ट्ये. तब्बल ४४ पुस्तके लिहिणारे कणेकर मनापासून रमले ते हिंदी चित्रपटांमध्ये. 'यादो की बारात', 'गाये चला जा' ही त्यांची काळजात घर करणारी पुस्तके. एक वेडा पीर लताला भेटतो, हा माझ्या मते मराठीतील चित्रपटसंदर्भातील सर्वश्रेष्ठ लेख.

अंबरिश मिश्र यांनीदेखील 'शुभ्र काही जीवघेणे' हे अप्रतिम पुस्तक लिहून मराठी चित्रपट साहित्यात आपले स्थान अढळ केले. या पुस्तकातील ओ. पी. नय्यर यांच्यावरील लेख म्हणजे क्या कहने..! बाबू मोशाय (हेमंत देसाई) हे देखील चित्रपटांवर सुरेख लेखन करणारे लेखक. संडे के संडे, खोया खोया चांद ही त्यांची पुस्तके आवर्जून वाचण्याजोगी.

अनिता पाध्ये या सध्याच्या काळातील चित्रपटांवर लिहिणाऱ्या उत्तम लेखिका. एकटा जीव सदाशिव, एक होता गोल्डी, दहा क्लासिक्स ही त्यांची महत्त्वपूर्ण पुस्तके. सुभाषचंद्र जाधव हे निष्ठेने चित्रपटांवर लिहिणारे लेखक. मोहंमद रफी हा त्यांचा भक्तीचा विषय. 'कव्वाली की रात' हे त्यांचे कमालीचे बहारदार पुस्तक. साक्षेपी व विचारवंत लेखक माधव मोहोळकर यांचे 'गीतयात्री' हे पुस्तक म्हणजे रसिकांच्या मर्मबंधातील ठेव. चौफेर लेखन करणाऱ्या विजय पाडळकर यांनी बखर गीतकारांची, सिनेमाचे जादूगार व तो उंच माणूस अशी अप्रतिम पुस्तके लिहिली आहेत. रत्नाकर मतकरी यांचे चिरंजीव गणेश मतकरी सिनेमास्कोप व सिनेमॅटिक ही पुस्तके लिहून एकदम चर्चेत आले. अरुण खोपकर लिखित 'गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका' म्हणजे क्या बात.. वा..!

विश्वास नेरूरकर या मराठी लेखकाने विविध संगीत कलावंतांचा समग्र धांडोळा घेणारी पुस्तके आत्यंतिक परिश्रमाने सिद्ध केली आहेत. गायक-गायिका, संगीतकार यांची समग्र गीते त्यानी संकलित केली आहेत. अचूक संदर्भासाठी या पुस्तकांना पर्याय नाही. चित्रपटांवर गंभीर व ललितरम्य लेखन करणारे अनेक लेखक मराठीत आहेत. तूर्तास एवढेच. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

# प्रसंगावधान देई, यश–सन्मान!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

### १ ध्रुव बाळाची आई राणीसुनीती

विष्णू पुराण आणि भागवत पुराणातील कथेनुसार ध्रुव हा उत्तानपाद राजा व सुनीती यांचा मुलगा होता. पाच वर्षांचा ध्रुव हा वडिलांच्या मांडीवर बसला असताना त्याला त्याच्या सावत्र आईने- सुरुचीने ढकलले व त्याला म्हणाली, ''वडिलांच्या मांडीवर बसायला मिळण्यासाठी तुला माझ्यापोटी जन्म घ्यावा लागेल. त्यासाठी तुला वनात जाऊन तप करावे लागेल.'' हे ऐकून दु:खी झालेला ध्रुव आपली आई सुनीतीजवळ गेला व काय घडले ते सांगितले. ते ऐकून सुनीतीने एक आई म्हणून सकारात्मक उपदेश आपल्या मुलाला केला. ती म्हणाली, ''ध्रुव बाळा, तुझ्या सुरुची आईने केलेला उपदेश योग्यच आहे. जेथून आपल्याला कोणीही ढकलणार नाही, अशा जागेवर जर तुला पोहोचायचे असेल तर तू वनात जाऊन खरेच तप करायला हवे.'' हे ऐकून त्या लहानशा बाळ ध्रुवाने खरोखरच राजवाडा सोडून 'मधुवन' नावाच्या अरण्याची वाट धरली. वाटेत त्याला देवर्षी नारद भेटले. त्यांना त्याने विचारले की, ''तप म्हणजे नेमके काय करायचे?'' नारदाने 'ओम नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करावयास सांगितले. त्याचे कठीण तप पाहून भगवान विष्णू प्रसन्न झाले. त्यांच्या वरदानानुसार आधी ध्रुवाने यशस्वी राजा होऊन अनेक वर्षे राज्य केले. नंतर अवकाशात ध्रुवतारा म्हणून अढळ पद प्राप्त केले. या कथेतून हे शिकायला हवे की, कठीण परिस्थितीत योग्य उपदेश आई सुनीतीने दिला व ध्रुवाने त्याचे तंतोतंत पालन केले त्यामुळे तो यशस्वी झाला. आईने मुलाला एवढ्या लहान वयात हा वनात कसा राहील? असा विचार करून त्याला कमजोर न करता त्याला शक्तिमान बनवणारा उपदेश केला. नकारात्मक अनुभवातून सकारात्मक ऊर्जा कशी निर्माण करायची ते शिकवले.

### २. मातोश्री जिजाबाई



नवरा शहाजीराजे शेकडो मैल दूर, वडील लखोजीराव जाधव यांचा नुकताच खून झालेला, पतीने दिलेल्या पुणे प्रदेशाच्या जहागिरीवर शहाजी राजांच्या शत्रूने विध्वंस केलेला, म्हणजे राहायला स्वत:चे घर नाही. पुण्याच्या जहागिरीच्या प्रदेशात रानडुकरे व इतर वन्य जनावरांचा प्रचंड त्रास; शिवाय मोंगल साम्राज्यातील अत्याचारांमुळे प्रजा त्रस्त... अशा कठीण काळात जिजाबाईंनी शिवाजी महाराजांना जन्म दिला. संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीत शहाजी राजांनी पाठवलेल्या निवडक व विश्वासू सरदारांच्या मदतीने जिजाबाईंनी पुण्याच्या जहागिरीचा ताबा वापस घेतला. त्याचवेळी रामायण, महाभारत व पुराण कथा सांगून आध्यात्मिक व सात्त्विक सुसंस्कार करून व अत्यंत आवश्यक असे शस्त्र चालवण्याचे शिक्षण श्रीदादोजी कोंडदेव यांच्या हस्ते दिले. त्याचदरम्यान रांझ्याच्या पाटलाने जाहीरपणे एका स्त्रीवर अत्याचार केल्याचे कळले. तो प्रजेला आपली दासी समजतो, असे कळल्यावर प्रजेला धीर व गुन्हेगारांना जरब बसावी म्हणून शिवाजी महाराजांनी दरबार भरवून न्यायनिवाडा केला व रांझ्याच्या पाटलाचे जाहीरपणे हात व पाय तोडले. शहाजी महाराजांचे निधन झाल्यावर जिजाबाईंनी स्वराज्याच्या उभारणीसाठी आपले आयुष्य वेचले. शिवाजी महाराज स्वारीवर व आग्र्याला कैदेत असताना संपूर्ण स्वराज्य मातोश्री जिजाबाई यांनीच सांभाळले. बालपणापासून राज्याभिषेकापर्यंत शिवाजी महाराज नेहमीच त्यांचा सर्व बाबतीत सल्ला घेत असत. कर्तबगार जिजाबाईंनी प्रत्यक्ष कणाकणाने, क्षणाक्षणाने भारतातील एकमेव स्वराज्याचा छत्रपती घडविला! अशा राजमाता जिजाऊंना कोटी कोटी प्रणाम.

### ३. अहिल्याबाई होळकर

कर्तव्यनिष्ठेने त्यांनी सासरे, पती आणि इतर नातेवाईकांच्या हृदयात स्थान निर्माण केले होते. अहिल्याबाईंना एक मुलगा व एक मुलगी होती. त्यांच्या पतीचे वयाच्या २९ व्या वर्षी निधन झाले. सासरे मल्हारराव गेल्यानंतर अहिल्याबाईंना होळकरांच्या राजवटीची सूत्रे हाती घ्यावी लागली. लवकरच मुलगा, जावई, मुलगी यांचेही निधन झाले. असे आयुष्यात खूप दु:ख



सहन करूनही राणी अहल्याबाई होळकर लोककल्याणासाठी पुढे सरसावल्या. त्यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. धर्मशाळा उभारल्या. त्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट महिला शासकांपैकी एक होत्या. त्यांनी सनातन धर्माचा संदेश प्रसारित केला. विविध प्रसंगी, शूर योद्ध्याप्रमाणे, हत्तीवर धनुष्यबाणांनी सज्ज होऊन स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. प्रजेची आईच या नात्याने त्यांनी राज्यात स्थिरता आणि शांतता प्रस्थापित केली.

### ४. सिंधुताई सपकाळ (माई)

सिंधुताईंचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. विवाह वयाच्या नवव्या वर्षी वयाने २६ वर्षांनी मोठे असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी विवाह झाला. अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. वयाच्या विसाव्या वर्षी चौथ्या वेळी गर्भवती असताना नवऱ्याने मारपीट करून हाकलल्यानंतर



गावकऱ्यांनीही हाकलले. माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या; पण आईनेही पाठ फिरवली. परभणी- नांदेड- मनमाड रेल्वे स्टेशनांवर सिंधुताई भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या. एकदा त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. सिंधुताई दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. पण तिथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनीच एकवीस वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याने त्यांच्या लक्षात आले की, तिथे कायम राहता येणार नाही. मग काही दिवस स्मशानात काढले. पुढे १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी 'ममता बाल सदन संस्थे'ची स्थापना केली. आपली कन्या ममता हिला शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण, भोजन, कपडे अन्य सुविधा यांची व्यवस्था संस्थेकडून केली जाते. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक-युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थाच करते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. ४ जानेवारी २०२२ रोजी हजारो मुलांना माई सर्वार्थाने पोरके करून देवाघरी गेली.

### ५. मेरी क्युरी

नवऱ्याला नोबेल पुरस्कार जिंकण्यात मदत करणारी, स्वत: दोन नोबेल पुरस्कार जिंकणारी व दोन्ही मुलींना ्द्धा नोबेल पुरस्कार मिळविण्यास प्रेरणा देणारी अद्वितीय आई! यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८६७ साली पोलंड देशाची राजधानी वॉर्सामध्ये एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मारिया स्क्लोडोव्हस्का होते. आईवडील दोघेही शिक्षक होते. जोसेफ, जोफिया, हेलेना, ब्रोनिस्लावा ही भावंड होती. आई क्षयरोगाने दगावली. १६ व्या वर्षी त्यांनी शिक्षिका म्हणून काम सुरू केले. त्यांनी पहिल्या महायुद्धाच्या काळात क्ष-किरण व्हॅन उभारली, क्ष-किरण यंत्रे पुरवली तसेच क्षकिरण यंत्रे चालविण्याचे प्रशिक्षणही दिले.




कॅन्सर या आजारावर काम करण्यासाठी मेरी क्युरीने रेडियम संशोधन संस्था उभारली होती. वयाच्या २८ व्या वर्षी त्यांचा विवाह पिएर क्युरी या संशोधकाशी झाला. पिएर आणि मेरी क्युरीला १९०३ साली नोबेल पुरस्कार मिळाला. पुढे १९११ साली मेरीला रसायनशास्त्रात दुसरा नोबेल पुरस्कार मिळाला. याच संस्थेत मेरी क्युरी यांची मुलगी आयरीन क्युरीसुद्धा सक्रिय होती. मेरी क्युरीच्या संशोधन कार्याला पूर्ण समर्पित व्यक्तिमत्त्वाने प्रेरित होऊन पुढे आयरीन क्युरी आणि इव क्युरीलाही नोबेल पारितोषिक मिळाले. याप्रकारे एकाच कुटुंबातील चौघांनाही एकूण पाच नोबेल पुरस्कार मिळालेत.

### ६. माझी आई निशा

गोविंदराव विघ्ने आजही आम्हा चारही भावंडांना सतत मार्गदर्शन करणारी दीपस्तंभच आहे. ती फक्त साडेचार वर्षांची असताना तिच्या वडिलांचा मृत्यू झाला. आमच्या आजीने (नलिनीबाई काशीकर) आमची मावशी (ह.भ.प. कीर्तनकार शोभाताई पंधे) व आईचे कठीण परिस्थितीत संगोपन केले. आमची आई समर्थ रामदास स्वामी मंडळातील भक्तांना श्रीयोगीराज लिखित 'दासलीला' या ग्रंथाची गद्यरूपांतरकार व संशोधक म्हणून सुपरिचित आहे.

या सर्व उदाहरणातून शिकायचे काय? GPS म्हणजे ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम! म्हणजेच जगातील कुठल्याही भौगोलिक लक्ष्यापर्यंत पोहोचण्याची प्रणाली! आई अगदी याचप्रमाणे आपल्या मुलांना त्यांच्या लक्ष्यापर्यंत पोहोचायला सर्वतोपरी मदत करणारी प्रणालीच असते. केव्हा काय करावे, काय करू नये हे आईच सांगते. आपण आईच्या गर्भात असताना आपल्या श्वासाने-रक्ताने ती आपले पोषण करते. नऊ महिने आपल्या पोटात पोषण करून आपल्याला जन्म देते. आपल्या आयुष्यातील पहिली गुरू आईच असते. आईचे ऋण आपण कधीच फेडू शकत नाही. आपल्याला आठवत नसते, पण आपल्यासाठी तिने रात्री-रात्री जागून काढल्या असतात. अनेक प्रसंगी स्वत: उपाशी राहून आपल्याला घास भरवलेला असतो. स्वत:च्या गैरसोयीचा विचार न करता मुलाच्या सुखाला प्राधान्य दिलेले असते. स्वत:चे करीअर घडविण्याच्या अनेक संधी मिळत असूनही मुलांच्या भविष्यासाठी आई आपल्या करीअरचे व सुखाचे बलिदान करते. सद्यस्थितीत सर्वच मातांची जबाबदारी वाढली आहे. तेव्हा पुढची पिढी घडविण्यासाठी संघाच्या कुटुंब प्रबोधनात सहभागी व्हा. लता मंगेशकर यांनी गायलेलं कवी माधव ज्युलियन लिखित गीत 'प्रेम स्वरूप आई...' केव्हाही ऐकलं तरी डोळ्यात अश्रू येतात. तसेच 'दादी मां' चित्रपटातील मजरूह सुलतानपुरी यांनी रचलेलं व रोशन यांच्या संगीतात सजलेलं एक सुंदर गीत महेंद्र कपूर आणि मन्ना डे यांनी गायलं आहे. हे गीत आईची महती विषद करतं. 'उस को नहीं देखा हमने कभी, पर इसकी ज़रूरत क्या होगी ऐ माँ, ऐ माँ तेरी सूरत से अलग भगवान की सूरत क्या होगी, क्या होगी उस को नहीं देखा हमने कभी...' (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## बोलणे संतांचे । टाळु नये ।।

होऊनी सावध । वागावे संसारी ।।
फुकाची चाकरी । करू नये ।।१।।

मुखी हरिनाम । पायी दिंडी वारी ।।
परमार्थ विकारी । करू नये ।।२।।

जगणे मरणे । काळाचे आधीन ।।
सात्विक जीवन । टाळू नये ।।३।।

सुख दुःख दोन्ही । जाणावे समान ।।
अंगास लिंपन । लागू नये ।।४।।

संसार परमार्थ । मुळ जगण्याचे ।।
बोलणे संतांचे । टाळु नये ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## नैतिकता

शब्द व वेळ न पाळणाऱ्यांनी मारू नये...
नैतिकतेच्या बाता
या मूल्यांचे करणे पालन नाही सोपे
खाव्या लागतात त्यासाठी खस्ता..
प्राण जाये पर बचन न जाये
चालू नाही शकत येरेगबाळे हा रस्ता
शब्द फिरविणाऱ्यांनी करू नये
शब्दच्छल उगीच नसता..
दिले वचन पाळणे
रघुकुलाचा शिरस्ता
शब्द फिरवून वेळ न पाळू शकणाऱ्यांनी
मिरवू नये उगीच आपल्या यशाचा गुलदस्ता...

आशिष देव

## परतीचा पाऊस

नदी पार करण्यापूर्वी येतो
एक कापरा आवाज
वाटेमध्ये उमललेल्या फुलांवरून
तसेच कापरे अजून काही
आवाज मिसळतात त्या आवाजात
गोडवा असतोच पण आर्ततांही असते भरपूर
ओलावाही असतो नि:संशय
ते गात राहतात गात राहतात
कदाचित मृत्यूला चुकवत
कदाचित मृत्यूला आळवत
पिसासारखा तरंगत असतो
त्यांचा हळवा जीव येतात एकमेकांचा आधार
एकमेकांना पार हळूहळू हळुवार
आवाजाची ती सरिता वळण घेत जाते
गगनापार ऐकणाऱ्याचे डोळे भरून येतात
नभही गलबलतात परतीचा पाऊस
असा सुरू होतो! नाही का?

जयश्री दाणी

# जल्लोषपर्व आणि आर्थिक पडसाद

अर्थोद्योग
महेश देशपांडे

देशात सणासुदीचा हंगाम सुरू झाला असून खदेरीच्या उत्साहामध्ये भर पडू लागली आहे. सणवार जितका सांस्कृतिक जोश घेऊन येतो, तितकीच आर्थिक विश्वातही मोलाची उलाढाल होत असते. याच सुमारास लोक लॉटरीच्या क्षेत्रामध्ये पुन्हा जोमाने नशीब आजमावयला लागल्याचे चित्र आहे. दरम्यान, येत्या दोन महिन्यांमध्ये देशभरात तब्बल ३५ लाख विवाह होणार असल्याची माहिती समोर आली आहे.



आपल्याकडे सणवार जितका सांस्कृतिक जोश घेऊन येतो, तितकीच आर्थिक विश्वा-तही मोलाची उलाढाल होते. सध्या ती जाणवू लागली असतानाच लोक लॉटरीमध्ये पुन्हा नशीब आजमावयला लागल्याचे चित्र आहे. दरम्यान, येत्या दोन महिन्यांमध्ये देशभरात तब्बल ३५ लाख विवाह होणार असल्याची बातमी आहे. आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे अलिकडे चांदीला सोन्यापेक्षा जास्त झळाळी लाभली आहे.

आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे अलिकडच्या काळात चांदीला सोन्यापेक्षा जास्त झळाळी लाभली आहे. सणासुदीचा हंगाम यंदा दुकानदार आणि किरकोळ विक्रेत्यांसाठी चांगल्या भेटवस्तू घेऊन येणार आहे. यंदाच्या सणासुदीमध्ये खरेदीसाठी लोकांमध्ये उत्साह असल्याचे सांगितले जात आहे. एका सर्वेक्षणात या विषयावर लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सर्वेक्षणानुसार सणांच्या या हंगामामध्ये भरपूर खरेदी पाहायला मिळणार आहे. स्थानिक मंडळांच्या सर्वेक्षणानुसार भारतातील अनेक कुटुंबे यावेळी विविध सणांमध्ये सरासरी १० हजार रुपयांची खरेदी करू शकतात. खरेदीदार ऑनलाईन खरेदीपेक्षा बाजारपेठेत जातील आणि दुकानांमधून खरेदीला प्राधान्य देतील, असेही या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे. यासाठी सर्वेक्षणात एकूण ४९ हजार कुटुंबांना प्रश्न विचारण्यात आले. यंदाच्या सणांच्या काळात लोक कोणत्या पॅटर्नची खरेदी करणार आहेत, याची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हे सर्वेक्षण भारतातील ३४२ विविध शहरांतील शहरी जिल्ह्यांमध्ये करण्यात आले. आणखी एक लक्षवेधी बातमी आली आहे. लॉटरी उद्योगामधून. देशात काही ठिकाणी सरकार लॉटरी चालवते तर काही ठिकाणी खासगी संस्थांकडून चालवली जाते. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर लॉटरी चालवली जाते. लोकांना एका झटक्यात कोट्यधीश बनवणाऱ्या लॉटरीचा इतिहास जुना आहे. अलिकडच्या काळात त्यात लोकांचा रस मोठ्या प्रमाणात वाढला आहे. १३ राज्यांनी लॉटरीला अधिकृतपणे मंजुरी दिली आहे. त्यामुळे लॉटरी आता एक प्रमुख कायदेशीर व्यवसाय बनला आहे. या राज्यांमध्ये केरळ, आसाम, अरुणाचल प्रदेश, गोवा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, पंजाब, सिक्कीम आणि पश्चिम बंगालचा समावेश आहे तर कर्नाटक आणि तामिळनाडूसह अनेक राज्यांमध्ये लॉटरीवर बंदी घालण्यात आली आहे.

२०१५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानंतर लॉटरी खेळण्यास परवानगी द्यायची की नाही हे राज्य स्वतः ठरवते. भारतात लॉटरी बऱ्याच काळापासून खेळली जात असली, तरी अधिकृतपणे लॉटरी सुरू करणारे केरळ हे पहिले राज्य होते. केरळ राज्य सरकारने १९६७ मध्ये लॉटरी सुरू केली. लॉटरी एखाद्याला कोट्यधीश करू शकते. लॉटरीचे तिकीट सहसा कमी किमतीत उपलब्ध असते आणि त्यात एक विशेष क्रमांक किंवा कोड असतो. लॉटरी ड्रॉ नियोजित दिवशी आयोजित केले जातात. त्यात निवडलेल्या क्रमांक किंवा कोडसह तिकिटे जाहीर केलेली असतात. जिंकल्यानंतर तिकीटधारकाला मिळणारी बक्षिसाची रक्कम लाखांमध्ये असू शकते. सणासुदीचे दिवस संपल्यानंतर संपूर्ण देशात लगीनसराई सुरू होणार आहे. भारतात दरवर्षी लाखो तरुण-तरुणी लग्नबंधनात अडकतात. याच लग्नांमुळे अनेक लोकांची भरभरून कमाई होते. यावर्षी अवघ्या दोन महिन्यांमध्ये तब्बल ३५ लाख लग्न कार्ये होणार आहेत. म्हणजेच या दोन महिन्यांमध्ये लग्नाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणार आहे. याच काळात सोन्याचा भावही वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ४.२५ लाख कोटी रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. यावर्षी नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यात तब्बल ३५ लाख लग्न होणार आहेत तसेच या लग्नांमध्ये एकूण ४.२५ लाख कोटी रुपयांची उलाढाल होणार आहे. भारतात दरवर्षी साधारण एक कोटी विवाह होतात. मोठी आर्थिक उलाढाल होणारे हे चौथे मोठे क्षेत्र असल्याचे म्हटले जाते. लग्नामुळे अनेक जण कर्जबाजारी होत असतात. याच काळात सेवा, व्यापार, वस्त्रोद्योग यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठी उलाढाल होते.

सरकारने सोन्यावरील आयात शुल्क १५ टक्क्यांवरून सहा टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. त्यामुळेच नोव्हेंबर आणि डिसेंबर या काळात सोन्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. लग्न आणि सणांच्या काळात ज्वेलरी, वाहन उद्योग, सेवा या क्षेत्रातील उद्योगांनाही भरभराट येते. त्यामुळे नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये या उद्योग क्षेत्रांना उभारी मिळण्याची शक्यता आहे. उत्सवाच्या काळात सोन्या- चांदीची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. दरम्यान, सध्या सोन्याचांदीच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. परताव्याच्या बाबतीत विचार केल्यास सोन्यापेक्षा चांदीला चांगला परतावा मिळत आहे. अशा परिस्थितीत चांदीची किंमत एक लाख रुपये किलोच्या पुढे जाऊ शकते.

भारतात सणासुदीत सोन्या-चांदीची खरेदी वाढते. कारण धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणात दागिन्यांची खरेदी केली जाते. सणानंतर लग्नाचा हंगाम येतो. अशा परिस्थितीत सोन्या-चांदीमध्ये गुंतवणूक करणारे लोक अल्पावधीत भरपूर कमाई करतात. सोन्या-चांदीच्या किमतींचा आढावा घेतल्यास गेल्या काही दिवसांतील आकडेवारीवरून दिसून येते की, चांदीमधील गुंतवणुकीवर परतावा मिळाला आहे. अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'ने आपल्या व्याजदरात ०.५ टक्क्यांनी कपात केल्यापासून सोन्या-चांदीच्या दरात वाढ होताना दिसत आहे. अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ने दरकपात केल्यापासून चांदीच्या किमतीत पाच टक्के वाढ झाली आहे तर सोन्याचे दर केवळ ३.५ टक्के वाढले आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारही मोठ्या प्रमाणात चांदीमध्ये गुंतवणूक करत आहेत. चांदीच्या किंमतीत वाढ होण्याचे आणखी एक कारण म्हणजे औद्योगिक वापर. इलेक्ट्रॉनिक्सपासून बॅटरी आणि सेमीकंडक्टरपर्यंत प्रत्येक गोष्टीत चांदीचा वापर होतो. दरम्यान, चीनच्या सेंट्रल बँकेनेही व्याजदरात कपात केली आहे. त्यामुळे चांदीची मागणी वाढली आहे. चांदीच्या दरात वाढ होताना दिसत आहे. सध्या भारतात चांदीची किंमत ९३ हजार रुपये प्रतिकिलो आहे. यामध्ये तीन टक्के जीएसटी समाविष्ट आहे.

चांदीची मागणी वाढल्यास दरात आणखी तेजी येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार सहा ते नऊ महिन्यांमध्ये चांदीचे भाव एक लाख रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीची किंमत ३१.१८ डॉलर प्रती औंस आहे. दिवसेंदिवस सोन्या चांदीच्या दरात मोठी वाढ होत चालली आहे. यामुळे खरेदीदारांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# 'स्मरणगाथा' एका भ्रमंतीमधील जीवनशिक्षणानुभव


गोपाल नीलकंठ म्हणजेच गो.नी. दांडेकर (ज्यांना गोनीदा असेही म्हणतात) यांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी विदर्भातील परतवाडा येथे झाला. व्यापक प्रमाणात लिखाण असलेल्या दांडेकरांचे 'स्मरणगाथा' हे आत्मचरित्र प्रसिद्ध असून १९७३ मध्ये प्रकाशित झालेल्या या ग्रंथाला साहित्य अकादमीचा १९७६ चा पुरस्कार मिळाला होता. व्याकरणकार मोरो केशव हे आतोबा असल्याने व्याकरणकाराच्या भाच्याने व्याकरणाची चूक करू नये. अशी स्पष्ट भूमिका असणार्या वडिलांच्या पोटी जन्म घेतल्यामुळे गो. नी. दांडेकर ह्यांच्या घरात शिक्षण विषयक वातावरण होतं हे लक्षात येते. त्यांचे वडील नवागत पाद्री आणि ननं यांना मराठी आणि हिंदी शिकवण्याचे काम करत. अनेकदा ते गोनीदांना घेऊन जात. त्यामुळे त्यांना विलायती लोकांची संस्कृती आणि भाषा कळायला सुरुवातच झाली होती. त्यांच्या वडिलांच्या मनावर निरनिराळ्या धर्मांच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम झाल्यामुळे ते उदारमतवादी झाले होते. हे वाक्य या ठिकाणी महत्त्वाचे वाटते कारण त्या काळात धर्मनिरपेक्ष असे व्यक्तिमत्व लेखकाने आपल्यासमोर आणले आहे.

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

लेखकाच्या जडणघडणीच्या काळात लोकमान्य टिळकांचे आणि त्यांच्या वडिलांचे असलेले नाते, त्यांचे दोन काका पुण्याला शिक्षणासाठी असताना टिळकांकडे राहणे, लेखकाच्या घरी येणारे सद्गुरू काका यांचा सावरकरांची असलेला संबंध इत्यादी बाबी प्रामुख्याने लेखकाने अधोरेखित केल्या आहेत. अतिशय बुद्धिमान निळकंठ दांडेकर यांच्या वेब्स्टरची संपूर्ण डिक्शनरी तोंड पाठ करून टाकण्याचा प्रसंग त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे ओळख करून देणारा ठरतो. त्यांनी गाणं शिकण्यासाठी सुद्धा खूप धडपड केली आणि त्यांना बऱ्यांपैकी गाणं म्हणता येत असे यावरून अभ्यासासोबत कलेचा अभ्यासही त्यांना महत्त्वाचा वाटत असावा हे स्पष्ट होते.

ए. व्ही. स्कूल परतवाडा येथे नीलकंठ दांडेकर शिक्षक म्हणून काम करत. त्यावेळी शाळेची अधिष्ठात्री देवता म्हणजे परतवाड्याच्या मुन्सीपालिटीचे अध्यक्ष होय असा उल्लेख लेखक करतात. यावरून त्या काळातही शिक्षण संस्था ह्या राजकीय लोकांच्या कृपा क्षेत्रावर आणि इशार्यावर चालत असत असे दिसून येते. गोनीदा-चा चौथीपर्यंतचा अभ्यास त्यांच्या वडिलांनी घरीच करून घेतला आणि परीक्षा देऊन एकदम ते पाचवीत इंग्रजी शाळेत जाऊ लागले. पाचवीत गेले तरी पहिली परीक्षा असल्यामुळे त्या परीक्षेच्या वेळी त्यांचा झालेला गोंधळ सुद्धा लेखकाने अधोरेखित केला आहे. त्या शिक्षणासोबतच नाथ माधव यांच्या शिवकालीन कादंबऱ्या त्यांच्या बहिणीमुळे म्हणजे माईमुळे त्यांना वाचायला मिळाल्या, आणि त्यामुळे त्यांचा दुर्ग गड किल्ले आणि इतिहास या विषयातील कल वाढला. औपचारिक शिक्षणासोबत मराठी साहित्याच्या वाचनातून मिळणारे अनौपचारिक शिक्षणसुद्धा व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरते हे लक्षात घ्यावे लागते. त्या काळात हे विद्यार्थी आर्या, श्लोक, साक्या, दिंड्या, शार्दुलविक्रीडीत हे सर्व पाठ करत, शाळेत जाता येता भेंड्या लावत असतात, कठीण श्लोक म्हणत असत.

लेखकाच्या वडिलांनी गणिताचा पेपर काढला, त्या पेपरमध्ये पास झाले नाही तर आत्महत्या करण्याची वेळ येणार अशा भावनिक गोष्टीला भुलून लेखकाने त्या काळात पेपर फोडी केली आणि त्या बदल्यात दोन नवे टाक मिळवले. मात्र ही पेपर फोडी पकडली गेली. त्याबद्दल त्यांना जबर शिक्षा ही झाली. आपल्या मुलांनी पेपर फोडला त्यामुळे नीलकंठ मास्तरांनी राजीनामा लिहून परतवाडा सोडून दिला. हे उदाहरण त्या काळात लोक किती शिस्तीचे होते हे सांगण्यासाठी पुरेसे आहे. मात्र वर्तमान काळात अशा पेपर फोड्या करणाऱ्या गोपालला वेताच्या काडीने बदडणारे नीलकंठ




दांडेकर कुठे हरवले असावेत असा प्रश्न पडतो. नीलकंठ दांडेकर हे लेखकासाठी फक्त वडील नव्हते तर ते शिक्षण देणारे आणि संस्कार घडवणारे गुरु सुद्धा होते.

नागपूरला आल्यावर संघातील संस्कार आणि नागपूरकरांच्या आखाड्याच्या वेडाच, शिक्षित आणि अशिक्षितांमध्ये असलेल्या व्यायामाची आवड याबाबत विचार करता लोकांना व्यायाम करून शरीर सौष्ठव महत्त्वाचे वाटायचे असे लेखकाने सांगितले आहे. धनतोली या भागात मोठे मोठे साहित्यिक राहत असत. धवसे कोचिंग क्लास नावाचा एक वर्ग होता. त्यात त्यांचे वडील शिक्षक म्हणून काम करू लागले आणि लेखक स्वतः सुळे इंग्लिश स्कूलमध्ये शिकू लागले. शाळेतील एकूण वातावरण देशभक्तीने प्रेरित झालेले होते, कुणाही देशभक्ताला पकडले की मुले शाळेतून बाहेर पडत आणि शाळेवर घोषणाबाजी करत. यातून स्वातंत्र्याची लढाई शाळांपर्यंत पोहोचली होती हे लक्षात येते. एका वर्षात स्वराज्य मिळवून मगच शाळेत पाऊल घालीन अशी गोपाल दांडेकर यांनी आपल्या शिक्षण काळात शपथ घेतली यावरून शिक्षणापेक्षा स्वातंत्र्याचे मोल त्यांच्यासाठी जास्त महत्त्वाचे होते.

१९३० मध्ये मिठाच्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी लेखक घरी न सांगता मुंबई येथे निघून आले आणि तिथे त्यांना एका वेगळ्या दुनियादारीचा अनुभव येऊ लागला. नाटक कंपनीत काम करण्यापासून पेपर वाटण्यापर्यंतचे अनुभव त्यांनी त्या काळात घेतले. सिनेमात काम करण्यासाठी त्यांनी केलेली धडपड सिनेसृष्टीच आकर्षक असणार्या तरुणांना सावध करून जाणारे आहे. नाशिकला आल्यावर तर भीक मागण्यापासून वाढपी म्हणून काम करता करता सुतारकाम शिकण्यातही त्यांनी कसूर केली नाही. अकोला येथे आल्यावर गाई राखण्याचे काम त्यांनी केले. त्यावेळी गायीशी बोलण्याचे पारिभाषिक शब्दही शिकून घेतले. गाडगेमहाराज यांच्याशी त्यांचे झालेली भेट त्यांचे शिष्य महानंद यांच्यासोबत लेखकाचे जाणे, पुढे महानंदस्वामींनी त्यांना देहूला नेऊन तेथील मुलांना किर्तन शिकवायला सांगणे अशा प्रसंगातून त्या काळात लोकशिक्षणाला विलक्षण महत्त्व होते. कीर्तन भारुडासारख्या माध्यमातून समाज जागरण करण्याचे काम गाडगे महाराजांसारखे अनेक समाज सुधारक करत असत हे लक्षात येते. आषाढी यात्रेत गाडगेमहाराजांची पंढरपूरची धर्मशाळा आणि आणि कीर्तनकारांना फार जवळून पाहण्याचा अनुभव त्यांना आला. अशा प्रसंगातून त्यांचे आध्यात्मिक आणि अनौपचारिक शिक्षण सुरू होते.

गाडगेमहाराजांचे शिष्य म्हणून गोनीदा आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत होते. पंधरा-सोळा वर्षे वयाच्या गाडगेमहाराजांच्या या शिष्याने गाडगेमहाराजांसह त्यांच्या त्यांच्या शिष्यगणांकडून कीर्तनावर आपली पकड मजबूत केली होती. असोला येथे सप्ताहात त्यांचे कार्य पाहून गाडगेबाबा त्यांना नाशिकला घेऊन गेले. जगण्याचे सर्व तंत्र मी बाबांच्या महाविद्यालयात शिकलो असं ते म्हणतात. गाडगेबाबांनी आसोल्याहून गो. नी. दांडेकरांना आपल्या सोबत आणले ते इतर कामापेक्षा त्यांच्याकडून लिखाण कार्य करून घ्यावे. म्हणजे त्यांचे हिशेब, पत्रे, संकल्पित कामाचे आराखडे तयार करून घेणे. असे ते कामे होते. गाडगेबाबा बोलत त्या भाषेतच लेखक सुरुवातीला त्यांचा पत्रव्यवहार लिहीत असत त्यावर हसून एका ऐकीव पंडिताने 'चंद्रभागेच्या घाटाचा रस्ता पांडुरंगाच्या देवळावरून जातो असे ऐकून तो रस्ता शोधण्यासाठी शिडी घेऊन देऊळ सोडून जाणे' अशा आशयाची कथा त्यांनी सांगितले. तेव्हापासून गाडगेबाबांचे बोलणे लेखकाने नागरी भाषेत रूपांतरित करायला सुरुवात केली.

नाशिकमध्ये गाडगेमहाराजांना लेखकाला शिकायची हाऊस आहे, अशी माहिती मिळाली आणि त्यांनी जगातील पुस्तक कोणासाठी लिहिलेले आहे? तर ज्यांना वाचता येतं त्यांच्यासाठी त्यामुळे तितका इलम आला पाहिजे असं बोलून त्यांना तेथून आपल्या सोबत घेऊन गेले. भिवंडीच्या डॉक्टर जोशींकडून कामापुरता इलाज करणे शिकून घ्यावे, असे गाडगेबाबांच्या सांगण्यावरून डॉक्टर किती शिक्षण सुरू झालं.

आज अनेक गावांमध्ये बोगस डिग्री घेऊन किंवा डॉक्टरच्या हाताखाली काम करून अर्धवट ज्ञान प्राप्त झालेले अनेक लोक ग्रामीण भागात रुग्णांच्या जीवासोबत खेळत असतात ते पाहिल्यावर अत्यावश्यक ठिकाणी कामी पडावे म्हणून जुजबी वैद्यकीय शिक्षण घेऊन पंढरपूरच्या भक्तांना सेवा देणारे लेखक फार श्रेष्ठ वाटतात. गाडगेबाबाना अतिशय जीवापाड मानणारे गोनिदा ब्राम्हण असून ते गाडगेबाबाचा पत्र लिहितांना अपमान करतात, ते बाबांचा घात करतील असा कांगावा गाडगेबाबाचे काही शिष्य करू लागले. आपण खूप कीर्तन केली, तुकारामांच्या अभंगाचे आणि ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचे पारायण केले. मात्र, आपण या ग्रंथांचा सार काढू शकलो नाही, समजून घेऊ शकलो नाही. या जाणिवेतून आळंदीला वारकरी शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थी म्हणून ज्ञानेश्वरी शिकण्याचा लेखकाचा विचार त्यांच्या ज्ञानसाधनेचा (पान ६ वर)

पान १ वरून

## संघ आणि सेवाभाव

**सेवाकार्यांची त्रिसूत्री**

सर्व सेवाकार्यांचा एक समान उद्देश म्हणजे समाजातील या घटकांना स्वावलंबी, स्वाभिमानी आणि परिश्रमी बनविणे, त्यांच्या मनात सामाजिक जाणीव जागृत करणे हा आहे. सेवाकार्याच्या उपलब्धी बाबत त्रिसूत्री सांगितली जाते. जो सेवित (ज्याला लाभार्थी म्हटले जाते) आहे तो पुढे सेवा करणारा बनला पाहिजे. सेवाकार्यात काम करणारा कर्मचारी कार्यकर्ता झाला पाहिजे, हे दुसरे सूत्र आहे. तिसरे सूत्र म्हणजे दानदाता वेळ देणारा दाता बनला पाहिजे. स्वयंसेवकांनी चालविलेल्या एकाही सेवाकार्यासाठी शासकीय अनुदान घेतले जात नाही. समाजातील संपन्न, धनवान मंडळी या सेवाकार्यासाठी धन अथवा साहित्य देत असतात. हे धन देणारे महानुभाव प्रारंभी केवळ धन देतात, पण नंतर त्या सेवाकार्याची प्रगती व उपलब्धी पाहून त्यांच्या मनातील सेवाभाव आणखीन वृद्धिंगत होतो आणि ते सेवाकार्यासाठी वेळ देऊ लागतात. संपूर्ण देशात या तीनही विषयातील अनेक उदाहरणे आहेत. अशा प्रकारची सर्व कामे स्वयंसेवक हिंदू चिंतनाच्या आधारानेच करतात. हिंदू चिंतनात सेवाकार्याच्या तीन श्रेणी सांगितल्या आहेत. आज सेवित असणारी व्यक्ती पुढे सेवा करणारी बनेल व अन्य सेवित जनांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करत राहील, याला या चिंतनात विशेष स्थान आहे. संघाच्या एका गीतात म्हटल्याप्रमाणे-

देश हमे देता है सबकुछ हम भी तो कुछ देना सीखे। या ओळीचे हे मूर्त रूप आहे.

सुप्रसिद्ध कवी व साहित्यकार विंदा करंदीकर यांनी एका कवितेत म्हटल्याप्रमाणे

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे.
घेता घेता घेणाऱ्याने देणाऱ्याचे हातच घ्यावे.

स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे जगाला सुख शांती आनंद प्रदान करण्याचे ईश्वरी दायित्व भारतावरती आहे. त्यासाठी समाजाची सक्षमता अत्यंत आवश्यक आहे. साने गुरुजी यांनीही आपल्या 'बलसागर भारत होवो' या कवितेत शेवटी हेच म्हटले आहे. ही माय थोर होईल वैभवी दिव्य शोभेल. जगतास शांती देईल तो सोन्याचा दिन येवो. तो सोन्याचा दिवस जवळ येऊ लागला आहे हे सर्वांनाच जाणवत आहे म्हणून सेवाकार्याची व सेवा कार्यकर्त्यांची संख्या वाढवून या कार्यापासून कोणीही वंचित राहू नये हा प्रयत्न करणे आवश्यक आहे असे सर्वांना वाटते. (लेखक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य आहेत.)

## स्मरण

माझी आई या जगात नाही. ती जाण्याच्या पाच वर्षे आधी वडील वारले. दोघांचीही वयं झाली होती. आई-वडील या जगात नसणं हे आपलं मन सहजासहजी स्वीकारायला तयार होत नाही. आयुष्यात कधी शाळेचं तोंडही न पाहिलेली आई आपल्या लेकीचं-लेकाचं मन, त्याची भूक-तहान बरोबर ओळखते. हट्ट करण्याचं, लाड पुरवून घेण्याचं एक हक्काचं ठिकाण म्हणजे आई-वडील. आपले लाड करणारी आई असते तसेच आपण चुकलो तर आपला कान धरणारी, पाठीत धपाटा घालणारी आईच असते. शिस्त लावणारीही आईच असते. लेकाला आपल्या खांद्यावर बसवून जग दाखणारा बाप त्याला हिंमत देतो. पोराला ठेच लागली, तो पडला तर बाप लेकाला हाताला घरून उभं करतो. आईची साथसंगत तर तिच्या पोटात असल्यापासूनची असते. तिच्या पोटात असताना तिच्या आणि आपल्या श्वासाची लय एक असते. त्यामुळे तिच्या जाण्याने तिच्याशी असलेलं आपलं नाते नाही संपतं. आयुष्यात एक निर्वात पोकळी मात्र निर्माण होते.

आई-बाप आयुष्यातील असं न्यायालय आहे, जिथे लेकराच्या अपराधाची कधी सुनावणी होत नाही आणि झाली तरी अपराध्याबरोबर न्यायाधीशालाही सजा होते. कारण या न्यायालयाचे न्यायाधीश आई-बापच असतात. आई-बाप या जगातून गेल्यावर जगण्यातला मायेचा ओलावा नष्ट होतो. आईवडील असताना अनेक चुका कळत-नकळत आपल्या हातून घडलेल्या असतात. त्याबाबत आई-वडील अवाक्षर बोलत नाहीत. ते परलोकाच्या प्रवासाला निघून गेल्यावर आपल्या चुकांची जाणीव आपल्याला होते. पश्चाताप होतो, पण वेळ निघून गेलेली असते. मग आपण शोधतो त्यांना आकाशातल्या असंख्य तारकांमध्ये. एखादी तारका माझी आई असेल. एखादा तारा माझे वडील असतील असं वाटतं. कारण जी व्यक्ती मृत पावते ती आकाशात तारा होते, असं लहानपणी ऐकलेले असते. पोरक्या पोरांवर माया करणारे असतात, पण माय हरवली की मायाही हरवते. पोरकी पोरं आपलं बालपण हरवतात. काहींना तर आपल्या आईचा चेहराही नीटसा आठवत नसतो. नकळत्या वयाच्या बाळाची आई मरू नये अन् अजून पावलेही टाकायला न लागलेल्या बाळाचा बाप कधी देवाघरी जाऊ नये. कारण जगाच्या काटेरी रस्त्यावर चालण्याचं बळ बाप देतो. बाळाला आपल्या कडेवर खांद्यावर उचलून घेतो. माय गेली की देवळातली समई विझल्यासारखी होती आणि बाप गेला की देवळाचा कळसच कोणी काढून घेतल्यासारखं होतं. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई यांच्या मात्या-पित्यांनी देहत्याग केला तेव्हा निवृत्ती ११ वर्षांचे ज्ञानदेव ९, सोपान ७ आणि मुक्ताई ५ वर्षांची होती. कोवळ्या वयात ही मुले निराधार, पोरकी झाली तेव्हा या बहीणभावंडाची अवस्था किती केविलवाणी झाली असेल. त्यांनी एकमेकांना कसं सांभाळले असेल. आईवडील आपल्या पूर्वजांचा विचारवसा आपल्यापर्यंत पोहोचविणारे आपले मायबाप असतात. मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे वारसा हक्काने संपतीचा वारसा येतो. त्याचबरोबर काही गुणसूत्रेही येतात; जी आपलं रंगरूप ठरवतात आणि आपले गुणवैशिष्ट्येही घडवतात. मागची पिढी काळाच्या पडद्याआड जाताना स्वभाव, विचार, वर्तनाचा वारसा पुढच्या पिढीला देऊन जाते. पुढच्या पिढीत आपल्या मुलांमध्ये, नातवंडांमध्ये मागच्या पिढीच्या रूपाच्या गुणाच्या वर्तन विशेषाच्या खाणाखुणा कधी स्पष्ट दिसतात तर कधी त्या शोधण्याचा प्रयत्न केला जातो. आपली गुणवैशिष्ट्ये आपल्या पूर्वजांकडून आपल्याकडे आलेल्या गुणसूत्रांवरून ठरतात; ज्याला 'जीन्स' म्हणतात.

मृत्यूने माणसाचं अस्तित्व पुसून टाकले तरी आपल्या माणसाच्या आठवणी पुसून टाकू शकत नाही. त्या सतत सोबत असतात. काही नाती आपल्या रक्तातच उगवून रुजतात. जसे आपली संतती ती आपल्यापेक्षा वेगळी नसते. आपल्या कन्या-पुत्रांकडून भौतिक सुखपूर्ण भावी आयुष्याच्या अपेक्षा करताना एक सुप्त अपेक्षा आई-वडिलांच्या मनात असते; ती म्हणजे आपल्या कुळाचा उद्धार करणारा पुत्र जन्माला यावा. वंशसातत्यासाठी आपल्या पोटी पुत्रच जन्माला यावा, असा एक अतिरेकी अट्टहास पूर्वीच्या पिढींमध्ये होता; तसाच काही प्रमाणात आजच्याही पिढीत आहे. अशा लोकांची अजून एक अपेक्षा असते; ती म्हणजे त्यांच्या पुढच्या पिढीने त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे क्रियाकर्म करावे म्हणजे त्यांच्या आत्म्याला मुक्ती मिळेल, हा पूर्वापार चालत आलेला विचार आहे. पुढची पिढी घड्याळाच्या काट्याला बांधलेली, सतत पुढे धावणारी आहे. असे असले तरी एक मात्र आहे, धावताना क्षणभर थांबून ते आपल्या पूर्वजांचे स्मरण नक्कीच करतात. या जगात नसलेल्या आपल्या आप्तांच्या प्रती श्राद्धविधीद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धर्माने केलेली ही सोय म्हणजे पितृपक्ष. आपल्या पूर्वजांच्या आठवणी त्यांची स्मृती आजही अनेकजण जपत असतात. पुर्वजांच्या पुण्याईमुळेच आपले भले चालले आहे, अशी भावना अनेकांची असते. ती रास्त भावना जपणे हे प्रत्येकांचे कर्तव्यच आहे.

ज्योती पुजारी



# फेक नरेटिव्हचा फुगा हरयाणात फुटला

अवघ्या तीन महिन्यांपूर्वी ज्या फुग्याने भाजपाला लोकसभा निवडणुकीत, ३०३ वरून २४० वर आणलं, त्या फेक नरेटिव्ह सिस्टिमचा फुगा हरयाणात जनतेनेच फोडला. शेवटी एक गोष्ट ध्यानात घ्यायला पाहिजे की, कोणतीही खोटी गोष्ट, या जगात फार काळ उच्च पदावर किंवा लोकप्रियतेवर राहू शकत नाही. याचं कारण ज्याचा बेसच मुळात खोटेपणा आहे ती गोष्ट, कधीना कधीतरी लोकांना कळते, जाणवते आणि लक्षात येते.

सत्ताकारण
प्रसन्न आठवले
भ्र. ९०४९३५३८०९

लोकसभा निवडणुकीत पार परदेशातील इकोसिस्टीमला मीडियाला आणि भारतातील त्यांच्या बगलबच्च्यांना हाताशी धरून, जो एक गैरसमजाचा खोट्या इमेजचा मोठा फुगा निर्माण करून, काही जागा काँग्रेसने, काही जागा सपाने तर काही जागा महाराष्ट्रातील इंडी आघाडीतील पक्षांनी कमावल्या, त्या सर्व नरेटिव् चा फुगा हरियाणा निवडणुकीत जनतेनेच जमिनीवर बसवला आणि फोडला त्याचं मुख्य कारण म्हणजे लोकसभेआधी किसान आंदोलन आणि कुस्तीपटूंच्या आंदोलनाने सर्वात जास्त हवा हरियाणा आणि पंजाब या राज्यातच निर्माण केली. कदाचित त्याचा थोडाफार परिणाम लोकसभा निवडणूक जाणवला असलेही, पण मोदींनी लोकसभेतील, आपल्या पहिल्याच भाषणात ठणकावून सांगितल्याप्रमाणे, या फेक नरेटिव्हला जशास तसे उत्तर देण्यात येईल. त्याप्रमाणे गेल्या दोन-तीन महिन्यात अनेक खोट्या गोष्टी, ज्या लोकसभेच्या वेळी पसरविण्यात आल्या होत्या, त्या लोकांसमोर आल्या की, कशाप्रकारे परदेशी मीडिया, जॉर्ज सोरोस आणि त्याचे हस्तक यांच्या योजनेनुसार, भारतामध्ये लोकसभा निवडणूक मॅनेज करण्याचा प्रयत्न करण्यात आली. त्याचप्रमाणे या निवडणुकीत परदेशातून किती हजार कोटी रुपये, फक्त मोदींना हरवण्यासाठी ओतण्यात आले, या सर्व गोष्टी लोकांच्या लक्षात आल्या. त्याचबरोबर हे लक्षात आलं की देशाला उपयुक्त कोण आहे आणि देशाला घातक कोण आहे. कदाचित कमी जागा मिळूनही, मोदींची देशासाठीची तळमळ, आस्था पुन्हा एकवार लोकांच्या मनात घर करून गेली असेल. अनेक योजना, ह्याचे लाभ आता लोकांपर्यंत पोचायला सुरुवात झाली आहे, या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणूनच, हरियाणा विधानसभा निवडणुकीत जनतेने कोणत्याही जातीविषयक विद्वेषाला बळी न पडता, खोट्या प्रचारातून अडकता आणि फोडा आणि जोडा या काँग्रेसच्या जुन्या झालेल्या डावपेचाला बळी न पडता, जाट दलित यांना वेगळं करण्याच्या कोणत्याही प्रचाराला बळी न पडता, खर्या अर्थाने आपल्या सद्सद विवेक बुद्धीचा वापर करून मतदान केलं. त्याचप्रमाणे काही कारणामुळे लोकसभा निवडणुकीत काही प्रमाणात प्रचारापासून दूर राहिलेला, संघाचे स्वयंसेवक, यावेळी मात्र हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान मैदानावर उतरलेले दिसले. त्याचाच परिणाम भाजपाच्या विजयात दिसून येतो.

जम्मू काश्मीरमधील निकाल हा तिथल्या लोकांच्या धार्मिक मानसिकतेनुसार योग्य त्या प्रमाणात लागलेला आहे. पण वाढलेल्या मतांच्या टक्क्यांमुळे, जास्त लोकं मतदानाला बाहेर पडले, ही चांगली गोष्ट आहे. हिंदू बहुल मतदारसंघात भाजपच्या जागा वाढल्या आहेत, तर मुस्लिम बहुल मतदारसंघ नॅशनल कॉन्फरन्स आपल्याकडे राखले. या सर्वात काँग्रेसचा मात्र धुवा उडाला. आता युती असल्यामुळे बेगानी शादी मे अब्दुल्ला दिवाना या उक्तीप्रमाणे काश्मीरमध्ये ते आपल्या पाठीवर थोपटून घेतील.पण हरियाणातील पराभव काँग्रेसच्या प्रचंड जिव्हारी लागला आहे, हे नक्की. याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे मतमोजणीच्या दिवशी सुद्धा पहिल्या तासभर, या चुकीच्या नरेटिव्हला बळी पडून, मीडियाने सुद्धा सुरुवातीला काँग्रेसची प्रचंड मोठी आघाडी दाखवून, जणू काही काँग्रेसची त्सुनामी आहे अशी खोटी हवा निर्माण केली आणि पण नंतर झालेल्या पराभवामुळे व भ्रमनिरासामुळे नाकावर आपटलेली काँग्रेस ईव्हीएम ईव्हीएम असा जप करत, काही दिवस थयथयाट करणार. पण त्यांच्याच कर्नाटकातील उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी हरियाणातील पराभव काँग्रेसने स्वीकारला पाहिजे, असं मत व्यक्त केलं आहे.

साधारण तशाच प्रकारचे मत हरियाणातील नेते हुडा यांनी सुद्धा व्यक्त आधी व्यक्त केलं होतं. याचाच अर्थ काँग्रेसचे काही नेते ओळखून आहेत की, काँग्रेसचा हा थयथयाट लवकरच काँग्रेसच्या अंगाशी येणार आहे. म्हणून त्यांनी आधीपासून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

असो, पण या फेक नरेटीव्हच्या नादाला लागून महाराष्ट्रात झालेल्या मतदानाच्या भ्रमातून आणि हरियाणाच्या अनुभवातून विरोधी पक्ष जमिनीवर येईल तर त्यांना महाराष्ट्रात थोडासं स्थान असेल. अन्यथा हरियाणातील मतदानाप्रमाणे महाराष्ट्रातील जनतेने सुद्धा जाती बाहेर येऊन संविधान खतरेमेच्या खोट्या प्रचाराची हवा काढून घेऊन आणि हिंदू धर्मावरील येऊ घातलेलं संकट ओळखून एक मताने आणि एक दिलाने मतदान केलं, तर हरियाणापेक्षाही वाईट पराभव इंडिया आघाडीला महाराष्ट्रात सहन करावा लागेल.

प्रभू श्रीरामांच्या उपासनेची अनेक साधने आहेत. त्यामध्ये रामभक्त जेव्हढ्या श्रद्धेने 'रामरक्षा' म्हणतात तेव्हढ्याच भाविकतेने गोंदवलेकर महाराजांच्या 'रामपाठा'चे नित्य पठण करतात. 'रामपाठ' हा ज्ञानदेव-तुकारामांच्या हरिपाठासारखाच असून त्यात राम, कृष्ण, हरी, शिव सर्वांचे अद्वैत दर्शन आहे. 'रामपाठ' हा रामाचा-रामभक्तीचा महिमा असून केवळ ३३ श्लोकात समग्र रामदर्शन घडवण्याचा हा अल्पाक्षरब्रह्म असा सुंदर अमृतपाठ आहे.

लेखांक ४१

# नामयोगी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांचा 'रामपाठ'

(उत्तरार्ध)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**राम कृष्ण हरी एकचि स्वरूप:-**

रामनामाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन गोंदवलेकरमहाराजांनी 'दीनदास' मुद्रेने अनेक पदातून केले असले तरी राम,कृष्ण, हरी, विठ्ठल, शिव हे सारे देव एकाच ईश्वरी परमतत्वाची वेगवेगळी रूपे व वेगवेगळी नावे आहेत. या रूप व नामाच्या भेदा पलीकडे सर्वांच्या ठायी एकच ईश्वरी तत्त्वाचा वास आहे, हा अद्वैत विचार सांगण्यास ते विसरत नाहीत.

**राम कृष्ण हरी एकचि स्वरूप।**
**अवताराची लीला वेगळाली।**
**दीनदास सांगे लावूनिया ध्यान।**
**तुम्ही आत्मज्ञान जतन करा।।** (प्रवचने पृष्ठ २५४)
**जयासी लागला रामनाम चाळा।**
**आठवी गोपाळ सर्वकाळ ।।**


हाच अद्वैत विचार संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम या संत परंपरेने सांगितलेला आहे हे आपण मागे पाहिलेच आहे. समर्थांनीही हाच अद्वैत विचार प्रतिपादन केलेला आहे. या पूर्ववर्ती सार्या संतांचाच एकात्म- समन्वयवादी विचार गोंदवलेकरमहाराजांच्या कार्यातून नव्या रुपात प्रकट झालेला आहे. 'ब्रह्मचैतन्य' आणि 'दीनदास' या दोन नाममुद्रा महाराजांच्या एका अभंग चरणात एकत्रही आल्या आहेत. या दोन ओळी पहा-

**ब्रह्मचैतन्य नाम सद्गुरुचे कृपे।**
**दीनदास जपे राम सदा।।** (प्रवचने पृ. २५४)

**राम हा तारक मंत्र:-**

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांना 'नामयोगी' म्हणून ओळखले जाते. कारण त्यांचा जेव्हढा भर 'रामा'वर आहे तेव्हढाच भर 'नामा'वर आहे. नामस्मरण हेच कलियुगातील परमार्थाचे सर्वात सोपे सुलभ असे एकमेव साधन आहे त्यामुळे भक्ताने, साधकाने योग, याग, तपश्चर्या अशा अवघड साधनांमध्ये वेळ न घालविता केवळ 'नाम' घेऊन फलप्राप्ती करून घ्यावी असे ब्रह्मचैतन्य म्हणतात. 'नाम हाच देव आणि देव हेच नाम', देव आणि नाम भिन्न नाही. राम हा नामसाधनेतील सर्वश्रेष्ठ नाममंत्र आहे. '**राम हा तारक मंत्र निराकार।**' (२५४) राम नामाचे श्रेष्ठ प्रतिपादन करताना महाराज पूर्ववर्ती संतांप्रमाणेच भगवान शिव-पार्वतीच्या रामनाम चिंतनाचा दाखला देतात.

**पार्वतीरमण जपे रामनाम।**
**विषाचे दहन तेणे झाले।**




**दीनदास म्हणे वाल्मीक तरला।**
**पापी उद्धरला अजामेळ।**

रामनाम चिंतनाने भगवान शिवाचा विष प्राशनाने झालेला शरीर दाह दूर झाला. रामनामाने वाल्याचा वाल्मिकऋषी झाला. तसे ठाम विश्वासाने सर्वांनी राम नाम घ्यावे. राम त्यांचेही कल्याण करील.

**रामावाचुनी न आणावा विचार।**
**हाच माझा आशीर्वाद।।**
**दीनदासाचे बोल मानू नका फोल।**
**भक्तवत्सल राम हृदयी धरा।**

या आर्त विनवणीतून महाराजांची राम भक्ती, निष्ठा याचे दर्शन होते पण त्याशिवाय त्यांना समाजाच्या, सामान्यजनांच्या कल्याणाची असणारी तळमळही दिसून येते. स्वतःबरोबर समाजाचा उद्धार, असेच त्यांचे ब्रीद होते. ब्रह्मचैतन्य महाराजांनी अनेक मंदिरे स्थापन केली. गोंदवल्यामध्येच आपणास महाराजांनी निर्माण केलेली दोन स्वतंत्र राममंदिरे दिसतात.

'धाकटे राम मंदिर' आणि 'थोरले राम मंदिर' ही ब्रह्मचैतन्य निर्मित दोन उर्जा केंद्रेच आहेत. महाराजांना कोणी नमस्कार केला तर ते त्याला 'प्रथम रामाला नमस्कार करावा' असे सांगत. त्यांची ही छोटी उक्ती व कृती पण खूप मोठा बोध सांगून जाते. त्यांनी महाराज म्हणून स्वतःचा महिमा वाढवून घेतला नाही तर 'राम नामाचा' महिमा वाढविला. दास भावाची सदैव जाणीव स्वतः ठेवली व इतरांमध्येही त्या भावाचे जागरण केले. 'मनोभावे रामाचे दास व्हा।' असा उपदेश केला.

**'रामपाठ' केवल अमृत!**

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांनी अनेक अभंग, पदे लिहिली. त्यांच्या साक्षात्कारी, प्रासादिक साहित्यातील 'रामपाठ' भाविक भक्तांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आहे. संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांचे 'हरिपाठ' मराठी संत साहित्यातील एक नाम ठेवा आहे तसाच हा ब्रह्मचैतन्यांचा 'रामपाठ' आहे. रामपाठाचे एकूण ३३ श्लोक आहेत. हा रामपाठ जानकीकांत रामाने मा या हातून लिहून घेतला आहे असे या लेखनाचे सारे श्रेय महाराजांनी श्रीरामचरणी अर्पण केलेले आहे.

'कर्ता करविता श्रीराम' या त्यांच्या धारणेला हे अगदी सुसंगत आहे.

**मज काही ज्ञान नसे किंचित।**
**हृदयी प्रकटला जानकीकांत।**
**त्याचा त्याने लिहून ग्रंथ।**
**भक्तासी अर्पिला प्रीतीने।।३३।।**

महाराजांनी रामपाठामध्ये १३ व्या शतकातील संत ज्ञानदेव माऊलींच्या हरिपाठाचा उल्लेख स्पष्टपणे करून भक्तांना दोन्ही पाठात तुलना न करता दोन्ही पाठ श्रेष्ठ मानून लाभ करून घ्यावा असे सुचवले आहे.

**ज्ञानदेव करी हरिपाठ। ब्रह्मचैतन्य करी रामपाठ।**
**भक्तजनी मानावे दोन्ही श्रेष्ठ।**
**ग्रंथ वरिष्ठ प्रभूचा।।३२।।**

रामपाठाची रचना एखाद्या ग्रंथासारखीच आहे म्हणून महाराजांनी त्याचा 'ग्रंथ' असाच उल्लेख केलेला असावा. प्रारंभी ने मंगलाचरण, गुरू वंदन, पूर्वसुरी रामभक्तांचे स्मरण, सद्गुरुंचा आशीर्वाद-आदेश अशा ७ ओव्या आहेत. त्यानंतरच्या ओव्यांमध्ये श्रीरामाच्या सगुण रुपाचे मनोज्ञ वर्णन आहे. त्यानंतर रामपंचायतन, राम दरबाराचे वर्णन आहे. रामचरित्रातील काही उल्लेख करीत राम अवताराचे वैशिष्ट्य कथन केले आहे. नामाचा महिमा आहे, शेवटी विनवणी आणि पसायदानाविषयी प्रार्थना आहे. केवळ ३३ ओव्यांत 'गागर में सागर' असा हा महाराज म्हणतात तसा 'रामपाठ केवल अमृत।' अमृत पाठ आहे.

**गुप्त ठेविले निर्गुण। प्रकट केले स्वरुप सगुण।**
**श्रीराम अवतार घेऊन।**
**धर्म स्थापिला स्वहस्ते।।१२।।**
**अनंत अवताराचा महिमा।**
**तोही रामनामी तुळेना।**
**ऐशिया रामाच्या सद्गुणा।**
**मी मानव काय वर्णू।।१९।।**
**ज्यासी वैकुंठपदाची गोडी।**
**त्याने रामपाठ भजावा आवडी ।**
**त्याचे संकटी घालून उडी।**
**श्रीराम रक्षी निजांगे।।३१।।**
**जानकी जीवन स्मरण जय जय राम।**
**!! जय श्रीराम!!**

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

# आचार्य अत्रेंच्या वक्तृत्व बॉम्बगोळ्याने दिग्गज गारद

आचार्य अत्रे फार भाग्यवान पत्रकार, वक्ते व लेखक होते. वास्तविक पहाता १९४७ ते ६९ हा स्वातंत्र्याचा अगदी प्रारंभिक कालावधी असल्याने भारतातील लोकशाही तेव्हा फार प्रगल्भ झाली नव्हती. ती अगदी रांगत्या अवस्थेतच होती. त्यावेळच्या एका सभेत विचारपीठावर यशवंतराव चव्हाण, वेणूताई चव्हाण, वसंतराव नाईक, वत्सलाताई नाईक यांच्याशिवाय काही दिग्गज नेत्यांनी हजेरी लावली होती. अमरावतीचे दिग्दर्शक सिन्हा यांनी त्या प्रसंगावर एक टेलीफिल्म तयार केली होती. तर तो प्रसंग असा होता. या मान्यवर राजकीय हस्तीसमोर बोलण्यासाठी आचार्य अत्रे यांचा बलदंड देह उभा राहिला. त्या देहाच्या एका हाताने खाली घसरणारी आपली करण्याचा उद्देश असा, स्वातंत्र्यानंतर आमच्या देशात तेव्हा सार्वभोम लोकशाहीचा तो प्रारंभ होता. त्यावेळेस आचार्य एवढे परखड बोलू शकत होते आणि लोकशाही मान्य असणारे नेते ते निमूटपणे मान्य करत होते. यशवंरावासारखे दर्दी राजकारणी तर त्या विनोदाला हसून दाद देण्याचे औदार्य दाखवत होते. लोकशाहीत अशा प्रगल्भ नेत्यांची आवश्यकता असते. शांतता, संयम, प्रगल्भता, दुरदृष्टी, सोशिकता हे गुण असणार्या नेतृत्वातच निर्णयक्षमता हा गुण




विजार वर ओढली आणि डावा हात कमरेवर स्थिरावला. श्रोत्यांनी आपले कान टवकारले, भुवया उंचावल्या, पाठीचा कणा ताठं केला. त्यांनी सुरवातच अशी आक्रमक केली की, विचारपीठावर असणार्या नेत्यांना असे वाटले असावे की, आपण आता विचारपीठावर असण्याऐवजी श्रोत्यात असतो तर खूप चांगले झाले असते. त्यावेळी आचार्यांनी टाकलेले वक्तृत्वाचे बाँम्बगोळे असे...

लोकहो, हे मंत्री लोक मूर्ख असतात. उगीच आता ईकडे-तिकडे बघू नका. कोण ते नंतर ओळखा. विशेष म्हणजे या वाक्याला यशवंतराव चव्हाणांनी दिलखुलास दाद दिली. त्यानंतर पुढे ते म्हणाले, तर हे मंत्री लोक मूर्ख असतात. एका मंत्र्यांन आपल्या सेक्रेटरीला बोलावलं. त्याच्या हातावर पाच रुपये टेकवले आणि सांगितलं, बाजारात जा आणि या पैशाची एक अम्बेसिडर गाडी घेवून ये. तो सेक्रेटरी तिथून निघाला. दुसरे मंत्री आणखी महामूर्ख. त्याने आपल्या सेक्रेटरीला बोलावलं आणि म्हणाले, माझ्या कार्यालयात जा आणि मी तिथे आहे का नाही हे बघून ये. तो आज्ञाधारक सेक्रेटरी सुद्धा तिथून निघाला. दोन्ही सेक्रेटरी एकमेकाला भेटले. पहिला सेक्रेटरी म्हणाला, आमचे साहेब किती मूर्ख आहेत. मला म्हणाले हे पाच रुपये घे आणि अम्बेसिडर गाडी घेवून ये. आता आमच्या साहेबांना कळायला नको का? रविवारी गाडीचं दुकानं बंद असतं म्हणून. त्यावर लगेच दुसरा सेक्रेटरी म्हणाला, आमचे साहेब तर महामूर्ख आहेत. ते मला म्हणाले. कार्यालयात जा आणि मी तिथे आहे की नाही ते पाहून ये. आता मला एक गोष्ट कळते. ते बसले त्या ठिकाणी फोन आहे. त्यांनी त्यांच्याविषयी फोनवरुन खात्री करुन घ्यायला काय हरकत आहे? असे हे मंत्री मूर्ख आणि त्यांचे सेक्रेटरी महामूर्ख. काय होणार या देशाचं!

मित्रहो, हा किस्सा या ठिकाणी नमूद प्रगल्भ झालेला असतो. तेच नेतृत्व देशाला पुढे नेते. सार्वभोम लोकशाहीत नेतृत्व देणाऱ्या नेत्याकडून लोकांच्या खूप अपेक्षा असतात. अलिकडील नेतृत्वाला लोकांची मते हवी आहेत, पण लोकांची मते मान्य करण्याचे औदार्य मात्र त्यांच्यात नाही. हे फार मोठे दुर्दैव आहे.

पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत आचार्य अत्रेंचे व्याख्यान होते. दोन दिवसापूर्वी न. र. फाटक त्याच विचारपीठावर बोलून गेले होते, इतिहास हा चिकित्सक दृष्टीनं लिहील्या गेला पाहिजे हे आग्रही प्रतिपादन करतांना इतिहासातील वास्तव आपण समजून घेतले पाहिजे. झाशीच्या राणीने युद्धात प्रत्यक्ष सहभाग घेतला का? यावर साधकबाधक चर्चा झाली पाहिजे. संशोधनात्मक लिखानही झाले पाहिजे. एक महिला चौदा तास अश्व स्वारी व रपेट करु शकते का? यातील वास्तव शोधले पाहिजे. या आशयाच मत मांडून अनेक भारतींयाच्या अस्मितेला या महान वक्त्याने धक्का दिल्याने त्यांच्या त्या विचाराला प्रत्युत्तर देण्याची संधी आचार्य अत्रेंना आपसुकच मिळाल्यामुळे न. र. फाटकांवर मुलूख मैदान तोफेचा मारा त्यांनी सुरु केला. लोकहो, थोर इतिहासकार न. र. फाटक दोन दिवसापूर्वी या व्याख्यानमालेत काही तरी बरळून गेल्याचे आम्ही ऐकले. कुठं आहे तो न. र. फाटक्या? तो म्हणतो झाशीच्या राणीने युद्ध केले का नाही? हे तपासून पाहिले पाहिजे. अरे फाटक्या, तिनं युद्धात भाग घेतला नाही तर काय तुझ्या बापानं भाग घेतला होता का रे! अरे एक महिला घोड्यावर स्वार होऊन तिच्या पाठीवर लहान मुल बांधलेले आहे, एका हातात तलवार आहे. दुसऱ्या हातात लगाम आहे. पाय रिकीबीत अडकवलेले आहेत आणि झाशीची राणी युद्धात तळपती विज होऊन शत्रूवर तुटून पडलेली आहे आणि हा फाटक्या म्हणतो,

(पान ६ वर)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य


(भाग १८)

रवींद्रनाथांची भारताला दिलेली सर्वात मोठी देणगी कोणती असा प्रश्न जर कोणी विचारला तर माझ्या मते आपल्या भारताचं राष्ट्रगीत 'जन-गण-मन' ही आहे. कारण रोज भारतातील लक्षावधी शाळांची सुरुवात या राष्ट्रगीताने होते. कोटी कोटी कंठातून हे राष्ट्रगीत निनादते. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या दिवशी ध्वजाला प्रणाम करताना जेव्हा राष्ट्रगीताचे सूर कानी पडतात, तेव्हा छाती अभिमानाने फुलून येते. एखाद्या चित्रपटगृहात चित्रपट पाहायला जाताना जेव्हा पडद्यावर राष्ट्रगीत सुरु होते, तेव्हा चित्रपटगृहात उपस्थित असलेली सगळी माणसे आपली भाषा, जात, धर्म, पंथ विसरून उभे राहून मानवंदना देतात, तेव्हा अभिमानाने रोमरोम फुलून येतो. कधी कुठे जाताना राष्ट्रगीताचे सूर कानी पडले तर नकळत पावले थांबतात. उभे राहा असे कोणी सांगावे लागत नाही. केवळ ५२ सेकंदात गायिले जाणारे हे राष्ट्रगीत रोमरोम पुलकित करते. जोपर्यंत हे सूर्य चंद्र आहेत, जोपर्यंत ही सस्यश्यामल भारतभूमी अस्तित्वात आहे, तोपर्यंत जन-गण-मन आहे आणि जोपर्यंत जण-गण-मन आहे, तोपर्यंत गुरुदेव रवींद्रनाथ टागोरही अमर आहेत. अशा या जन-गण-मन आणि रवींद्रनाथ टागोरांवर काही लोकांनी नको ते आरोप केले.

ज्या रवींद्रनाथांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली, स्वदेशीच्या चळवळीत पुढाकार घेतला, वंगभंगाला विरोध केला अशा देशभक्त आणि राष्ट्रभक्त रवींद्रनाथांना इंग्रज धार्जिणे म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली. तर काहींनी याच्याही पुढे जाऊन त्यांनी लिहिलेले जन-गण-मन हे पंचम जॉर्जच्या स्वागतासाठी लिहिले असे म्हटले. या सगळ्या गोष्टींमुळे रवींद्रनाथांच्या संवेदनशील मनाला अपार वेदना झाल्या. १९११ साली इंग्लंडचा राजा पंचम जॉर्ज भारतभेटीवर येणार होता. याच सुमारास वंगभंगाचा निर्णयही रद्द ठरवण्यात आला होता. तेव्हा तो आनंद साजरा करावा आणि पंचम जॉर्जचे स्वागत करावे असे ठरवण्यात आले. इंग्रज सरकारप्रती आपली निष्ठा अर्पण केलेले प्रद्योतकुमार ठाकूर हे रवींद्रनाथ टागोरांचे दूरच्या नात्यातील होते. प्रद्योतकुमार हे उच्चविद्याविभूषित होते पण इंग्रजांची चाकरी करण्यात धन्यता मानणारे होते. त्यांनी रवींद्रनाथांना पंचम जॉर्ज यांच्या स्वागतासाठी एक गीत लिहायला सांगितले. या गोष्टीचा रवींद्रनाथांना धक्का बसला आणि वाईटही वाटले. ब्रिटनचा स्वार्थावर आधारित राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. आपल्या प्रगतीसाठी दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करून त्याचे स्वातंत्र्य नष्ट करणे हे रानटीपणाचे लक्षण आहे असे त्यांचे मत होते. यालाच जर ही मंडळी 'आधुनिक राष्ट्रवाद' म्हणत असतील, तर राष्ट्रवाद या शब्दाची ही क्रूर चेष्टा आहे असे त्यांना वाटत होते.

इंग्रजांच्या चुकीच्या विचारांचा आणि धोरणांचा त्यांनी आपल्या भाषणातून आणि लेखनातून वेळोवेळी निषेध केला. त्यांनी पंचम जॉर्जच्या स्वागतार्थ गीत लिहिण्यासाठी प्रद्योतकुमार यांना स्पष्ट नकार दिला. कोणी सांगितले म्हणून एखाद्याच्या स्तुतीप्रित्यर्थ आपली लेखणी झिजवणाऱ्या कवींपैकी रवींद्रनाथ नव्हतेच. त्यांनी आपला राग व्यक्त करण्यासाठी पंचम जॉर्जला उद्देशून लिहिण्याऐवजी 'भारत भाग्यविधात्याला' उद्देशून हे गीत लिहिले. हा 'भारत भाग्यविधाता' कोण हे जरा समजून घेण्याचा प्रयत्न करू. रवींद्रनाथांना अपेक्षित असलेला हा भाग्यविधाता म्हणजे सर्व सृष्टीचा ईश्वर ज्याला ते मास्टर निर्मिक किंवा मास्टर पोएट म्हणून वेगवेगळ्या वेळी उल्लेख करतात. त्याशिवाय रवींद्रनाथांच्या कवितेत वेळो-वेळी असे निनावी व्यक्तिमत्व पाहायला मिळते. त्या शक्तीला त्यांनी जगन्नियंता किंवा विश्वाचे संचालन करणारी शक्ती अशा स्वरूपातच पाहिले आहे. उदा. मागील लेखातील या काव्यपंक्ती पहा. एका प्रसंगी त्यांनी पाहिले की शारदातले ढग निळ्या आभाळात विहार करताना खाली असलेल्या भाताच्या पिकावर छाया धरीत तरंगत होते. ह्या अद्भुत दृश्याचा त्यांच्या मनाने ताबा घेतला. त्यांना हे सुंदर दृश्य निर्माण करणाऱ्या कारागिरांच्या हातांची आठवण झाली. आपल्या कवितेत ते म्हणतात-

**खेळ चालिला आज लपंडावाचा**
**छाया आणि प्रकाशाचा**
**भाताच्या शेतातून,**



**झपाट्याने जाताना,**
**निळ्या आकाशात**
**तरंगणार्या पांढर्या ढगांचा ,**
**ताफा हाकणारा तो कोण आहे बरं?**

या अदृश्य हातांचा शोध घेण्याची त्यांना नेहमीच उत्कंठा असायची. तोच त्यांचा 'भारत भाग्यविधाता' आहे. भारतभूमीवर त्यांचे किती प्रेम आहे ते त्यांच्या एका कवितेच्या ओळींमधून स्पष्ट होईल. या ठिकाणी या ओळी लिहिताना मला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सागरा प्राण तळमळला या कवितेची आठवण येते. रवींद्रनाथ म्हणतात-

**सार्थक जनम आमार जन्मेछि एइ देशे।**
**सार्थक जनम मा गो, तोमाय भालबेसे।।**
**जानि ने तोर धन रतन,**
**आछे कि ना रानीर मतन।**
**शुधु जानि आमार अंग जुडाय**
**तोमार छायाय एसे।।**

या देशात जन्माला आलो म्हणून माझे सार्थक झाले. माते, तुझ्यावर प्रेम केल्याने माझा जन्म सार्थक झाला. तुझ्याकडे किती रत्नभांडार आहे, ते मला माहिती नाही. तू राणीसारखी आहेस का हेही ठाऊक नाही. मला फक्त एवढेच ठाऊक आहे की तुझ्या सावलीत मला शांती मिळते. त्यांचं देशप्रेम इतकं उत्कट आहे की या देशात त्यांना विश्वदेवाचं दर्शन घडतं.

**हे बिश्वदेब, मोर काछे तुमि देखा**
**दिले आज कि बेशे।**
**देखिनु तोमारे पुर्बगगने, देखिनु तोमारे स्वदेशे।।**

विश्वदेवाचे रूप त्यांना कसे भासते? तर नील गगन त्याचे भाल आहे. स्वच्छ प्रकाशात त्याला अखंड उज्ज्वलता प्राप्त झाली आहे. हिमालय जणू आशीर्वादरूपी कर उंचावून निर्भयतेचा वरदहस्त देत आहे. हा सागर त्याचे चरण धुतो आहे. जान्हवीरुपी हार त्याच्या वक्षावर रुळतो आहे. आपल्या देशातच आपल्याला परमेश्वराचे दर्शन होऊ शकते हेच जणू त्यांना सांगायचे आहे.

रवींद्रनाथांचे आप्त आणि इंग्रजांचे निष्ठावंत सेवक प्रद्योतकुमार ठाकूर यांनी त्यांना पंचम जॉर्ज यांच्या स्तुतीपर गीत लिहिण्यास सांगितले होते. परंतु राष्ट्रप्रेम नसानसात भिनलेल्या रवींद्रनाथांनी अशा प्रकारचे स्तुतीपर काव्य लिहिण्यास नकार दिला. स्तुतीच करायची तर ती मायभूमीची का करू नये या भावनेतूनच त्यांचे जन-गण-मन हे अप्रतिम राष्ट्रभक्तीपर गीत त्याच वेळी जन्मास आले. २६ ते २८ डिसेंबर १९११ या कालावधीत कलकत्याला राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले होते. २६ डिसेंबरची म्हणजे पहिल्या दिवसाची सुरुवात बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिलेल्या वंदे मातरम गीताने झाली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २७ डिसेंबर रोजी रवींद्रनाथांनी लिहिलेले जन-गण-मन गायिले गेले. या कार्यक्रमाचे वृत्तांकन करण्यासाठी देशविदेशातील पत्रकार उपस्थित होते. पण या ठिकाणी उपस्थित असलेल्या इंग्रजी वृत्तपत्रांच्या वार्ताहरांनी कार्यक्रमाबद्दल आणि जन-गण-मन या गीताच्या आशयाबद्दल पुरेशी माहिती न घेताच या गीताला पंचम जॉर्ज यांच्या स्वागतासाठी रचले गेलेले खास गीत असे म्हटले. या वृत्तपत्रांमध्ये प्रामुख्याने इंडिया, स्टेटसमन, इंग्लिशमन या सारखी वृत्तपत्रे होती. यामुळेच या गीताबद्दल लोकांच्या मनात गोंधळ निर्माण झाला. पुढे २८ डिसेंबर १९१७ मध्ये कलकत्याला पुन्हा काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात जन-गण-मन समूहगीत म्हणून गायिले गेले. त्याप्रसंगी देशबंधू चित्तरंजन दास उपस्थित होते. त्यांनी या गीताबद्दल 'It ir a rong of the glory and tibrory of India' असे उद्गार काढले. बेंगाली वृत्तपत्राने या गीताला The Magnifibent Song असे म्हटले. अमृतबझार पत्रिकेने या गीताला an Inriring Partiotib Song म्हटले. स्टेटसमन या इंग्रजी वृत्तपत्राने मात्र या वेळी या गीताचे' a National Song' म्हणून वर्णन केले.

या गीताच्या संदर्भात रवींद्रनाथांनी २० नोव्हेंबर १९३७ रोजी पुलिनबिहारी सेन यांना लिहिलेल्या पत्रात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते म्हणतात, त्या वर्षी भारत सम्राटाच्या आगमनाची तयारी चालली होती. राज्य सरकारमध्ये प्रतिष्ठित असलेल्या माझ्या एका मित्राने सम्राटासाठी स्वागत गीत लिहिण्याचा मला आग्रह करताच प्रथम मी चकित झालो आणि नंतर मनात क्षोभाची लाट उसळली. त्याचीच प्रतिक्रिया म्हणून जन-गण-मन अधिनायक या गीतात त्या भारत भाग्यविधात्याचा जयजयकार केला. हा भाग्यविधाता पंचम, षष्ठ किंवा कुठलाही जॉर्ज कधीच असू शकणार नाही. हे माझ्या राजनिष्ठ मित्रालाही कळले, कारण तो कितीही प्रबळ राजभक्त असला तरी बुद्धिमान होता. आज मतभेदामुळे लोक माझ्यावर चिडलेत, हे काळजीचं कारण नाही; पण लोकांचा जो बुद्धिभ्रंश झालाय, ते लक्षण बरं नव्हे.

२४ जानेवारी १९५० या दिवशी घटना समितीने कविवर्य रवींद्रनाथ यांनी लिहिलेल्या 'जन-गण-मन' या गीताला राष्ट्रगीताचे स्थान दिल्याचे जाहीर केले. २६ जानेवारी १९५० या दिवसापासून भारताची राज्यघटना अधिकृतरीत्या अमलात आली आणि त्याच दिवशी स्वतंत्र भारताचे अधिकृत राष्ट्रगीत म्हणून 'जन-गण-मन' चे स्वर निनादले. पण आज भारतीय स्वातंत्र्याला ७७-७८ वर्षे होऊन गेली तरी १९११ मध्ये लिहिल्या गेलेल्या या गीताबद्दल लोकांच्या मनात गैरसमज आहेत.

'वंदे मातरम' ला राष्ट्रगीताचा मान मिळायला हवा होता, हे मान्य केले तरी 'जन-गण-मन' बाबत गैरसमज पसरवून आपण एका अत्यंत अप्रतिम राष्ट्रभक्तीपर साहित्यकृतीचा आणि रवींद्रनाथांसारख्या महाकवीचा अवमान करीत आहोत याचे भान आपण राखायला हवे.

# ग्रहसंकेत

**(रविवार, १३ ऑक्टोबर ते शनिवार, १९ ऑक्टोबर २०२४)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

**ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)**

✲ **रविवार, १३ ऑक्टोबर-** पाशांकुशा (स्मार्त) एकादशी, श्री मध्दाचार्य जयंती, श्री भवानी यात्रा सावर्डे, धावीर पालखी कोकबन (रोहा), श्री सिध्देश्वर यात्रा बेडकीहाळ ✲ **सोमवार, १४ ऑक्टोबर-** भागवत एकादशी, क्षीरदान- द्विदल व्रत, संत बाळूमामा जन्मोत्सव आदमापूर, हरिबाबा प्रकटदिन फलटन ✲ **मंगळवार, १५ ऑक्टोबर-** भौम प्रदोष, भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन, राष्टीय विद्यार्थी दिन, अंध साहाय्यता दिन, धुळगावकर महाराज जयंती, सातेरी देवी उत्सव कोवाडे (आजरा) ✲ **बुधवार, १६ ऑक्टोबर-** कोजागरी पौर्णिमा, आकाश दीपदान, श्री लक्ष्मी पूजा, इंद्र पूजन, शरद पौर्णिमा (रात्री ८.४१ नंतर), भवानीदेवी उत्सव तुळजापूर, बिरदेव यात्रा सालपे ता. फलटण ✲ **गुरुवार, १७ ऑक्टोबर-** नवरात्र पौर्णिमा (सायं. ४.५६ पर्यंत), कुलधर्म, कार्तिक स्नानारंभ, महर्षी वाल्मिकी जयंती, जगदंबा यात्रा पांडे ता. करमाळा, कावेरी चंक्रमण स्नान ✲ शुक्रवार, १८ ऑक्टोबर- कार्तिक स्नानारंभ, कुलधर्म, ज्येष्ठ अपत्यास ओवाळणे, नव्वान प्राशन (सायं. ४:५६ पर्यंत), अन्वाधान, आग्रयण, महर्षी वाल्मिकी जयंती, जगदंबा यात्रा पांडे, कावेरी संक्रमण स्नान, राऊळ महाराज जयंती, आयंबील, ओवी समाप्ती (जैन) ✲ **शनिवार, १९ ऑक्टोबर-** तृत्तीया श्राध्द, पंत महाराज बाळेकुंद्री पुण्यतिथी उत्सव बेळगाव

**मुहूर्तः-** ✲ **साखरपुडा-** १३, १६, १७, १८ (१३ पर्यंत) ऑक्टोबर ✲ **डोहाळ जेवण-** १७ ऑक्टोबर (१६ नंतर), १८ (१३ पर्यंत) ऑक्टोबर ✲ **बारसे-** १७, १८ (१३ पर्यंत) ऑक्टोबर ✲ **जावळ-** १३, १७, १८ (१३ पर्यंत) ऑक्टोबर ✲ **गृहप्रवेश-** १३, १७, १८ (१३ पर्यंत) ऑक्टोबर.

### मेष :- संधीचे स्वागत करावे

चक्रव्यूह रचणारे आपलेच असतात. कालपण व आजही हे सत्यच आहे. मंगळवारी होणारा शुक्र- नेपच्यूनचा त्रिकोण योग कला गुणांचा विकास करणार आहे. सरकारी कामे मार्गी लागतील. जुने येणे वसूल होईल. उत्साह, धडाडी वाढेल. नव्या संधीचे स्वागत करावे. नव्या विचारांना चालना मिळेल. यांत्रिक क्षेत्रात प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १५, १७

### वृषभ:- चांगल्या संधी लाभतील

समजदार व स्वमताग्रही यात काही फरक नसतो. हे दोघेही कोणाचेच ऐकत नाहीत. राशी स्वामी शुक्राचा नेपच्यूनशी होणारा त्रिकोण योग कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडविणारा आहे. निर्धाराने वाटचाल करावी. यश मिळत जाईल. नव्या विचारांना चांगल्या संधी लाभतील. अपेक्षीत फलप्राप्ती होईल. यांत्रिक क्षेत्रात विशेष प्रगती होईल. शुभ ता. १६, १७

### मिथुन:- नव्या कामांना गती

मन नेहमी शांत ठेवा. वेळ आणि दिवस आपोआप निघून जात असतात. शुक्र- नेपच्यून त्रिकोण योग कलेचा विकास करणारा आहे. उत्साहाने योग्य प्रकारे प्रगती करता येईल. नव्या कामांना गती मिळेल. फार दगदग करू नका. नव्या योजना मार्गी लावता येतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षापूर्ती करणारा कालावधी आहे. सुसंधी लाभतील. शुभ ता. १५, १८

### कर्क:- घाईने निर्णय नको

ज्या प्रकारे 'कसं तरी होतंय' ला औषध नाही. त्याप्रमाणे 'कुठे तरी निघून जाव'ला पण गाडी नाही. पंचमातील शुक्राचा नेपच्यूनशी होणारा त्रिकोण योग उद्योग व्यवसायात प्रगती करणारा आहे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. घाईने कोणताही निर्णय घेऊ नका. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान लाभेल. अनावश्यक खर्च टाळावा. शुभ ता. १५, १७

### सिंह:- मनासारखी प्रगती

नखे वाढली तर बोटे कापत नाहीत. त्याप्रमाणे नात्यात दुरावा आला, तर दुरावा दूर करावा, नाते नाही. सुखस्थ शुक्रामुळे सुख स्वास्थ लाभेल. ज्ञानदान, बॅंक, विमा अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. अडचणीतून मार्ग निघेल. सट्टा, लॉटरीपासून दूर रहावे. आलेले कळेल पण, गेलेले कळणार नाही. शुभ ता. १३, १५

### कन्या:- नव्या विचारांना चालना

आयुष्यात नेहमी सकारात्मक विचार करा. वाईट दिवस आले म्हणून खचून जाऊ नका. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक कालावधी आहे. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. कोणाशीही शत्रूत्व भावना ठेवू नका. अडचणीतून वेळीच मार्ग निघेल. प्रगती होईल. शुभ ता. १६, १७

### तुला:- सुख स्वास्थ लाभेल

कालच्या दिवसापेक्षा येणारा दिवस चांगला राहिल. या विचारामुळे निराशा येणार नाही. राशीतील रवि-बुधामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. अडचणी कमी झाल्याने सुख समाधान लाभेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहील. उत्साहवर्धक घटना घडतील. अपेक्षीत प्रगती होत जाईल. चिंता नको. शुभ ता. १७, १८

### वृश्चिक:- सुखाच्या घटना

उपवास नेहमी अन्नाचाच का? लोभ, चहाडी, क्रोधादि विचारांचा असावा. राशीत शुक्र आल्याने सुखाच्या घटना घडतील. महत्त्वाच्या विचारांना गती देता येईल. सर्व प्रतिकूलतेतून मार्ग निघत जाईल. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. सरकारी कामे विचारपूर्वक करावीत. प्राप्ती समाधानकारक राहिल. कला-गुणांचा विकास होईल. शुभ ता. १६, १८

### धनु:- अपेक्षित कामे होतील

खोटे व चलाखी नात्यात करू नका. नाही तर एकेदिवशी आपण एकटेच पडाल. सप्तमातील मंगळामुळे कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. आर्थिक स्थितीत समाधानकारक घटना घडतील. स्थावर प्रश्न वाढवू नका. अपेक्षित कामे होतील. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. गुंतवणूक विचाराने करावी. महत्त्वाच्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. १७, १८

### मकर:- सुख स्वास्थ लाभेल

जो पर्यंत घरात माता- पिता आहेत. तो पर्यंत घराला घरपण आहे. कर्मस्थ रवि- बुधामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. यांत्रिक, तांत्रिक क्षेत्रात सुसंधी लाभतील. सर्व प्रतिकुलतेवर मात कराल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या योजना विचारपूर्वक स्विकाराव्यात. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. सुख स्वास्थ लाभेल. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १६, १७

### कुंभ:- कलेचा विकास

माणसांना ओळखणे जीवनातील सर्वात कठीण काम आहे. वस्त्र प्रावरणे, खाद्य पदार्थ अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. वैद्यकिय, कृषि, संरक्षण अशा क्षेत्रातही आणखी अनुकूलता वाढेल. कलेचा विकास होईल. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. नव्या संधी लाभतील. लाभ उठवावा. शुभ ता. १६, १७

### मीन:- प्रतिकुलतेवर मात कराल

योजना जितकी गुप्त राहिल, तितके यश उच्च राहिल. राशीतील नेपच्यूनचा शुक्राशी होणारा त्रिकोण योग लाभदायक ठरणारा आहे. अडचणी कमी झाल्याने समाधान वाटेल. फार धावपळ, दगदग करू नका. सरकारी कामे पूर्वाधात करावीत. सर्व प्रतिकुलतेवर मात कराल. अपेक्षित संधी लाभतील. चिंता नको. शुभ ता. १६, १४

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## संत साहित्यातील कर्मयोग

त्याने ते कर्म मनोभावे आचरण केल्यास व त्याला ईश्वरी मनोभावाचे संकेतीय कर्म मानल्यास त्या कर्मामध्ये ईश्वरप्राप्तीची ताकद असते, असे संत ज्ञानेश्वर सांगतात.

**तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागीं।। (ज्ञाने. १८/९१७) म्हणोनि मोक्षलाभालागीं। जो व्रते वाहातसे अंगी। तेणें स्वधर्मु आस्था चांगी। अनुष्ठावा।।** (ज्ञाने. १८/९२२) कर्मे ईशू भजावा श्रमयुक्त कर्मामध्येच ईश्वराचा वास असतो. म्हणून श्रमाची महती जीवनामध्ये अनन्यसाधारण आहे.

'कर्म हीच पूजा' मानून कर्मामध्येच ईश्वराला म्हणजे साक्षात मला भजावे, असे भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये सांगतात. कर्मापासून फळाची अपेक्षा बाळगणे म्हणजे कर्मबंधनात अडकून राहणे होय. कर्मफळाची अपेक्षा बंधनात अडकवणारी असते. त्यासाठी फक्त कर्माचा आस्वाद घ्यावा. योग्य कर्माचे फळ हे निश्चितच गोड मिळणार असते. **तैसा कर्तृत्वाचा मृदु। आणि कर्मफळाचा आस्वादु। या दोहिचे नाव बंधु। कर्माचा की।।** (ज्ञाने. १८/२०५) ज्याला कर्तृत्वाचा अभिमान होतो, जो कर्मफळाच्या आशेने आशारूपी कर्मफलामध्ये बद्ध होतो. आपल्याकडून न झालेल्या कर्माचा मीच कर्ता आहे, असे जो भासवितो.

असे लोक दुसऱ्याचे ओझे स्वतःच्या खांद्यावर घेतात व त्या ओझ्याखाली दबून जातात. त्यांचे ते कर्म मूर्खपणाचे असते. **देखे पुढिलांचे ओझे। जरी आपुला माथा घेईजे। तरी सांगे का न दाटिजे । धनुर्धरा।। तैसी शुभाशुभे कर्मे। जिये निफजती प्रकृतिधर्मे। तिये मूर्ख मतिभ्रमे। मी कर्ता म्हणे।।** (ज्ञाने. ३/१७७-१७८) प्रयत्नाने प्रारब्धावर विजय मिळविता येतो.

कोणत्याही कार्याच्या पाठीमागे कष्ट उपसण्याची तयारी असेल तर ते कार्य सिद्धीस गेल्याशिवाय राहत नाही. म्हणून यत्नवादानेच जगातील मोठमोठी कार्ये यशस्वीपणे पार पडलेली आहेत. प्रत्येक कार्याच्या यशाचे गमक प्रयत्नवादच होय. 'प्रयत्नांती परमेश्वर' या उक्तीप्रमाणे परमेश्वरालासुद्धा प्राप्त करून देण्याची क्षमता प्रयत्नांमध्ये आहे. म्हणूनच 'यत्न तोची देव जाणावा' अशी शिकवण संत तुकारामांनी दिलेली आहे. आपल्या कर्माशी जो प्रामाणिक असतो, तत्पर असतो, तोच ज्ञानप्राप्तीसाठी पात्र असतो. त्यालाच भगवंताची प्राप्ती होत असते. **स्वे स्वे करमण्यभिरतः संसिंद्धि लभते नरः। स्वकर्म निरंतः सिद्धी यथा विन्दति तृच्छृणु।।** (गीता १८/४५) स्वतःच्या कर्मानेच मनुष्य हा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो. स्वकर्मेच त्याला विशिष्ट ठिकाणी पोहोचवत असतात. ज्ञानप्राप्तीनंतर जशी कर्माची चिंता उरत नाही, त्याचप्रमाणे जीवनामध्ये कर्मयोगाला जर आत्मज्ञानाची जोड दिली तर जीवन कृतकृत्य होते, असे संत ज्ञानेश्वर सांगतात.

**हारपले दावूनि जैसा। मागु सरे वीरविलासा । ज्ञानचि कळस वळघे तैसा। कर्मप्रासादा।। म्हणौनी ज्ञानिया पुरुषा। कृत्य करुं सरले देखा।। ऐसा अनाथांचा सखा । बोलिला तो।। (ज्ञाने.) अशाप्रकारे संतांचा कर्मयोग हा कर्माची योग्य गती विशद करणारा आहे.**

विजयादशमी (दसरा) हा साडेतीन मुहूर्तापैकी एक आहे. पांडव अज्ञातवासात राहण्याकरिता म्हणून विराटाच्या घरी गेले. त्यावेळी त्यांनी आपली शस्त्रे अरण्यात शमीच्या झाडावर ठेवली होती. शेवटी अज्ञातवास संपल्यावर त्यांनी तेथील शस्त्रे परत घेतली व शमीची पूजा केली. तो दिवस आश्विन शुध्द १० हा होता. दसर्याच्या दिवशी अपराजिता देवीचे पूजन सीमोल्लंघन व शमीची पूजा करण्याची प्रथा आहे. गावच्या ईशान्य दिशेस जावून शमीची, शमी नसेल तर आपट्याच्या झाडाची पूजा करावी. नंतर त्या शमीची अगर आपट्याची पाने तोडून आणून, ती सोने म्हणून इष्टमित्रास वाटावी व घरी परत यावे. घरी आल्यावर ओवाळून घ्यावे, अशा रितीने सर्व दिवस आनंदात घालवावा, असे धर्मग्रंथात म्हटले आहे. दसऱ्याच्या निमीत्ताने आपण शमी, आपटा तसेच अन्य काही वनौषधींची माहिती घेऊया...

# शमी, आपटा, झेंडूचे औषधी उपयोग






आजीचा बटवा

नारायण कारंजकर

भ्र. ९४२३७५८४०१

**शमीः-**

**विविध भाषी नावेः-** शमीस संस्कृत- केशहंत्री, हिंदी- छिकूर, गुजराथी- खिजडी, लॅटीन- प्रोसांपिस सीनेरारिआअशी विविध भाषेत नावे आहेत.

**उपयोगी अंगः-** शमीची पंचांग औषधीदृष्टया उपयुक्त आहे.

**गुणधर्मः-** शमीचे तुरट, कडू, दमा, खोकलानाशक असे गुणधर्म आहेत.

**उपयोगः-** १) आगपेणीवरः- शमीचा पाला गाईच्या दह्यात वाटून लेप करावा. २) उन्हाळ्यावर शमीच्या तुवण्याचा रस गाईच्या दुधात वाटून तो जिरेपूड व पीठीसाखर घालून द्यावा. ३) मूत्रातून धातू अगर खर पडत असल्यास शमीच्या तुवण्याचा रस गाईच्या दुधात वाटून जिरेपूड व खडीसाखर घालून द्यावा. ४) प्रमेह, धुपणीवर शमीचा अर्धातोळा रस तांदुळाच्या धुवणात द्यावा. ५) गर्मीवर शमीच्या तुवण्याचा अथवा पाल्याचा रस, जिरे व खडीसाखर घालून १४ दिवस द्यावा.

**आपटाः-**

**विविध भाषी नावेः-** आपट्यास संस्कृत- अश्मंतक, हिंदी- कचनार, गुजराथी- आसोंदरो, लॅटिन- बोहिनिआ रासेमोसा अशी विविध भाषेत नावे आहेत.

**उपयोगी अंगः-** आपट्याचे पान, फूल, साल व मूळ हे उपयुक्त अंग आहे.

**गुणधर्मः-** आपट्याचे तुरट, शीतल व ग्राहक हे गुणधर्म आहेत.

**उपयोगः-** अतिसार- पानांचा रस व मिरी किंवा कोवळी फुले व मिरी द्यावीत. २) तापातील डोकेदुखी- कोवळी पाने वाटून त्याचा लेप डोक्यावर लावावा. ३) लघवीतून खर पडत असल्यास कोवळ्या पानांचा रस दुधातून द्यावा. ४) आपट्याचा पाला, कारल्याच्या वेलीचा पाला व माका यांच्या समभाग रसात कुड्याचे पाळ उगाळून नाळ-गुदात द्यावे. ५) वायुगोळा झाला असता आपट्याच्या पाल्याच्या रसात मिरेपूड मिसळून द्यावी. ६) यकृत शोच व जंतावर आपट्याच्या मुळाच्या सालीचा काढा द्यावा.

**झेंडू :-**

दसऱ्याच्या दिवशी झेंडू फुलांना विशेष महत्व असते. नवरात्रात झेंडूच्या पानाची (मखमल) देवीस माळ घालतात. पूजेसाठी झेंडूची फुले घेतात. दसऱ्याच्या दिवशी दुकाने, घरांच्या दारांना झेंडू फुलांचे तोरण बांधतात. मोटारी, सायकली आदी वाहने, यंत्रसामग्री आदिंना झेंडू फुलांच्या माळा घालून त्यांचे पूजन केले जाते.

**विविध भाषी नावेः-** संस्कृत- झंडू, हिंदी- गेंदा, गुजराथी- गलमोटो, लॅटिन- टाजेटेस इरेक्टा अशी झेंडूस विविध भाषेत नावे आहेत.

**उपयोगी अंगः-** झेंडूचे पंचांग औषधीदृष्टया उपयोगी आहे.

**गुणधर्मः-** झेंडूचे रक्तपितशामक, व्रणशोधक असे गुणधर्म आहेत.

**उपयोग :-** १) शीतपित्तावर झेंडूच्या पाल्याचा रस काढून चोळावा. २) रक्ती मूळव्याध रक्ती मूळव्याधीतील रक्तस्राव बंद करण्यासाठी झेंडूच्या फुलाच्या पाकळ्याचा रस अर्धा तोळा तुपात साखर मिसळून द्यावा. ३) सुरवंट लागून आग होत असल्यास झेंडूचा पाला त्यावर चोळावा कोणतीही जखम झेंडूच्या पाल्याच्या कल्काने बरी होते. ४) मूळव्याधीच्या कोंब्यावर झेंडूची फुले, हळद, तूप व मीठ घालून पोटीस बांधावे व शेकावे, म्हणजे सूज व कळा कमी होतात.

पान ४ वरून

## 'स्मरणगाथा' एका भ्रमतीमधील...

विद्यार्थी म्हणून आल्यावर संत गाडगेमहाराजांचा शिष्य म्हणून चार वर्षे केलेले कीर्तने आणि कीर्तनकाराचा पेहराव उतरवून विद्यार्थी म्हणून जगणे इतके सोपे नसते पण ते काम दांडेकरांनी सहज केले. वारकरी शिक्षण संस्थेत शिकत असताना माधुकरी मागून खाणे, तेलकट तुपकट खाणे चालत नसल्यामुळे ते इंद्रायणी नदीमध्ये धुऊन खाणे. याशिवाय वारकरी शिक्षण संस्थेमध्ये सोनूमामा जो तत्त्वज्ञान या विषयात एम. ए. झाला होता. त्याचे तर्कशास्त्र, इतर अनेक महाराजांची भजन कीर्तन अशा गोष्टीं लेखकांनी सांगितल्या आहेत. कीर्तनाचा उपयोग स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रहासाठी करत दांडेकर देशभक्तीचा धडाही गिरवत होते. देशासाठी तुरुंगात गेल्यावर तेथे सुद्धा गोविंद शास्त्री जोशी यांच्याकडून संस्कृत, कौमुदी आणि वासुदेवराव मेंडकी यांच्याकडून बुद्धिबळाचे पाठ गिरण्याचे काम त्यांनी केले. तुरुंगातून सुटल्यावर धुळे येथे श्रीधर पाठक यांच्याकडे व्याकरण आणि शांकरवेदांत शिकण्यासाठी गेल्यावर सरस्वती पाठशाळेमध्ये त्यांचे शिक्षण सुरू झाले. एका विद्यार्थ्याने दुसरे विद्यार्थ्याला शिकवावे ही पद्धत सुद्धा तिथे होती. अमर हा बौद्ध पंडित होता. त्याने निर्माण केलेला कोश पाठ केल्याशिवाय व्याकरणाच्या अध्ययनाला प्रारंभ होऊ शकत नाही, असे महत्त्वाचे उदाहरण लेखकाने या पाठात केले आहे. वेदांत कळायचा तर व्याकरणाची गरज होती आणि व्याकरण शिकायचे तर अमर पंडिताने तयार केलेला कोश वाचणे आवश्यक होते. गीताभाष्य अभ्यास झाल्यावर नऊ वर्षांनी लेखकाचे घरी परतणे. नर्मदा परिक्रमातील अनुभव स्मरणगाथेत लेखकाने लिहिले आहेत. नर्मदा परिक्रमेत जेव्हा त्यांना कोणी ते कोणी पंडित आहेत का, असा विचारायचे त्यावेळी आपण कोणी पंडित नसून विद्यार्थी आहोत असे ते सांगायचे. आजीवन विद्यार्थी राहून गो. नि. दांडेकर चराचराच्या कणाकणातून सातत्याने काही ना काही शिकताना दिसतात. हरी किर्तन पाठशाळा भरवून तिचा प्रधान अध्यापक म्हणून दांडेकरांनी काम करावे. अण्णा आणि बापू या दोघांनी संगीत- शिक्षणाकडे लक्ष द्यावे. मुलांकडून कीर्तन पाठ करून घ्यावी या विचारातून त्यांनी कीर्तन शाळा सुरू केली. तिथून पुढे इंदूरला दिवाळी शिक्षण वर्गात निरनिराळे खेळ, लाठी- काठी इत्यादी शिकवलं जाणार म्हणून लेखक तिकडे गेले. तेथील आठ दिवसात सुशिक्षित लोकांसोबत आणि शिस्तप्रिय लोकांसोबत त्यांचे जीवन बदलले. संघाचे अनेक कार्यकर्ते जवळून पाहिले. तिथून परतल्यावर मंडलेश्वर येथे शाखा सुरू केली. या शिक्षित वस्तीत संघकार्याच्या शाखेची व्यवस्था लावून पुन्हा इंदूरला प्रचारक म्हणून जाण्याचे त्यांनी ठरवले. कन्नोद येथे वाचनालयातून वेगवेगळी पुस्तके वाचत असताना त्यांनी लहान सहान कविता लिहून काढायला सुरुवात केली. इंदूरला अधिकारी शिक्षक वर्ग त्यांची निवड झाली. पुढे उज्जैनला संघकार्य त्यांनी शिकवले. सतरा वर्षाच्या प्रचंड धावपळीत तब्येत खराब झाली म्हणून त्यांना परत पाठवण्यात आले. घर सोडल्यापासून सतरा वर्षाचा त्यांचा हा प्रवास म्हणजे ही स्मरणगाथा होते. या स्मरणगाथेत पायाला भिंगरी लावून फिरणारे लेखक पावलोपावली सातत्याने काही ना काही शिकत असताना दिसतात. सातवीपर्यंत शालेय शिक्षण झाल्यावर जीवनाच्या शाळेतच लेखकाने घेतलेले अनुभवातील शिक्षण फार मोठे आहे. स्मरणगाथेत अनेक व्यक्तीदर्शने आपल्याला घडतात. भ्रमणातील सत्य आणि सौंदर्य आणि शिवाचा नसला तरी मन:शांतीचा शोध घेण्याचा लेखकाचा ध्यास वाचताना गाडगेमहाराज, नीलकंठ दांडेकर, सदगुरू स्वयंप्रकाश, श्रीधर शास्त्री पाठक, मारुतीबुवा गुरव, कैकाडी महाराज, गोपाळ स्वामी अशा विविध विभूतींचे वेगवेगळे पैलू आपल्याला सापडत जातात. स्मरणगाथा हे आत्मचरित्र म्हणजे जीवन शिक्षण देणारी पाठशाळा आहे असे म्हणावे वाटते.

पान ५ वरून

## आचार्य अत्रेंच्या वक्तृत्व बॉम्बगोळ्याने...

तिनं युद्धात भाग घेतला का नाही? त्या फाटक्याला आत्ता इथं धरुन आणा. या खुर्चीत धरुन बसवा. मी ती खुर्ची पुढं- मागं, पुढं-मागं करतो. त्या फाटक्याचं धोतर अर्ध्या तासात पिवळं नाही झालं तर अत्रे नाव लावणार नाही. घोड्यावर बसणं, लढणं आणि परत जिंकणं काय असतं हे त्याला दाखवतो. चौदा तासात त्याचं धोतर किती वेळा पिवळं होईलं? याचा हिशोब घरी गेल्यावर लावा. बरेचदा अत्रेंचा विनोद अनेकांना असा जीवघेणा वाटायचा, पण जेव्हा आपल्या विचारामुळे अनेकांच्या भावनेला ठेच पोहचणार आहे. त्यावेळी त्या विचारांचे दुरगामी परिणाम वक्त्याने लक्षात घेणे गरजेचे असते किंवा त्या विचारावर होणारा प्रतिहल्ला परतवून लावण्याची तेवढी वैचारिक आणि मानसिक तयारी ठेवणे गरजेचे असते. नसता लगेच, नाही मला तसे म्हणायचे नव्हतेच माझ्या शब्दांचा चुकीचा अर्थ लावल्या गेला असे म्हणून बूमरँग करणारे अनेक महान वक्ते आज आपण पाहतोच.



असाच एक प्रसंग सातारा येथील १९६२च्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनातील. परिसंवादाचा विषय होता.'श्लील आणि अश्लील साहित्य' विषय प्रतिपादनासाठी अगदी सुरुवातीलाच अत्रेंचे नाव सूत्रसंचालकांनी सूचविले. त्यामुळे अत्रे थोडे नाराजच होते. अगदी आघाडीचा फलंदाज होण्यात त्यांना फारसे स्वारस्य नव्हते, कारण वक्तृत्व क्षेत्रातील त्या फलंदाजाला इतरांची विकेट घेण्याची संधी नसते. अशी संधी हा तर अत्रेंचा श्वास. आरंभीचा वक्ता हा श्वासाशिवाय भाष्य करतो असे त्यांना वाटायचे. चौकार षटकार नाही. ही कसली जुगलबंदी? असे त्यांना वाटून गेले पण काही क्षणात त्यांच्या वाटण्याचा अंदाज खोटा ठरला. निमंत्रित वक्त्यामधून एक उतावळा आवाज आला. कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे माझा पहिला क्रमांक आहे. तो आवाज जेष्ठ समिक्षक श्री. के. क्षिरसागर यांचा होता. अत्रेंना नेमके हेच पाहिजे होते. परिसंवादाचे अध्यक्ष काकासाहेब गाडगीळांनी अत्रेंना थांबण्यासाठी सांगितले.

काही वेळाची यशस्वी माघार अत्रेंना सुखद धक्का देणारी होती. क्षीरसागर म्हणाले, साहित्यात श्लील, अश्लील असे काही नसतेच. ते पहाणाऱ्यांच्या दृष्टीवर अवलंबून असते. एक स्त्री स्नानगृहात स्नान करते यात अश्लील काहीच नाही, पण ते बाहेरुन पाहून कोणी त्याची वर्णने लिहू लागला तर ते अश्लील होय. त्यानंतर अत्रे बोलायला उभे राहिले आणि म्हणाले, लोक हो! साहित्यातील श्लील आणि अश्लीलचा विचार आपण नंतर करुया! प्रथम या सभेत असा ठराव घेवू या. या वयात क्षीरसागरांनी असं दुसऱ्यांच्या स्नानगृहात डोकावून पाहू नये! हशा आणि टाळ्यांनी सभागृह दणाणून गेले. क्षिरसागरांनी मानेला झटके देऊन डोके बडवून घेतले.

अत्रेंच्या अगोदर बोलणे एवढे महागात पडेल याचा त्यांनी स्वप्नातही विचार केला नसेल. अत्रेंनी मात्र एक पाऊल मागे येवून क्षीरसागरांचा कडेलोटच केला होता. यामुळेच आपल्या आयुष्यात कोणतीही घेतलेली माघार हा आपला कायम स्वरुपी पराभव आहे, असे कोणीही समजू नये. आचार्य अत्रेंच्या उत्स्फूर्त विनोदातून ही विचारी आणि विवेकी मानसिकता त्यांच्या साहित्य अभ्यासकांना प्राप्त होवो. असा आशावाद बाळगण्याचा मोह होतो.

# चिंता- मीमांसा आणि काही उत्तरे

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २३७



जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर चिंता, काळजी, धास्ती, दडपण आणि शेवटी त्याचे रूपांतर भीती याचा अनुभव सगळ्यांना येतो. ही जाणीव आणि तिचा स्वीकार ही पहिली निरामय पायरी असते चिंतेचे व्यवस्थापन करण्याची आणि स्वतःच्या तदानुषंगिक संवेदनांना हाताळण्याची. थकवा, शिणवटा, मनातील कोलाहल आणि विनाकारण हृदयाची धडधड अशी काही लक्षणे सुरुवातीला जाणवतात.

आपल्याला तीन मार्ग उपलब्ध असतात चिंतेच्या हाताळणीसाठी

**आकलनाच्या वाटेने**
**शारीरिक उत्तरांमधून**
**भावनिक आधार शोधून**

हे सगळे रस्ते लवचिक, अंमलात आणण्यास सोप्पे आणि सहजसाध्य आहेत. काही उपचार बालकांसाठी आहेत, काही प्रौढांसाठी आहेत पण सगळेच घरात किंवा घराबाहेर अंमलबजावणीसाठी व्यावहारिक आहेत. स्वतःला अनुरूप उपचार निवडावेत एवढेच लक्षात ठेवावे. मात्र कोणतीही पद्धत स्वीकारली तरीही एक आवर्जून लक्षात ठेवावे लागते- या परावलंबी, दुसऱ्या कोणीतरी करावयाच्या पद्धती नाहीत. या सुधारणा आपोआप होत नाहीत. स्वतः पुढाकार घेऊन काळजीपूर्वक वाटचाल ज्याची त्याला करावी लागते. हे दुरुस्तीचे कामकाज इतरांवर सोपवून चालत नाही.

उदाहरणार्थ आपण ताकत आणि प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी व्यायामशाळेत जातो. तेथे नियमित घाम गाळावा लागतो, वेळ आणि ऊर्जा द्यावी लागते. स्वतःला काय फरक जाणवताहेत याची नोंद ठेवावी लागते. एखादे दिवशी सोपे व्यायाम प्रकार (थकल्यासारखे वाटत असेल तर) आणि अनुशेष भरून काढण्यासाठी एखादे दिवशी भरपूर आणि कठीण व्यायाम निवडता येतात. पण हे काम व्यायामशाळेच्या निदेशकावर सोपवून चालत नाही. हेच उत्तर आहे स्वतःच्या काळजीला हद्दपार करण्यासाठीचे.

जेव्हा आपण नैसर्गिक नाही आहोत असं जाणवतं तेव्हा इतर अनुत्पादक विचार, गोष्टी, कामे बाजूला सारावीत. बोऊर्न आणि गरानो आपल्या २०१६ सालच्या या विषयावरील पुस्तकात खालील दहा उपाय सुचवितात. यातील काही मॅस्लोच्या १९५४ सालच्या संकल्पनेशी मिळते-जुळते आहेत.

(१) शरीर आणि स्नायू ताणून न धरता त्यांना मोकळे करावे आणि श्वास नियमन करावे. योग, ध्यान आणि श्वसनाचे व्यायाम यासाठी हे सुनियोजित उपक्रम आहेत.

(२) कल्पनाचित्रांचा वापर करावा- नजरेसमोर चित्र आणावे. संगीत, ध्यान अशा मार्गांनी मनाला मोकळे करावे.

(३) विचारांचे संरचना बदलावे आणि मग पर्याय सुचतील आणि तणावांच्या घटनांना सामोरे जाता येईल.

(४) ज्याचे भय वाटते, तेच वाट्याला आले आहे, अशी कल्पना करावी. यावरून लक्षात येईल की या गोष्टी दरवेळी बदलत असतात आणि काल्पनिक परिणाम कधीच अस्तित्वात येत नाहीत.

(५) नियमित व्यायाम, शारीरिक हालचालींनी मन तसेच शरीर तयार होते आणि मग वेदना, दमणूक यांना मागे ढकलता येते. उलट नंतर या गोष्टी आठवून हसू येते.

(६) आहार मध्यम आणि पोषक असावा याकडे लक्ष द्यावे.

(७) दैनंदिनी सोप्पी करीत जावी. कालची चिंता आणि उद्याची काळजी सोडावी आणि वर्तमानात जगावे. अनावश्यक आणि टाळता येण्याजोगे तणाव दूर होतात.

(८) स्वतःच्या पुनर्भरणासाठी (रिफील) वेळ राखून ठेवावा, विशेषतः रात्रीची निद्रा!

(९) काळजी वाटायला सुरुवात झाल्याझाल्या तिला थोपवावे.

(१०) हाताशी सहजी उपलब्ध असलेले पर्याय (मित्राला फोन करणे, शारीरिक व्यायाम करणे, संगीत ऐकणे) विकसित करावे.

**जुळवून घेण्याची पूर्वतयारी -**

ज्या तणाव निर्माण करू शकणाऱ्या प्रसंगांमुळे, घटनांमुळे मनुष्य अस्वस्थ होतो, काळजी करू लागतो अशांना हाताळण्यासाठी पूर्वतयारी आवश्यक असते.

(अ) भावनाधिष्ठित (लझर्स आणि फॉल्कमन, १९८४) यालाच पुढे ली, कूपर, ब्रॅडली, शूलमन यांनी २०१२ साली स्वीकाराधिष्ठित संकल्पना असेही नांव दिले.

**भावनाधिष्ठित /स्वीकाराधिष्ठित उपचार-**

तणाव निर्माण करणाऱ्या परिस्थितीला भिडताना आपल्याला नक्की कसे वाटत असते याचे इथे विश्लेषण केले जाते आणि आवश्यक असल्या तर त्या संवेदना कशा बदलता येतील याचाही विचार केला जातो. उदा-

(अ) स्वजनांजवळ मन मोकळे करणे

(ब) माणसांमध्ये झालेल्या चांगल्या बदलांची नोंद घेणे, स्वतःमध्ये चांगले बदल झाले असतील तर त्याचीही कारणे शोधणे

(क) तणाव निर्माण करणाऱ्या घटकांकडे बघण्याचा चष्मा बदलणे- सकारात्मक नजरिया विकसित करणे

(ड) आधारासाठी प्रार्थना, ध्यान याकडे वळणे, जीवनविषयक तत्वज्ञान अंमलात आणणे, धार्मिक गोष्टींमध्ये रस घेणे

(ब) समस्या अथवा निरसन यांवर आधारित व्यूहरचना- प्रवृत्तीने संरक्षक. निरसनात्मक उपचार- समस्यांचे निरसन करताना दृष्टिकोन तणावाचे स्रोतच बदलण्याचा असतो.

**उदा-**

(अ) परिस्थिती बदलण्याचे आव्हान स्वीकारणे

(ब) कृती आराखडा संरचित करणे आणि त्यानुसार बदल घडवून आणणे

(क) सक्रिय वर्तन बदलासाठी सज्ज होणे- नियोजन करून त्यांनुसार वाटचाल करणे.

(क) सदोष, अकार्यक्षम उपचार (कार्व्हर, सचेईर आणि वेइन्ट्रायुब, १९८९)- अस्वस्थता आणि खिन्नमनस्कता बरेचदा एकत्र विकसित होतात. हे या उपचारांनी अधोरेखित केले आहे. हा मार्ग तुलनेने फारशी मदत न करणारा असतो. शक्यतो ही वाट टाळावी. उदा-

(अ) घटना/प्रसंगच नाकारणे किंवा आपल्या प्रतिक्रिया बदलणे

(ब) स्व- टीकेच्या भरवशावर जबाबदारी स्वीकारणे

(क) टाळाटाळ

(ड) भावनिक निचरा, जाणिवांना वाट करून देणे

**श्वास नियमन**

१) काहीवेळ बसता येईल असे सुखकर आसन निवडा आणि ताठ बसावे किंवा उताणे झोपावे.

२) अनावश्यक तणावाचा निचरा करावा आणि हळुवारपणे श्वासावर लक्ष केंद्रित करावे.

३) श्वासाचे फक्त निरीक्षण करावे.

४) श्वास घेणे आणि सोडणे या दोन्ही प्रक्रियांमधील शरीराची हालचाल आणि आतमध्ये जाणवणारी स्पंदने फक्त टिपावीत.

५) नाकपुडीतून बाहेर जाणाऱ्या हवेबरोबर घसा ते फुफ्फुस असा प्रवास निरखावा.

६) काही मिनिटे हे निरीक्षण सुरु ठेवावे.

**मग काय? याचा लंबक**

अपरिहार्यपणे कोणत्याही परिस्थितीची, निर्णयाची काळी बाजू आपल्याला सतावत असते. खरंतर आपण विवेकाने पुढे वाटचाल करावी, पण होतं उलटं! समतोल हवा असेल तर मग काय या विचारसरणीचा लंबक हाती घ्यावा म्हणजे केवळ आपत्ती अथवा आघातांचे चित्र मन काळवंडत नाही. या उपक्रमात सकारात्मक आणि नकारार्थी अशा दोन्ही बाजूंवर आपण विवेकी विचार करतो-

(अ)- मग काय: नकारार्थी
मला स्टेजवर असताना अटॅक आला तर?

(ब) मग काय: होकारार्थी
मी स्टेजवर आजवरचा सर्वोत्कृष्ट परफॉर्मन्स दिला तर?

आठवा- थ्री इडियट्स मधील विचारसरणीतील फरक-

**हमको कल की फ़िक्र सताती**
**वो बस आज का जश्न मनाता**

**तणावस्रोत आणि संसाधने**

एकदा तणावांचे स्रोत ध्यानी आले की त्यांना कवटाळून प्रभावीपणे पुढे जाता येते. त्यांची जोड जुळवून घेण्याच्या, हाताळण्याच्या व्यूहरचनेशी जमू शकते. यामधून अडचणींशी दोन हात करण्याच्या नियोजनापर्यंत पोहोचता येते. हाताशी संसाधने असली तर त्यांचा धांडोळा घेता येते. मग चिंता/काळजी यांची धास्ती वाटत नाही, दडपण येत नाही.

**नोंदणीसाठी चार कॉलम आहेत-**

पहिला तणावस्रोतांसाठी आहे. इथे सध्याचे किंवा अलीकडच्या काळातील तणावांचे स्रोत नमूद करता येतात. दुसरा आहे. हाती असलेल्या संसाधनांची यादी करण्यासाठी. त्यापैकी काही- तंत्रे, उपक्रम, ध्यान इत्यादी जे वाटेवर शिकण्याची, अंगीकृत करण्याची संधी मिळाली.

तिसरा कॉलम- संभाव्य अडचणींचा. त्यासाठी विचारमंथन हा चांगला मार्ग. चौथा आणि अखेरचा हाताळणीचे नियोजन

**उदाहरणार्थ-**

१) तणावस्रोत - भावंडांशी तणातणी

२) संसाधने- योग्य वेळी विवेकपूर्ण, शांत संभाषण

३) अडचणी- हस्तक्षेप, विवाद टोकाला जाणे अगदी हातापायी पर्यंत

४) हाताळणी- तात्पुरता तह, मध्यस्थ शोधणे

**आपत्तीजनक/ विनाशकारी (काय तर) तंत्र**

आकलनविषयक विपर्यास म्हणजे जगाकडे बघण्याचा बदलता दृष्टिकोन. जे जसं नाही, ते तसं आहे हे मानणे. सत्याशी मन ग्वाही करणे, सकारात्मक गाळणीतून जग बघणे, जे नाही त्याच्या चष्म्यातून कल्पना करणे, प्रत्यक्षात नसले तरीही जणू आपण परिस्थितीवर नियंत्रण आणू शकतो असं वर्तन किंवा चुकीच्या , वाईट गोष्टींचा ढिंढोरा पिटणे.

जेव्हा आपण नकारार्थी वातावरणात बुडून जातो अथवा वाईटातील वाईट प्रसंगाची कल्पना करतो तेव्हा ही विनाशाकडे नेणारी वाट आहे याची खूणगाठ बांधावी. अशावेळी स्वतःशी काय तर हा संवाद साधावा.

१) काळजी (सदर परिस्थितीचे संक्षिप्त वर्णन )

२) वाईटात वाईट काय होईल? विरुद्ध साधारणपणे काय होण्याची शक्यता आहे?

३) वाईटात वाईट होण्याची शक्यता (टक्केवारीमध्ये)

**- असं झालं तर मी किती कालावधीमध्ये सावरू शकेल?**

**एक दिवस/एक महिना/एक वर्ष**

४) साधारणपणे काय होण्याची शक्यता (टक्केवारीमध्ये)

**- असं झालं तर मी किती कालावधीमध्ये सावरू शकेल?**

**एक दिवस/एक महिना/एक वर्ष**

५) या विचारचक्रानंतर मला काळजी निर्माण केलेल्या परिस्थितीविषयी काय वाटते आहे?

उरलेल्या तंत्रांविषयी आणि विशेषतः बालवयातील चिंता, काळजी व त्यावरील उपाय या बद्दल पुढील भागात.

# तो हा महामेरू। ज्ञाना माझा।।

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

(भाग-४२)

आपण सुरूवातीलाच पाहिले आहे की, सत्वगुण हा पूर्णतः ज्ञानाकडे झुकलेला आहे. त्यामुळे आपल्यातील सत्वगुण विकसित करून आपले ऐहिक व पारलौकिक जीवन सुखी करावयाचे असेल तर रज तम गुण विरहीत सदासर्वकाळ ज्ञानियांच्या सहवासात रहणे व निरंतर त्यांच्याप्रति विनम्र व नतमस्तक भाव असावा. त्यामुळे काय होते? तर...

**ज्ञानियांच्या ठायी । विनम्र असावे ।।**
**अज्ञान जाळावे । संगतीत ।।१।।**

आपल्याकडे एक म्हण आहे की, शहाण्याचा (ज्ञानियांचा) नोकर व्हावं पण मुर्खाचा (दांभिकांचा) मालक होऊ नये. कारण संगत गुण ते सोबत गुण असे म्हणतात ते काही खोटे नाही. आपलं व्यक्तिमत्त्व, आपलं चारित्र्य आणि चरित्र हे आपण कुणाच्या संगतीत राहतो यावर अवलंबून असतं. याची अनेक उदाहरणं देता येतील. त्याप्रमाणे आपण ज्ञानियांचा नौकर जरी असलो तरी आपल्याला सदासर्वकाळ संताचा म्हणजेच ज्ञानियांचा सहवास लाभतो आणि त्याकारणाने का होईना पण आपल्याला संतसवास लाभतो आणि कधी तरी आपल्यावर त्यांची कृपा होतेच आणि आपला उध्दार होतो. यासंदर्भात जगद्गुरु तुकाराम महाराजांचा एक फार सुंदर अभंग आहे. ते म्हणतात की,

**सद्गुरूच्या संगे शिष्य बि...घडला ।**
**जो जो बिघडल तो सद्गुरूचि झाला ।।**

जर सद्गुरूंच्या सहवासात एखादा शिष्य आला आणि त्याची उत्तम सेवा केली आणि त्याचबरोबर त्यांनी शिकवलेलं ज्ञान मन लावून आत्मसात केलं तर ते आपल्यावर निश्चितच सद्गुरू कृपा करतात आणि एकदा त्यांची कृपा झाली की, त्या शिष्यांचा उध्दार होतो आणि तो शिष्यच सद्गुरूमय होऊन जातो. म्हणजे शिष्य आणि सद्गुरू यांच्यात कसलंच द्वैत राहात नाही.

थोडक्यात इथे 'बी' म्हणजे ग्रामीण भाषेत 'बी'ला 'पण' असे म्हणतात. म्हणजे सद्गुरूंच्या संगतीत शिष्यही चांगला घडतो. आणि जो जो पण असा चांगला शिष्य घडेल तो तो शिष्य सद्गुरूच झाला. असे तुकाराम महाराज म्हणतात.

म्हणून मायबापहो आज ज्ञानियांची भेट होणं जवळजवळ दुरापास्तच झालेलं आहे. असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. तरीसुद्धा एखाद्या ज्ञानियांची अर्थात संतांची किंवा सद्गुरूंची भेट झालीच तर त्यांच्याठायी आपण सदैव विनम्रच असायला हवं. नुसतं विनम्रच राहु नये तर त्यांच्या सहवासात आपल्यातील अहंकारासह विकारही जाळून टाकायला हवेत. कारण संताची या अहंकारावर व विकारावर सत्ता असते. पाहिजे तेव्हा ते यांचा उपयोग करू शकतात, आणि पाहिजे तेव्हा त्यांना शांतही करू शकतात. कारण हे विकार व अहंकार संतांचे गुलाम असतात. पण आपलं मात्र तसं नाही. आपल्या पूर्वपुण्याईने अशा ज्ञानियांची (संतांची) भेट झाली व कृपा झाली पण हे विकार आणि अहंकार आपले गुलाम होतीलच असे नाही. तेव्हा ज्ञानियांच्या सहवासात राहून त्यांची जर कृपा झालीच तर हे विकार आणि अहंकार आपण जाळूनच टाकावेत. म्हणजे पुन्हा यांचा अंश ही आपल्यात शिल्लक राहायला नको. बरं अशा या ज्ञानियांशीआपला व्यवहार कसा असावा? तर...

**बोलु नये कधी अपशब्द त्यांसी ।।**
**मैत्र विनयासी । साध मना ।।२।।**

मायबापहो, आपलं मन हे अती चंचल आहे. ते क्षणभर सुध्दा स्थिर राहात नाही. आत्ता कुठे जन्मोजन्मीच्या पुण्याईने ज्ञानियांचा (संतांचा) सहवास लाभला आहे. तेव्हा पूर्वीच सांगीतल्याप्रमाणे त्यांच्या ठायी आपण विनम्र तर असावेच पण बोलतांना अतिशय मोजके व नेमकेच बोलावे. आपल्या मुखातून चूकूनही असा एकही शब्द त्यांच्याप्रती निघु नये की ज्यामुळे ते दुखावले जातील.


अर्थात संताची कृपा झाल्यावर आपण अंतर्बाह्य शुद्धच होतो तरीपण पूर्वाश्रमीच्या स्वभावाचं काय सांगावं? म्हणून त्यांच्याशी अतिशय काळजीपूर्वक संवाद साधावा. माऊलींनी पसायदानात सांगितल्याप्रमाणे **भूता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।** याची निरंतर आठवण ठेवावी. आणि हे मना तुला पुन्हा पुन्हा बजावून सांगतो की, संताशी वागतांना नेहमी माऊलींनी सांगितलेला 'मैत्र जीवांचे' हा संदेश अतिशय विनयशीलपणे सदासर्वकाळ जपत जा. कारण अशा ज्ञानियांचा (सहवास) सहवास सहजासहजी कुणाच्या प्ररब्धात नसतो रे माझ्या मना! त्यासाठी नामदेव महाराजांनी म्हटल्याप्रमाणे **जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले । तेव्हा या विठ्ठले कृपा केली ।।**' आणि अशी कृपा आज आपल्यावर झाली आहे मना तेव्हा तुझा चंचलपणा सोड आणि या संतांच्या चरणांपाशी स्थिर होऊन त्यांच्याशी विनयशीलपणे मैत्र भाव साध. कारण हे मना...

**सद्गुरू ठायी । नसे कोणी दुजा ।।**
**ज्ञानवंत राजा । परब्रह्म ।।३।।**

हे मना तुला या सर्वज्ञ अशा सद्गुरूंचा महिमा काय सांगावा? अरे म्या पामराची वाणी कमी पडते रे त्यांचा महिमा वर्णन करता करता. अरे एक वेळ देव नाही भेटला तरी चालेल पण असे ज्ञानवंत, संत, सद्गुरू भेटावेत. हे आपल्या जन्मोजन्मीच्या पुण्याची फलप्राप्ती आहे. कारण ऐकवेळ देवाने आपल्याला सोडले तर चालेल कारण आपल्याला सांभाळायला देवाच्या नंतर सद्गुरू (संत) आहेत. पण सद्गुरू (संत) जर आपल्याला दुरावले तर मात्र आपल्याला सांभाळायला कोणीही राहाणार नाही. आपलं जीवन जीवंतपणीच नर्कमय बनेल.

**गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णू: गुरूर्देवो महेश्वराः ।**
**गुरूर्साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।**

हे माझ्या मना इथे गुरूचे वर्णन करताना सांगितले आहे की, सद्गुरू हे ब्रह्मा, विष्णू, महेश तर आहेतच पण ते साक्षात परब्रह्म आहेत. सद्गुरू हे ज्ञानवंत राजे परब्रह्मच आहेत. म्हणून हे माझ्यामना सद्गुरू हे सद्गुरूच असतात त्यांच्या सारखा दुजा (दुसरा कोणी नाही) हे ध्यानात घे. यापेक्षा आणखी काय सांगावा सद्गुरू महिमा तुला? अरे... **सद्गुरू सारिखा असता पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ।।** असे संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, तेव्हा हे मना आता इतर सर्वकाही सोड आणि ज्ञानवंत अशा सद्गुरू चरणी स्थिर हो.



**अज्ञानी मी मुढ । तुचि सांभाळले ।।**
**तुझ्या कृपे झाले । भाग्य थोर ।।४।।**

कधी तरी आपण कोण आहोत? आपला सांभाळ कोण करतो? याचा कधी तरी आपण विचार करतो का? जर करत असु तर आपण असे बेताल वागत का सुटलो? पाप-पुण्याची काहीच कशी चाड आम्हाला राहिली नाही? हे प्रश्न आम्ही कधी तरी स्वतःला विचारले का? का विचारावेसेच वाटले नाही? एकांतात हे सारे प्रश्न एकदा स्वतः ला विसरून बघा आणि उत्तर नहीच मिळाले तर ज्ञानियांना (संतांना) शरण जा म्हणजे हळुवारपणे सारं उलगडेल.

आत्ता कुठे ज्ञानियांच्या संगतीत मला कळून आलय की, या साऱ्या प्रश्नाचं एकच उत्तर आहे ते म्हणजे केवळ माझं अज्ञान, माझा मुर्खपणा. 'मी' आणि 'माझं' या अहंकार आणि विकाराने आपलं उभं आयुष्य नासवून टाकलं आहे. आपलं जीवन म्हणजे त्या बैलगाडी खालच्या श्वानासारखं आहे. संसाराची बैलगाडी हाकणारा गाडीवान दुसराच आहे. गाडी ओढणारे बैल दुसरेच आहेत. परमात्मा हा ही बैलगाडी हाकणारा आहे तर आपले सत्कर्म हे या गाडीचे दोन बैलं आहेत आणि आम्ही मात्र 'हे माझ्या संसाराचं ओझं मीच वाहतो आहे या आविर्भावात त्या श्वानासारखे अहंकारात चालत आहोत. याला निव्वळ मूर्खपणा, अज्ञान म्हणूनये तर काय म्हणावे?

प्रारब्धाने ज्ञानियांचा (संतांचा) सहवास घडला आणि कळून आले की, देवा खरंच मी मुढ, अज्ञानी आहे. असं असुनही आपणच मला सांभाळलत. हे उपकार मी कसे फेडु? अहो एवढंच नाही तर तुम्ही ह्या पामरावर कृपेचा वरदहस्त ठेवलात आणि मी कृतार्थ झालो धन्य धन्य झालो. लोचनातून इंद्रायणी चंद्रभागा वाहु लागल्या. आणि काय सांगु माझं भाग्यही थोर झालं आज.

देवा, तुझ्या कृपेने मला या ज्ञानवंत सद्गुरूंचा (संतांचा) सहवास लाभला आणि माझ्यात 'मी' आणि 'माझा' अजुनही उरलाच आहे पण देवा, तो मी फक्त आणि फक्त तुझाच आहे आणि तु फक्त आणि फक्त 'माझाच' आहेस एवढ्यापुरताच उरला आहे देवा. या व्यतिरिक्त त्याचे अस्तित्वच उरले नाही जीवनात. आणि हे केवळ ज्ञानियांच्या, संतांच्या, सद्गुरूंच्या सहवासाने आणि त्यांच्या कृपेने.

देवा खरं सागु तुला आता मला खऱ्या सुखाचा सुगावा लागला आहे. त्यामुळे आनंदाचे डोही आनंद तरंग अंतरात उठत आहेत. कारण...

**जया द्वरी खुले । सोन्याचा पिंपळ ।।**
**ज्ञान गंगाजळ । शब्द झाले ।।५।।**

देवा, जन्मोजन्मीची जी पायपीट चालू होती ती आता मंदावत आहे. कारण ज्याच्यासाठी हा जन्मोजन्मीचा आटापिटा चालू होता तो उंबरा आता नजरेच्या टप्प्यात येऊ लागलाय. मंद गार अशा हवेच्या झुळकी बरोबर मोगरा आणि मंजिरिचा गंध दरवळु लागलाय. माझ्या धमन्यातून लक्षावधी आनंदाचे दीप तेजाळले आहेत. आणि असं वाटतंय की,

**अवघेचि त्रैलोक्य आनंदले आता ।**
**चरणी जगन्नाथा चित्त ठेले ।।**

माझ्या आत्म्याची पावलं ज्या अंगणात मंदावली त्याच अंगणात त्यांना त्यांचा विसावा गवसला असावा. कारण त्या अंगणात सळसळत्या पिंपाळाची छाया आनंदाने खेळत होती. सहज वर पाहिलं तर खुद्द सोन्याचा पिंपळ त्या छायेला खेळवत होता. अरे बापरे... म्हणजे हा म...ऊ.. लीं...चा स...स...सोन्याचा पिंपळ? युगानुयुगांच्या वियोगाच्या असहाय्य वेदना त्या पिंपळछायेत शांत शांत झाल्या. आता वैखरी मौन झाली. आणि अंतरात्म्याचे बोल मोगऱ्याची फुलं होऊन टप टपू लागली.

शब्दावीन कळले सारे शब्दांच्या पलिकडले याची आत्मानुभूती येऊ लागली. माऊलींच्या शब्द जैसे कल्लोळ अमृताचे याचा अर्थ हळूहळू उलगडु लागला. आणि काय सांगु माऊली, तुमचा प्रत्येक शब्द 'ज्ञान गंगाजळ' झाला. मी अधाशा सारखा जसा जसा प्रशु लागलो तसतशे कळेनासे झाले की ही तृष्णा कमी होऊ लागलीय की वाढु लागलीय? पण एवढं खरं माऊली की, आता ही तृष्णा तृप्तीच्या पलीकडे केव्हाच गेली आहे.

खऱ्या अर्थाने आता मी निश्चिंत झालो आहे. कारण आता मी माझ्या माऊलींच्या छायेखाली विसावलो आहे.

**ज्ञानराज योगी । ज्ञानियांचा गुरू ।।**
**तो हा महामेरू । ज्ञाना माझा ।।६।।**

आईच्या कुशीत बाळ किती बिनधास्त असतं. बाळासाठी आईच्या कुशी एवढी सुरक्षीत जागा जगाच्या पाठीवर कोणतीच नसते. याचा पुन:प्रत्ययाची अनुभूती मिळणं हे जन्मोजन्मीचं भाग्यच असावं लागतं. अनाकलनीय वाटणारं हे जीवन आता आकलनीय वाटु लागलंय. कारण ज्ञानराज योगी, हे साऱ्या ज्ञानीयांचे गुरू आहेत. विश्वाची माऊली ही ज्ञानीयांचा अर्थात संतांचा नव्हे नव्हे विश्वचा महामेरू दुसरं तिसरं कोणी नसुन माझा ज्ञानाच आहे.

**ज्ञानराज बाळ माझा सांगे कथा भगवंताला**

एवढा महान अधिकार असणारी माझी ज्ञानराज माऊली सदैव ज्ञानियांच्या महामेरू स्थानी विराजमान झालेली आहे.

म्हणून तर मायबापहो, पहिल्याच चरणात सांगितलं आहे की, प्रत्येक ज्ञानीयांच्या ठायी आपण विनम्रच असावे. आणि त्यांच्या सहवासात आपल्यातलं अज्ञान जाळूनच टाकावं. ज्ञानीयांशी बोलतांना चुकूनही अपशब्द वापरू नये. कारण ते आपल्यासाठी सद्गुरूच असतात. म्हणून हे मना त्यांच्याशी विनयाने मैत्र साधं. सद्गुरू सारखे सद्गुरूच असतात त्यांची जागा दुसरा कुणीही घेऊ शकत नाही. ते ज्ञानवंत राजे परब्रह्मच असतात. त्यांच्यासमोर आपण अज्ञानी, मुढ आहोत याची सतत जाणिव ठेवली तर तेच आपला सांभाळ करतील. त्यांची एकदा कृपा झाली की आपलं भाग्यच थोर होऊन जातं. यापेक्षा आणखी काय सांगावे? त्यांचं बोट धरून त्यांच्या मार्गावर चालू लागलो की तो सन्मार्ग आपल्याला बरोबर ज्यांच्या दारात सदैव सोन्याचा पिंपळ झळाळतो त्या माऊलींच्या अंगणात आपण केव्हा आलो ते कळत नाही. आणी आपल्या कानाला अनाहत अशी परावाणी ऐकू येते.

गंगाजळासारखं ज्ञान शब्दातून वाहु लागतं. आणि शेवटी आपल्याला कुशीत घेते ती माऊलीच, ही माऊली ज्ञानराज योगी तर आहेच आहे पण ती तमाम ज्ञानीयांची (संतांची) सुध्दा गुरू माऊलीच आहेत. एवढेच नाही तर ते साऱ्या ज्ञानीयांचे महामेरू माझी ज्ञानराज माऊली अर्थात माझा ज्ञाना महामेरूच आहेत. अशा या ज्ञानीयांच्या महामेरूला कोटी कोटी प्रणाम.

आपल्यातील अहंकार, विकार, अज्ञान रूपी अंध:कार ज्ञानीयांच्या सहवासात ज्ञानरूपी सूर्याने तो दूर व्हावा व आपलं कल्याण व्हावं एवढीच माऊलींच्या चरणी प्रार्थना करून थांबतो. (उत्तरार्ध)

(लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना लेखकाचीच आहे.)

# तंत्रज्ञान कामी येईल...



**नक्षलवादी, अंडरवर्ल्डशी संबंधित लोक, दहशतवादी यांचा ठावठिकाणा शोधण्यासाठी, त्यांची माहिती मिळविण्यासाठी यंत्रणा बरेचदा रस्त्यावर उतरते. अशा वेळी असामाजिक तत्त्वांकडून गोळीबार वा अन्य प्रकारच्या हल्ल्याद्वारे पोलिसांना धोका पोहोचविण्याचा प्रयत्न होतो. अशा वेळी त्यांना नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून दिल्या जाणाऱ्या प्रत्युत्तराला 'एन्काऊंटर' म्हणतात. अलिकडच्या घटना अशा असतात का?**

तंत्रज्ञान
प्रवीण दीक्षित
निवृत्त पोलिस महासंचालक

बदलापूरमधील लहान मुलींवरील अत्याचाराच्या आणि संबंधित गुन्हेगार पोलिसांकडून मारला गेल्याच्या घटनेनंतर उठलेले चर्चेचे वादळ खूप मोठे आहे. या एका घटनेने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याच अनुषंगाने महाराष्ट्रात एन्काऊंटर संस्कृती बळावत असल्याची शंकाही व्यक्त केली जात आहे. अशा पद्धतीने गुन्हेगारांना संपवणे योग्य आहे की नाही, यासारखे अनेक विषय चर्चेत येत आहेत. या पृष्ठभूमीवर सर्वप्रथम एन्काऊंटर आणि पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी केलेली कारवाई यातील फरक समजून घ्यायला हवा.

अनेक असामाजिक तत्त्व वेगवेगळ्या कारणांनी पोलिसांवर हल्ला करू शकतात. जसे की, दरोडेखोरांच्या टोळीचा शोध घेण्यासाठी पोलिस मागे गेल्यास संशयित दरोडेखोर हल्ला करतात. बरेचदा महिलांना पुढे करून संशयितांकडून हल्ला केला जातो. अनेक ठिकाणी वाहतुकीचे नियमन करणाऱ्या पोलिसाने बेशिस्त वाहनाला थांबवले तर राग धरून वा नशेच्या अमलाखाली लोक त्यांच्यावर हल्ला करू शकतात. पोलिसाला धक्का देत प्रसंगी गाडीच्या बॉनेटवर चढवून गाडी दामटवत राहतात. दंगल वा दहशत माजवण्याच्या उद्देशाने रस्त्यावर उतरणाऱ्या गटाचे उद्दिष्ट सरकारी संपत्तीचे नुकसान करणे किंवा पोलिसांवर हल्ला करणे, त्यांना ठार मारणे असे असू शकते. नक्षलग्रस्त भागामध्ये नक्षली चळवळींमध्ये सहभागी असणारे आपल्या सुरक्षित अड्ड्यांवर कारवाई करण्यास येणाऱ्या पोलिसांवर हल्ला करतात.

स्वत:जवळचे बॉम्ब, बंदुका वा अशाच घातक शस्त्रांचा त्यासाठी वापर केला जातो. आतापर्यंत सांगितलेल्या या सगळ्या प्रकारांमध्ये शासन व्यवस्था कायम ठेवण्यासाठी शासनाच्या वतीने पोलिसांना शस्त्र दिलेले असते. जमाव हिंसक होऊन नुकसान करत असेल तर त्यावर नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना बळाचा वापर करावाच लागतो. अर्थात बळाचा वापर करतानाही तो कमीत कमी आणि योग्य परिणाम होईल, अशारीतीने करण्याविषयी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने सूचित केले आहे.

बदलापूरच्या घटनेतील आरोपीच्या बाबतीतील घटनाक्रम लक्षात घेतला तर त्याने पोलिसाकडील पिस्तूल खेचून गोळीबार करण्यामागे निश्चितच त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न स्पष्ट होता. गाडीमध्ये प्रवास सुरू असताना मध्ये अगदी दोन फूट जागा असल्यामुळे गुन्हेगाराला पिस्तूल खेचणे शक्य होते. या झटापटीतून शस्त्र अनलॉक होऊन तीन वेळा गोळीबार करण्याची घटना घडली. यात सहायक पोलिस निरीक्षक जखमी झाला. अशा परिस्थितीत गुन्हेगाराचा पोलिसांना ठार मारण्याचा उद्देश स्पष्ट दिसत असताना पोलिसांनी स्वत:चे संरक्षण करण्यासाठी आणि गुन्हेगाराला नियंत्रणात आणण्यासाठी गोळीबार करून प्रत्युत्तर देणे अत्यावश्यक होते. याला काही एन्काऊंटर म्हणता येत नाही. पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी नाईलाजाने केलेला हा गोळीबार होता.

आता आपण एन्काऊंटर कशाला म्हणतात ते बघू या. नक्षलवादी, अंडरवर्ल्डशी संबंधित लोक, दहशतवादी यांचा ठावठिकाणा शोधण्यासाठी, त्यांची माहिती मिळविण्यासाठी यंत्रणा जाते आणि वर उल्लेख केलेल्या असामाजिक तत्त्वांकडून त्यांना धोका पोहोचविण्याचा प्रयत्न होतो, म्हणजेच गोळीबार वा अन्य प्रकारचा हल्ला होतो तेव्हा त्यांना नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून दिल्या जाणाऱ्या प्रत्युत्तराला एन्काऊंटर म्हणतात. खरे सांगायचे तर ही एक प्रकारची लढाईच असते.

एका बाजूने शस्त्रांचा वापर होत असल्यामुळे पोलिसांना त्यांच्या बाजूने शस्त्रांचा वापर करावा लागतो. म्हणूनच उच्च न्यायालयानेही बदलापूर केसमधील आरोपीच्या संदर्भातील घटनेसाठी 'एन्काऊंटर' हा शब्द वापरलेला नाही; उलटपक्षी हे एन्काऊंटर नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. कैदी तुरुंगात असले, तरी विविध कारणांसाठी अनेकदा त्यांना न्यायालयात न्यावे लागते. त्यांना रुग्णालयात न्यावे लागते. अशा प्रसंगी गुन्हेगार डॉक्टरांवर हल्ला करण्याच्या घटना घडू शकतात. संधी मिळाली की ते पळून जाण्याचा प्रयत्न करू शकतात.

आत्महत्येचाही प्रयत्न करतात. अशी अनेक उदाहरणे आपल्या वाचनात असतात. अनेकदा तपासात 'सीन रिक्रिएट करणे' हा प्रकार असतो. यामध्ये प्रत्यक्ष गुन्हा घडलेल्या ठिकाणी गुन्हेगारांना न्यावे लागते आणि तिथे त्यांची चौकशी वा विचारपूस करावी लागते. म्हणजेच अशा वेगवेगळ्या कारणासाठी तुरुंगातून बाहेर नेत असताना आरोपींना अन्यांकडून वा आरोपींकडून अन्य लोकांना मोठा धोका असतो.

हीच बाब लक्षात घेऊन भारत सरकारने १ जुलै २०२३ पासून नवीन फौजदारी कायदे लागू केले आहेत. त्यात अधोरेखित केलेली बाब सगळीकडे डिजिटलायझेशनचा वापर करण्याची आहे. याचा अर्थ असा की, आता प्रत्येक कारागृहामध्ये व्हिडीओ कॉन्फरसिंगची सोय आहे. याचा वापर करून तुरुंगात बंदिस्त असणारे आरोपी न्यायाधीशांसमोर साक्ष देऊ शकतात. ते याच पद्धतीने रुग्णालयात डॉक्टरांशी बोलून टेली मेडिसिनचा वापर करू शकतात.

नातेवाईक वा अन्य लोकांशी व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधू शकतात. म्हणजेच त्यांना प्रत्यक्ष हलवण्याची कमीत कमी गरज भासते. थोडक्यात, भविष्यात अशा घटना टाळायच्या असतील तर तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर होणे गरजेचे आहे. सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असणारी ही बाब न्यायाधीश, सुरक्षा अधिकारी, डॉक्टर या सगळ्यांनी लवकरात लवकर आणि ताकदीने आत्मसात करणे आणि त्याचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक आहे. यात कैद्याची सुरक्षाही अबाधित राहू शकते.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे बरेचदा गुन्हेगारांना तुरुंगातून न्यायालयात नेताना संतप्त जनसमुदायाकडून जीवघेणा हल्ला होण्याची शक्यता असते. तुरुंगाच्या आवारातच लोकांनी ठार मारलेल्या अक्कू यादवची घटना वाचकांच्या स्मरणात असेल. उत्तरप्रदेशमधील एक घटनाही खूप चर्चेत होती. तिथे पूर्वी खासदार असणारा आतिफ भयंकर गुन्हेगार म्हणून कुख्यात होता. असा हा माणूस न्यायाधीशांपुढे जाण्यासाठी गाडीतून उतरला आणि त्याच क्षणी बाजूने आलेल्या चार लोकांनी त्याच्यावर गोळीबार केला. म्हणजेच असे प्रकार बरेचदा घडले आहेत. तुम्ही कैद्याला तुरुंगाबाहेर काढता तेव्हा त्याच्या मनात वा त्याच्याबद्दल लोकांच्या मनात काय भावना आहेत, यावर कोणीही नियंत्रण ठेवू शकत नाही. स्वाभाविकच निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा परिणाम काय होईल, हेदेखील कोणीच सांगू शकत नाही. म्हणूनच नियंत्रण मिळविण्यासाठी आणि स्वत:चे संरक्षण करण्यासाठी पोलिसांना ऐन वेळी काही महत्त्वपूर्ण निर्णय घ्यावे लागतात. तो कोणताही पूर्वरचित कट नसतो तर परिस्थितीमुळे निर्माण झालेली एक समस्या असते. ही बाब स्वीकारणे गरजेचे आहे.

या समस्येवर मात करायची तर तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगारांसंदर्भातील निर्णय घेणे, तशी खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. पूर्वी ही सोयही नव्हती आणि स्वाभाविकच त्याला मान्यताही नव्हती. मात्र आता बदलत्या परिस्थितीत सरकारकडून अधिकृत मान्यता मिळाली असताना सुनावणी वा अन्य प्रकारांसाठी नव्या तंत्राचा वापर करायला हवा. त्यामुळे गुन्हेगारांबरोबर पोलिस आणि आजूबाजूचा समाजही सुरक्षित राहू शकेल. यातूनच पुढे असे प्रकार वाढत आहेत की कमी होत आहेत, हा मुद्दाच राहणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर केला तर अशा घटनांना कायमस्वरूपी चाप बसेल. त्या कधीच घडणार नाहीत. याच्याशी संबंधित आणखी एक बाब म्हणजे गरज वाटली तर न्यायाधीश स्वत: तुरुंगात जाऊन न्यायालय सुरू करू शकतात. पुण्याला जनरल वैद्य यांच्या खुनाच्या प्रकरणी ही पद्धत अंमलात आणली गेली होती. संबंधित खटल्याचे कामकाज पाहणाऱ्या न्यायाधीशांनी येरवड्याच्या तुरुंगातच न्यायालय सुरू केले होते. यामुळे आरोपीला बाहेर काढण्याचा प्रश्न, निर्माण होणारा धोकाच नाहीसा झाला. गडचिरोलीच्या नक्षलवाद्यांबाबतचे अनेक खटले सध्या याच पद्धतीने चालवले जातात.

नक्षली नागपूरच्या तुरुंगात असतील आणि न्यायाधीश गडचिरोलीला असतील तर अनेकदा न्यायाधीश महोदय आपल्या खोलीत बसून ऑनलाईन पद्धतीने खटले निकाली काढताना दिसतात. २००८ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी असणारा हेडली अमेरिकेत होता. मात्र त्याची ऑनलाईन साक्ष घेण्यात आली होती. म्हणजेच पूर्वीपासून या पद्धतीचा वापर आणि उपयुक्तता सिद्ध होत आली आहे. आता हे तंत्रज्ञान सर्रास आणि सर्व ठिकाणी वापरणे तेवढे गरजेचे आहे. विशेषत: संवेदनशील खटल्यांमध्ये न्यायाधीशांकडूनच या पद्धतीचा अवलंब करण्याच्या सूचना दिल्या जाणे गरजेचे वाटते.

# मध्यपूर्वेतला झटका; अमेरिकेला धसका



**सध्या इस्रायल आणि हिजबुल्लाह तसेच इराणशी तीव्र संघर्ष सुरू आहे. ही युद्धासारखीच स्थिती आहे. इस्रायल अमेरिकेचा युद्धबंदी करार प्रस्तावही मान्य करायला तयार नाही. हिजबुल्लाहचा म्होरक्या नसराल्लाहही मारला गेला असून इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये ६०० ठार तर हजारो लोक जखमी आणि बेघर झाले आहेत. अमेरिकेलाही धसका घ्यायला लावणारा मध्यपूर्वेतला हा झटका काय सांगतो?**

परराष्टकारण
प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

सध्या इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यात अतिशय तीव्र आणि प्राणघातक संघर्ष सुरू आहे. दोन्ही बाजूंनी अद्याप युद्ध घोषित केले नसले, तरी युद्धासारखीच परिस्थिती आहे. अमेरिकेत पुढच्या महिन्यात निवडणूक असल्याने आपल्यावर अमेरिकन नेते फार डाफरणार नाहीत, हे लक्षात घेऊन इस्रायल नावाचे लाडके बाळ अमेरिकेचे ऐकायला तयार नाही. युद्धबंदी करार करण्याचा प्रस्तावही मान्य करायला तयार नाही. इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या एका भयानक हवाई हल्ल्यामध्ये हिजबुल्लाहचा म्होरक्या नसराल्लाह मारला गेला. या हल्ल्यांमध्ये हजारो लोक जखमी झाले. ६०० हून अधिक लोक ठार झाले तर हजारो लोक बेघर झाले.

अलिकडेच इस्रायलने लेबनॉनमध्ये २००६ नंतरचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला. त्याने सीमेवर रणगाडेही तैनात केले आणि दक्षिणेकडील भागातून लेबनॉनवर जमिनीवर हल्ल्याची तयारी केली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर युद्ध भडकण्याचीही शक्यता आहे. ही इस्रायलसाठी एक नवी आघाडी उघडण्यासारखे आहे. हमासशी त्याचे युद्ध अद्याप संपलेले नाही. हा देश हिजबुल्लाहलाही नष्ट करू शकतो. हमास अद्याप पूर्णपणे नष्ट झालेला नाही. त्यामुळे इस्रायलसाठी दहशतवादाविरुद्ध दोन आघाड्यांवर लढावे लागत आहे. हे कमी म्हणून का काय, इराणने इस्रायलवर बॅलिस्टिक हल्ला करून सैन्य दलाच्या आस्थापनांना लक्ष्य केले. इस्रायलच्या हवाई संरक्षण यंत्रणेने इराणने डागलेल्या १८० बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांपैकी अनेक क्षेपणास्त्रे लक्ष्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच रोखण्यात आली; मात्र या युद्धानंतर पश्चिम आशियात तणावाची स्थिती निर्माण झाली. इराणच्या हल्ल्यानंतर इस्रायल तोडीस तोड उत्तर देणार, हे माहीत असतानाही इराणने हा हल्ला का केला, याचे उत्तर काही महिन्यांपूर्वी इस्रायलने इराणमध्ये घुसून केलेल्या कारवाईत आहे. आताही समर्थक दहशतवादी गटावर हल्ले केल्यानंतर तो देश स्वस्थ बसला तर अन्य देशांना इराणवर कुरघोडी करण्याची संधी मिळेल तसेच ज्या देशात इराणच्या कथित फौजा वेगवेगळ्या नावाने आहेत, त्यावरही नंतर इस्रायल हल्ला करू शकतो. हमास आणि हिजबुल्लाह या दोन दहशतवादी संघटना एकमेकांना सतत पाठिंबा देत आहेत. ७ ऑक्टोबर २०२३ नंतर इस्रायलने हमासचा खात्मा करण्यासाठी हल्ला केला, तेव्हापासून हिजबुल्लाहने इस्रायलवर हल्ले करणे सुरूच ठेवले. इस्रायलने हमासविरुद्धची कारवाई थांबवावी, असा हिजबुल्लाहचा प्रयत्न आहे तसेच हौतीदेखील हमासच्या समर्थनार्थ लढत असून इस्रायलवर हल्ले करत आहेत. हौती दहशतवाद्यांनी संपूर्ण अरबी समुद्रातील दळणवळण आणि वाहतूक प्रभावित केली आहे. तेही इस्रायलचे जास्तीत जास्त नुकसान करण्याच्या उद्देशाने प्रयत्नशील आहेत. संपूर्ण मध्यपूर्वेतील एकूण परिस्थिती चिंताजनक आहे. संपूर्ण परिसरात अद्याप युद्ध भडकले नसले, तरी ते भडकण्याची शक्यता आहे. केवळ मध्यपूर्वेसाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी हे मोठे आव्हान आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे पुरवठा साखळी आधीच प्रभावित झाली आहे आणि मध्यपूर्वेत असे झाल्यास आणखी समस्या निर्माण होतील. याचा जगातील तेल आणि वायूच्या किमतींवर वाईट परिणाम होईल. त्यांच्या किमती वाढू शकतात. याचा अर्थ जगभरात महागाई आणखी वाढेल. अमेरिका प्रत्येक परिस्थितीत इस्रायलसोबत आहे. तिथे सत्तेत रिपब्लिकन सरकार असो वा डेमोक्रॅटिक, कोणताही नेता इस्रायलच्या विरोधात जाणार नाही. इस्रायलच्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा प्रमुख नसराल्लाहचा मृत्यू झाल्यानंतरही इस्रायल थांबले नाही. मध्यपूर्वेतील संपूर्ण युद्ध टाळले पाहिजे, असे बायडेन यांचे मत आहे. बायडेन यांचे हे विधान अशा वेळी आले, जेव्हा लेबनॉनमध्ये इस्रायलच्या हवाई हल्ल्यात डझनभर लोक मारले गेले; मात्र नेतान्याहू आपल्याशी कधी बोलणार, हे त्यांनी सांगितले नाही. नसराल्लाहच्या मृत्यूमुळे हिजबुल्लाहला मोठा धक्का बसल्याचे अमेरिका मानते. त्याच वेळी अमेरिकन प्रशासनाने सावधपणे पुढे जाण्याचा प्रयत्न केला आहे. इस्रायलचे हमासबरोबरचे युद्ध रोखण्याचा प्रयत्न केला आहे. हिजबुल्लाहसारख्या संघटनांना इराणचा पाठिंबा आहे. नसराल्लाहच्या मृत्यूमुळे व्यापक युद्ध होऊ नये, असा त्यांचा प्रयत्न आहे. नसराल्लाहच्या मृत्यूनंतर इस्रायली सैन्याने हौतीवरही हल्ला केला. इस्रायल आता आपल्या मोठ्या शत्रूंवर एकापाठोपाठ हल्ला करत आहे. ते हिजबुल्लाह, हमास आणि येमेनच्या हौती बंडखोरांविरुद्ध एकाच वेळी लढत आहे. इस्रायलवरील अलिकडील हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून डझनभर विमानांनी येमेनमधील हौती स्थानांवर हल्ला केला. सैन्याने येमेनी शहरातील होडेदा येथील पॉवर प्लांट आणि सागरी बंदरांना लक्ष्य केले. इस्रायलने हमास या दहशतवादी संघटनेवर हल्ला केल्यापासून अमेरिकेतील डेमोक्रॅट पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या सरकारने पूर्ण पाठिंबा दिला आहे. सध्या बेंजामिन नेतान्याहू यांनी हिजबुल्लाहच्या विरोधात मोठी कारवाई सुरू केली असताना असा पाठिंबा देणे अमेरिकेसाठी नक्कीच आव्हानात्मक आहे; पण अशा परिस्थितीतही हे राष्ट्र इस्रायलला पूर्ण पाठिंबा देत आहे. इस्रायलला अमेरिकेचा पाठिंबा आहे, याचे कारण अमेरिकेतील ज्यू लॉबी खूप शक्तिशाली आहे. सुमारे ७० लाख ज्यू तिथे राहतात आणि त्यांची उपस्थिती अमेरिकेच्या संपूर्ण राजकीय व्यवस्थेत आहे. त्यांचा संपूर्ण व्यवस्थेवर प्रभाव आहे. कोणताही राजकीय पक्ष ज्यू-अमेरिकन समुदायाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. अमेरिकेचे सध्याचे धोरण पाहिले असता बायडेन प्रशासन आपला दृष्टिकोन संतुलित ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचप्रमाणे डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्यासाठी पुढील दोन महिने अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशा वेळी, बायडेन प्रशासन असा कोणताही निर्णय घेऊ इच्छित नाही, ज्याचा त्यांच्या राजकारणावर वाईट परिणाम होईल किंवा ज्यू-अमेरिकन लॉबीला राग येईल. दुसरीकडे, अमेरिकेत गाझापट्टीतील अनेक लोक राहतात. त्यांचाही तिथल्या निवडणुकीत दोन्ही पक्षांना फायदा घ्यायचा आहे. त्यामुळे बायडेन यांची कसोटी आहे. एकीकडे ते इस्रायलच्या पाठीशी राहतात तर दुसरीकडे युद्धबंदीसाठी आग्रह धरतात, नेतान्याहू यांच्याशी चर्चा करण्याचे जाहीर करतात. अमेरिकच्या लोकसंख्येत २.५ टक्के ज्यू आहेत. त्यांच्या छोट्या नाराजीचाही मोठा परिणाम होऊ शकतो. बहुतेक ज्यू-अमेरिकन लोक डेमोक्रॅट पक्षाचे समर्थक आहेत. अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीत, ॲरिझोना, जॉर्जिया, नेवाडा, पेनसिल्व्हेनिया, मिशिगन, नॉर्थ कॅरोलिना आणि विस्कॉन्सिन या सात प्रमुख स्विंग राज्यांमध्ये ज्यूंची मते खूप महत्त्वाची आहेत. सध्या बायडेन प्रशासन या समाजाला दुखावणार नाही. त्यांनी दुखावण्याचा प्रयत्न केल्यास ही मते रिपब्लिकन पक्षाच्या दिशेने जाऊ शकतात. सध्या बहुसंख्य ज्यू-अमेरिकन लोक डेमोक्रॅट आहेत; परंतु सत्ताधारी पक्षाच्या भूमिकेमुळे इस्रायल अडचणीत आला आहे, असे वाटल्यास ते आपली भूमिका बदलू शकतात. अमेरिकेच्या निवडणुकांमध्ये काही राज्ये डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन विचारांमध्ये विभागली गेली आहेत. ती ब्लू आणि रेड राज्ये म्हणून ओळखली जातात. केवळ स्विंग राज्ये निवडणुकांमध्ये फरक करू शकतात. हे अनिर्णीत मतदार कोणत्या पक्षाला मतदान करायचे, हे ऐनवेळी ठरवतात. नेतान्याहू प्रशासनाला माहीत आहे की, या क्षणी बायडेन ज्यू समुदायाची नाराजी ओढवून घेऊ शकत नाहीत. म्हणूनच अमेरिकेचा सल्ला धुडकावून इस्रायलने हिजबुल्लाहवर जोरदार हल्ला केला. तरीही अमेरिकेने कोणतेही पाऊल उचलले नाही. ७ ऑक्टोबर २०२३ नंतर अमेरिकेत ज्यूंविरुद्ध हिंसाचार वाढला असून बायडेन प्रशासनाने कोणत्याही प्रकारे आततायीपणाला प्रोत्साहन दिले जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. ज्यू लोकसंख्येच्या विरोधात घडलेल्या सर्व घटनांवर अमेरिका कठोर कारवाई करेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

अध्यक्षीय निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून कमला हॅरिस आणि बायडेन हे दोघेही अतिशय व्यावहारिक पावले उचलत आहेत. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प ज्यूंविषयी आपली बांधिलकी सतत दाखवत असून त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे अत्यंत वचनबद्धतेने इस्रायलच्या पाठीशी उभे आहेत. अमेरिकेच्या देशांतर्गत धोरणाचा आणि परराष्ट्र धोरणाचा परिणाम निवडणुकीवर होणे साहजिकच आहे. दोन्ही पक्ष ज्यूंच्या, म्हणजे इस्रायलच्या समर्थनार्थ उभे आहेत. आठवड्याभरापूर्वीच अमेरिकेने युरोपियन महासंघासह इतर १२ देशांनी युद्धबंदीचा प्रस्ताव ठेवला होता; परंतु इस्रायलने तो फेटाळला. असे असूनही बायडेन प्रशासन इस्रायलच्या पाठीशी उभे राहिले आहे. अमेरिकन मुस्लिम बायडेन सरकारवर टीका करत असतील; पण रिपब्लिकन पक्षाला फायदा होईल, असा कोणताही पवित्रा ते घेणार नाहीत. अरब आणि मुस्लिम अमेरिकन शेवटी डेमोक्रॅट्सना मतदान करतील. एकंदरीत अमेरिका इस्रायलचा वरवरचा निषेध करत असेल; पण त्यांचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगळे आहेत.

